
अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

नोव्हेंबर २००८    किंमत :रुपये १५






आतषबाजी आणि खुसखुशीत मेवा यांच्या जोडीला मन टवटवीत करण्यासाठी
सर्वत्र गाजत असलेल्या उत्तमोत्तम पुस्तकांच्या सहवासात
हा दीपोत्सव आनंददायी करण्यासाठी 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ची धमाकेदार

# दीपयोजना

खास आपल्या सभासद परिवारासाठी ( मेहता मराठी ग्रंथजगत आणि टी बुक क्लब )
या योजनेत १५०० रुपये छापील किंमतीच्या पुस्तक खरेदीवर आपण मिळवू शकाल

## ८०० रुपयांची कूपन्स, चक्क भेट म्हणून!

**म्हणजेच प्रत्येकी २०० रुपयांची एकूण ४ कूपन्स!**
**आपले मित्र-आप्तेष्ट यांना ही कूपन्स भेट देऊन**
**त्यांचाही दीपावलीचा आनंद द्विगुणीत करा!**

त्वरा करा, मेहता पब्लिशिंग हाऊसच्या परिवारात सामील व्हा!

## योजनेचा कालावधी ९ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २००८

या योजनेत श्रीमानयोगी, स्वामी, संभाजी,
रुचिरा भाग १ व २ आणि वितरणाची पुस्तके समाविष्ट नाहीत.
पुस्तके पोस्टाने हवी असल्यास रु. १००/- ज्यादा पाठविणे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ नोव्हेंबर २००८

◆ वर्ष आठवे

◆ अंक अकरा


## — अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | ८ |
| **पुस्तक परिचय** | |
| **परशुधारी परशुराम :** सुधाकर शुक्ल | ५८ |
| **चिकन सूप फॉर द सोल** | |
| **भाग २ :** अनु. प्रज्ञा ओक | ६८ |
| **सम्राज्ञी :** तेजस्विनी जाधव | ७४ |
| **मुलाखत :** व्ही.के. कार्तिका | ८० |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ८४ |
| **पुरस्कार** | ८९ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९७ |
| **श्रद्धांजली** | १०० |
| **बालनगरी** | १०७ |



✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

✠ मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*




✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवनसमोर, पुणे - ४११ ०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
**Email -** info@mehtapublishinghouse.com
mehtapublishing@gmail.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**



**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादकसहमत असतीलच असे नाही.*




## फ्रँकफर्ट बुक फेअरचा संदेश

फ्रँकफर्ट बुक फेअर यावर्षी १५ ते १९ ऑक्टोबर दरम्यान संपन्न झाली. यंदा पहिल्याच दिवशी ५६ हजार व्यावसायिकांनी या बुकफेअरला भेट दिली. गतवर्षी एकूण अडीच लाखावर व्यावसायिकांनी भेट देऊन एक विक्रमच प्रस्थापित केला होता. यंदा तो ओलांडला जाणार असे वातावरण आदल्या दिवसापासूनच दिसत होते. तसेच घडले. तीन लाखावर हा आकडा गेला.दिनांक १४ ऑक्टोबरला म्हणजे बुकफेअरच्या अधिकृत उद्घाटनाच्या आदल्या दिवशीही अनेक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम आयोजित केले होते. त्यातील एका कार्यक्रमामध्ये ब्राझीलचे अग्रगण्य साहित्यकार, अल्केमिस्ट या बेस्टसेलरचे लेखक पॉवलो कोएल्हो यांनी कीनोट अ‍ॅड्रेस दिला. नंतर पत्रकार परिषद झाली. पृथ्वीवरचे सर्वाधिक खपाचे लेखक म्हणून त्यांचा बुक फेअरमध्ये उद्घाटनाच्या दिवशी मेजवानीसह सत्कार करण्याचे ठरलेले होते. दहा कोटी प्रती त्यांच्या पुस्तकांच्या विकल्या गेल्या आहेत. त्यांच्या भाषणाचा विषय 'दि रायटर अ‍ॅज पॉप स्टार' असा होता. डिजिटल पब्लिशिंगमुळे उपलब्ध साधनांचा वापर करण्याचे महत्त्व विशद करताना त्यांनी म्हटले, ''सरकारला आज बँकांना दिवाळखोरीतून वाचविण्यासाठी बेलआउट पॅकेज जाहीर करावे लागत आहे. डिजिटल युग आले असले तरी मुद्रित पुस्तकांना अजून हजार वर्षे तरी मरण नाही. त्यानंतर कदाचित त्यांच्यावर बेलआउटची पाळी येऊ शकते.''

२००७च्या बुकफेअरमध्ये प्रकाशकीय सल्लागार मायकेल काडेर याने प्रकाशकांना नवीन तंत्रज्ञानाचा लाभ घ्या असा आग्रह आपल्या कीनोट भाषणात केला होता. पॉवलो कोएल्हो त्या भाषणाला उपस्थित होते. त्याचा संदर्भ देऊन ते म्हणाले, ''मी हा सल्ला शिरोधार्य मानला. त्याचा मला चांगलाच फायदा झाला. त्यामुळे मी सुपरस्टार झालो. मी माझा ब्लॉग सुरू केला. त्याला रोज ५० हजार दर्शक भेट देतात. इंटरनेट हा त्यामुळे मला मित्र वाटतो. या वर्षारंभी मी माझी पुस्तके पोर्तुगीज भाषेत अनुवादित करून वेबवर नि:शुल्क डिजिटल फॉर्म्यटमध्ये टाकली. अमेरिकेतही

आपली पुस्तके मी ऑनलाइनवर टाकली. कुठलेही शुल्क न देता ती वाचकांना वाचता येतील अशी सोय केली. त्याचा परिणाम काय झाला? न्यूयॉर्क टाइम्सच्या बेस्टसेलर्सच्या यादीत अल्केमिस्ट आणि दि विच ऑफ पोर्टोबेलो या दोन कादंबऱ्यांची नावे अनेक आठवडे झळकत राहिली. पहिले प्रकरण इंटरनेटवर वाचल्यावर, आपण संगणक घेऊन काही रेल्वेने वा बसने जाऊ शकत नाही, तेव्हा पुस्तकच घेणे इष्ट असे बहुसंख्य लोकांना वाटते. त्यामुळे पुस्तकांचा खप वाढला.''

यासारख्या अनुभवांमुळे पॉवलो कोएल्हो खूष दिसले.

यंदाच्या हीरक महोत्सवी फ्रँकफर्ट बुक फेअरने तुर्कस्थानला गेस्ट ऑफ ऑनर म्हणून घोषित केले होते. आपल्या भाषणात त्याने या गोष्टीचा उल्लेख करून म्हटले, ''माझ्या वेबसाईटचे काम एक तुर्क तज्ज्ञच पाहत आहे. त्याला माझी पुस्तके तुर्की भाषेतही वेबसाइटवर टाकण्याची तीव्र इच्छा आहे... त्यामुळे तुर्कस्थानातही माझे वाचक असणार आहेत.''

हे ऐकल्यावर अनेक प्रकाशकांना वाटले, एक लेखक हे सगळे करू शकतो. आपण तर व्यावसायिक प्रकाशक. निरनिराळ्या भाषांमध्ये आपली पुस्तके वेबसाइटवरून का सर्वत्र जाऊ नयेत? फ्रँकफर्टचा प्रभाव असा सर्वांना जाणवल्याशिवाय राहत नाही.

पुस्तकांच्या हक्काबाबतही फ्रँकफर्टमुळे मोठी उलाढाल होते.

'फर्मिन : ॲडव्हेंचर्स ऑफ ए मेट्रोपॉलिटन लोलाइफ' हे एका उंदराची गोष्ट सांगणारे पुस्तक. हा उंदीर बॉस्टनच्या एका बुकस्टोअरमध्ये राहतो. पुस्तके खातो, पुस्तकेच वाचतो, पुस्तकेच पचवतो. गेल्या वर्षी या पुस्तकाचे हक्क १० प्रकाशकांनी घेतले. त्या प्रकाशकांचे अनुभव एका सत्रात ऐकवण्यात आले. कॉफी हाऊस प्रेसने (मिनीपोलिस) हे पुस्तक अमेरिकेत प्रसिद्ध केले. बेताचाच प्रतिसाद मिळाला. त्या कंपनीतील हक्कविषयक एजंट सँड्रा ब्रुना हिने प्लॅनेटा ग्रुपच्या एलेना रेमिरेझ रिको या प्रकाशिकेला हे पुस्तक दाखवले. ही गोष्ट तर विश्वात्मक आहे. तिला जगभर वाचक मिळतील.'' असे एलेनाला वाटले. तिने या पुस्तकात मला स्वारस्य आहे, स्पॅनिश भाषेतील हक्कासाठी तिने ५००० युरो देण्याची तयारी आहे असे सँड्राला कळवले. एलेनाने या पुस्तकाची गोष्ट आपल्या एका कादंबरीकार मैत्रिणीला सांगितली. तिलाही ती आवडली. तेव्हा स्पॅनिशपुरतेच नव्हे तर जागतिक हक्क घेण्याचे तिने ठरवले ठरवले. त्यासाठी कॉफी हाऊसला आजवर कधीच मिळाली नव्हती एवढी रक्कम मिळाली. रेमिरेझने पुस्तक काढले. ते वाचून इंग्लंडमधील ओरायन, पोर्तुगालमधील, डॉन क्विक्झोंट, कॅटलन भाषेतील कोर्लुमना, जर्मनीतील उलरिका ऑस्टरमेयर यांनी रेमिरेझकडे हक्कांबद्दल विचारणा केली...

जर्मन हक्क घेऊन ऑस्टरमेयरने एका वर्षात ३ आवृत्त्या काढल्या. १७ हजार प्रती विकल्या.

इटालियन प्रकाशक पावलो रेपेट्टी याने इटालीतील अग्रगण्य लेखकांकडून ब्लर्बचा मजकूर लिहून घेतला. ट्युरिन बुक फेअरमध्ये पुस्तक लाँच केले. तीस हजार प्रती हातोहात गेल्या. त्यानंतर वर्षाच्या आत तीन लाख प्रती गेल्या. आणखी १७ क्षेत्रांचे हक्क रेमिरेझने विकले. फ्रँकफर्टमध्ये १४ ऑक्टोबर ला सर्बियातील प्रकाशकाने रेमिरेझला हक्काबद्दल विचारले. एका वर्षात काही लाख प्रती तीस-पस्तीस प्रकाशकांनी वेगवेगळ्या भाषात काढल्या, विकल्या.

फ्रँकफर्टमध्ये असे पुस्तकांच्या हक्काचे, अनुवादाचे व्यवहार शेकडोंनी होत असतात. त्यातील एका पुस्तकाचे हे प्रतिनिधिक उदाहरण...

देशांदेशांमधील सहकार्याचेही अनेक नमुने फ्रँकफर्टमध्ये आढळतात.

दि. १४ ऑक्टोबरला कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड येथील प्रकाशक संघटनांचे पदाधिकारी फ्रँकफर्टलाच छोटेखानी पण शिखर परिषदेत एकत्र आले. इंग्लिश भाषेचा या तीनही देशांत वापर होतो. या तीन देशांनी प्रकाशनाबाबत सहकार्य करून संयुक्तपणे काही प्रकाशने करण्याचा निर्णय घेतला. या तिन्ही देशांच्या राजदूतांनीही या शिखर परिषदेला उपस्थित राहून या निर्णयाचे स्वागत केले. असोसिएशन फॉर एक्स्पोर्ट ऑफ कनेडियन बुक्स, दि ऑस्ट्रेलियन पब्लिशर्स असोसिएशन, बुक पब्लिशर्स असोसिएशन ऑफ न्यूझीलंड या तीन संघटनांचे १२० प्रकाशक सदस्य या वेळी उपस्थित होते. या तीनही देशातील ग्रंथविषयक गरजांची माहिती एकमेकांना देणे, तिघांसाठी संयुक्त प्रकाशन प्रकल्प राबवणे, विक्री यंत्रणेबाबत सहकार्य करणे, तिघांनी संयुक्तपणे प्रकाशन हक्क मिळवणे, अमेरिका आणि ग्रेट ब्रिटन यांचे इंग्लिश पुस्तकांबाबत आज जे वर्चस्व आहे त्याला आव्हान देण्याचाच जणू या तीन देशांचा प्रयत्न आहे.

अमेरिका आज कॅनडाला गृहीत धरून चालते, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाला अजूनही इंग्लंड आपल्या वसाहतीसारखेच वागवते.

याबद्दलची नाराजी या तीन देशांनी संयुक्तपणे प्रकट करून इंग्लंड-अमेरिकेची इंग्लिश प्रकाशन क्षेत्रातली दादागिरी संपुष्टात आणण्याच्या दृष्टीने परस्पर सहकार्याची भूमिका स्वीकारली आहे. फ्रँकफर्टने या सर्वांना एकत्र आणण्यात आपली किमया निश्चितच प्रकट केली आहे.

उत्तर अमेरिका, ब्रिटन आणि कॉमनवेल्थ मधील हक्कांसाठी संयुक्तपणे वाटाघाटी करणे, ब्रिटिश-अमेरिकन प्रकाशकाशी स्पर्धा करणे, डिजिटल भविष्यासाठी आवश्यक ती आव्हाने स्वीकारणे यावरही या परिषदेत चर्चा झाली. लंडन बुक फेअरमध्ये (एप्रिल २००९) या पुढची बैठक घेण्याचाही निर्णय याचवेळी जाहीर करण्यात आला. ''या तीन बाजारांच्या एकत्रीकरणामुळे आपल्याला कल्पनाही करता येणार नाही इतक्या संधी उपलब्ध होणार आहेत, डिजिटल भविष्याला त्यामुळे अधिक


ताकदीने आपण सामोरे जाऊ शकू.'' असा आशावाद प्रकट करण्यात आला.

१४ ऑक्टोबरलाच संयुक्त राष्ट्रसंघाचे माजी सचीव शशी थरूर यांनी मुलींना वाचायला शिकवणे हे जगातील सर्वांत मोठे आव्हान आहे असे मत व्यक्त केले. एका मुलीला शिक्षण मिळाले तर तिच्यामुळे तिच्या कुटुंबात शैक्षणिक वातावरण निर्माण होते आणि तिच्या संपर्कामुळे संपूर्ण समाजातही शिक्षणविषयक जागृतीला चालना मिळते, असा विचार त्यांनी मांडला. त्यासाठी भारतातील काही उदाहरणे त्यांनी दिली. युनेस्कोच्या इ. स. २००६मधील पाहणीनुसार आज जगात ७७ कोटी निरक्षर लोक आहेत; त्यापैकी ६० कोटी हे फक्त १२ देशात आहेत. दक्षिण आणि पश्चिम आशिया, सहारा वाळवंटाचा आफ्रिकन भाग, अरब देश यात शिक्षणाचे प्रमाण फार अल्प आहे. आर्थिक विकास हा शैक्षणिक यशावर अवलंबून असतो. विविधता आणि विकास यादृष्टीने जग सुरक्षित होण्यासाठी शिक्षणप्रसाराची सर्वाधिक गरज आज आहे. 'फूटबॉल मीट्स कल्चर' या प्रकल्पाचाही त्यांनी गौरव केला.

स्वित्झर्लंडमध्ये जन्मलेल्या तारिक रामदान या वादग्रस्त मुस्लीम लेखकाचे भाषण पहिल्याच दिवशी इंटरनॅशनल सेंटरमध्ये ठेवण्यात आले होते. 'यूरोपातील इस्लाम' हा त्यांच्या भाषणाचा विषय होता. ''इस्लाम हा युरोपियन धर्म आहे. यूरोपमध्ये पिढ्यान्‌पिढ्या मुस्लीम राहत आहेत आणि यूरोपियन संस्कृतीचा अंगीकार त्यांनी केलेला आहे. आपल्या मातृभूमीशी ते पूर्णतया एकनिष्ठ आहेत आणि स्वातंत्र्याच्या भावनेशी ते मन:पूर्वक प्रामाणिक आहेत. मुस्लीमांनी आपल्या देशाचे कायदे पाळावेत. इस्लामने आपला धर्म आणि सामाजिक-राजकीय-आर्थिक समस्या यांची गल्लत करू नये. हे प्रश्न धर्मापेक्षाही मोठे आहेत. आपल्या आत्मप्रतिमेचा हा प्रश्न आहे. माझ्यापुरतेच बोलायचे तर माझा धर्म इस्लाम आहे, मी स्वित्झर्लंडचा नागरिक आहे. सांस्कृतिक दृष्टीने युरोपियन आहे, पूर्वजांच्या दृष्टीने इजिप्शियन आहे, तात्त्विक पातळीवर विश्वबंधुत्ववादी आहे आणि दत्तकाच्या पातळीवर मोरोक्कन आहे... संकुचित विचारांना माझ्या जीवनात, माझ्या मनात स्थान नाही.''

फ्रँकफर्ट बुक फेअर ही केवळ पुस्तकांच्या हक्कांची देवघेव करीत नाही. विश्वात्मक विचारांची, विश्वव्यापी स्नेहभावाचीही देवघेव करते. जागतिकीकरणाचा संदेश देते.

त्यामुळे तिला भेट देऊन आल्यावर नवनव्या कल्पनांची मनात गर्दी होते. नवनव्या योजनांचे संकल्प उत्साह वाढवितात.





# साहित्यवार्ता

*** 'पहिली फेरी'चे प्रकाशन**

राम प्रधान यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या रोजनिशीच्या आधारे लिहिलेल्या 'पहिली फेरी' या पुस्तकाचे प्रकाशन ना. शरद पवार यांच्या हस्ते झाले.

पवार म्हणाले, ''यशवंतराव चव्हाण उत्तम लेखक होते. ज्या कालखंडात ते देशाचे संरक्षणमंत्री होते, तो कालखंड अतिशय कठीण होता. संघर्षमय वातावरणात त्यांनी निर्णय घेतले. आधुनिक शस्त्रनिर्मितीसाठी त्यांनी विविध ठिकाणी शस्त्रनिर्मितीचे कारखाने काढले. द्वैभाषिक राज्यनिर्मितीसाठी त्यांनी देशाच्या नेतृत्वाचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या अथक प्रयत्न व योगदानामुळे महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. या ऐतिहासिक घटनेत त्यांचे चातुर्य व राजकीय हुशारी यांची कसोटी लागली होती.''

चीन हे दूरदर्शी राष्ट्र आहे, ते शत्रूला गाफील ठेवते. सध्या चीन आपल्या सक्षमीकरणाकडे अधिक लक्ष देत आहे, त्यामुळे संरक्षणदृष्ट्या आपल्याला पाकिस्तानपेक्षा चीनचा जास्त धोका आहे, असे ही मत शरद पवार यांनी व्यक्त केले.

पुणे विद्यापीठाच्या नॅशनल सेंटर ऑफ इंटरनॅशनल सिक्युरिटी अ‍ॅण्ड डिफेन्स अ‍ॅनॅलिसिस (निसदा) या केंद्राचे 'यशवंतराव चव्हाण नॅशनल सेंटर ऑफ इंटरनॅशनल सिक्युरिटी अ‍ॅण्ड डिफेन्स अ‍ॅनॅलिसिस (वाय.सी.निसदा) असे नामकरण पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री दिलीप वळसे पाटील, महापौर राजलक्ष्मी भोसले, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, कुलसचिव डॉ. माणिक जाधव, विकास मंडळाचे संचालक डॉ.

पंडित विद्यासागर, ‘निसदा’चे संचालक डॉ. अरुण दळवी, लेखक राम प्रधान उपस्थित होते.

विद्यापीठाच्या उद्योजकता व तंत्रज्ञ केंद्राचेही उद्घाटन झाले. विद्यापीठ सेवकांनी बिहार पूरग्रस्तांसाठी जमा केलेला दहा लाख रुपयांचा निधी कुलगुरूंनी पवार यांच्याकडे सुपूर्त केला.

राम प्रधान, वळसे पाटील, लेफ्टनंट जनरल (निवृत्त) अशोक जोशी यांची भाषणे झाली. कुलगुरू डॉ. जाधव यांनी प्रास्ताविक केले. उज्वला बर्वे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव माणिक जाधव यांनी आभार मानले.

*** ज्येष्ठ नागरिक हा समाजाचा ठेवा**

“निवृत्त झाल्यानंतर पुढे काय करायचे, असा विचार करून निराश होऊ नका. विरंगुळ्यासाठी समाजातील पीडित लोकांना आपापल्या परीने मदत करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करा,” असा सल्ला ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी दिला.

ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ‘अथश्री’ फाउंडेशनतर्फे हजारे यांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. परांजपे स्कीम्सचे व्यवस्थापकीय संचालक शशांक परांजपे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. अथश्री प्रतिष्ठानचे संचालक डॉ. शरच्चंद्र गोखले, ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ डॉ. विश्वास मेहेंदळे आदी उपस्थित होते. हजारे म्हणाले, “ज्येष्ठ नागरिकांवर वृद्धाश्रमात जाण्याची वेळ येते, हा आपल्या संस्कृतीवरचा कलंक आहे. ज्येष्ठ नागरिक हे समाजाचा ठेवा आहेत, त्यामुळे त्यांना सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे.”

*** आजच्या राजकीय कार्यकर्त्यांची ससेहोलपट**

नव्या पिढीतील कार्यकर्त्यांकडे वैचारिक भूमिकेचे अधिष्ठान असले तरच ते समाजहिताचे राजकीय काम करू शकतील, असे मत ज्येष्ठ विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान यांनी २ ऑक्टोबर रोजी व्यक्त केले.

‘साधना’ साप्ताहिक आणि एस. एम. जोशी सोशॅलिस्ट फाउंडेशनतर्फे एका कार्यक्रमात प्रधान यांच्या ‘भारतीय राजकारणाचे दोन पैलू : लोकशाही आणि समाजवाद’ या पुस्तकाचे प्रकाशन ताहेरभाई पूनावाला यांच्या हस्ते झाले. प्रा. अशोक चौसाळकर, प्रा. सुभाष वारे, सुनीती सु. र. आणि विनोद शिरसाट यांनी समाजवादी चळवळीविषयीचे मनोगत व्यक्त केले.

प्रधान म्हणाले, “राजकारणाला वैचारिक भूमिकेचे अधिष्ठान असावे, अशा पिढीत मी कार्यकर्ता म्हणून काम केले. आता वैचारिक भूमिकेचा काय संबंध, असे काहीजण उघडपणे बोलतात. जागतिकीकरणाच्या प्रवाहात वैचारिक भूमिका हा विचारच अप्रस्तुत असल्याची काहींची धारणा आहे. अशीच सर्वांची भूमिका असेल

तर हे लेखन म्हणजे माझे अरण्यरुदन ठरेल. हे लेखन म्हणजे तत्त्वचिंतन अशी माझी भूमिका नाही. ती एरवी माझ्या लेखनात आणि बोलण्यात असते. शिक्षकाच्या भूमिकेतूनच मी हे लेखन केले आहे.

''कालच्या समाजवादी चळवळीत मी प्रत्यक्ष सहभागी होतो. त्यामुळे आजच्या कार्यकर्त्यांची ससेहोलपट कशी होते, ते दाखविणे हे माझे कर्तव्य आहे. जनता पक्ष फुटून सरकार पडले; त्या वेळी समाजवादी पक्षाची पुन्हा स्थापना करण्याची भूमिका मधू लिमये यांनी मांडली होती. हे घडले असते तर कदाचित वेगळे चित्र दिसले असते. जनता दलातील फुटींमुळे समाजवादी चळवळ नामशेष झाली. हे दोष, आमच्यातील अपूर्णता याची जाणीव झाल्यावर नव्या रीतीने वाटचाल कशी करायची हा प्रश्न होता. त्याचे चिंतन मी लेखनातून मांडले आहे.''

*** टाकाऊ घटकांपासून घर बांधणे शक्य**

निसर्गाची हानी टाळण्यासाठी टाकाऊ लोखंडी वस्तू, पोती, वाळू यांपासून कमी खर्चात बनणाऱ्या घराची माहिती देणारे 'माती पोती' हे पुस्तक सौरभ फडके यांनी लिहिले आहे.

निसर्गातील घटकांचा वापर वाढविण्याऐवजी घरातल्या टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून अशा घटकांपासून एखादे घर बनवावे असे फडके यांनी ठरवले आणि त्यानुसार वाघोली येथील माधवी कपूर फाउंडेशनच्या 'अमन सेतू' या शाळेमध्ये टाकाऊ पोती, वाळू आणि जुन्या लोखंडी साहित्यापासून पर्यावरणपूरक सभागृहाची निर्मिती केली. सध्या तेथे विद्यार्थ्यांसाठी छंद वर्ग भरविण्यात येत आहेत.

याबद्दल माहिती देताना फडके म्हणाले, ''बांधकामादरम्यान सिमेंटची पोती; तसेच घराचा पाया घालताना काढलेली अनावश्यक माती फेकून देतात. अशी वाया गेलेली आठशे पोती माती, ग्रीट (स्टोन डस्ट) आणि जुन्या कुंपणाच्या तारा, लोखंडी पाइप गोळा केले तर यातून सुंदर घराची निर्मिती होऊ शकते. माती, वाळू आणि थोडेसे सिमेंट यांचे पाणी घातलेले मिश्रण विटांऐवजी या पोत्यांत भरले तर जाड भिंती तयार होतात. भविष्यात ते फाटू नये म्हणून त्यावर प्लॅस्टर करावे लागते आणि छप्पर म्हणून प्रक्रिया केलेला बांबू वापरला तर फार खर्च येत नाही. यावर ऊनपावसाचाही परिणाम होत नाही. ही माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी या हेतूने हे पुस्तक मराठी आणि हिंदी भाषेत लिहिले आहे. २ ऑक्टोबरला 'मॅनिज बुक्स' (कॅम्प) येथे ते प्रकाशित करण्यात आले. www.mkf.in या संकेतस्थळावर या पुस्तकाची प्रत उपलब्ध असून त्याची 'प्रिंट' मोफत काढता येणार आहे.

*** पत्रकारांवरील हल्ला हा दखलपात्र गुन्हा**

''पत्रकारांवर होणारे हल्ले हे दखलपात्र गुन्हे मानले जातील. तशी कायद्यात दुरुस्ती करू,'' अशी घोषणा उपमुख्यमंत्री आर.आर. पाटील यांनी २ ऑक्टोबरला केली.

महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघातर्फे आयोजिलेल्या अधिवेशनाच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे या नात्याने पाटील म्हणाले, ''मुंबई पोलिस ॲक्टमध्ये आवश्यक ते बदल करावे लागतील. ते बदल करण्यात येतील आणि पत्रकारांना संरक्षण दिले जाईल. पत्रकारांवरील हल्ले आम्ही मान्यच करणार नाही. माध्यमे गतिमान झाली आहेत. एखाद्या ठिकाणी हल्ला झाला तरी त्याची बातमी वेगाने पसरते. चोवीस तास बातम्या देणारा नवा वर्ग तयार झाला आहे; मात्र पत्रकारांनी प्रश्न विचारतानाही त्या क्षमतेने विचारले पाहिजेत. ज्यांना विचारतो, त्यांचा अनुभवही बघितला पाहिजे.''

वेतन आयोग, घरकुल योजना, निवृत्तिवेतन व विमा योजना यांसह विविध स्वरूपाचे १३ ठराव मंजूर करण्यात आले.

*** अनुवाद अकादमी**

जगण्यासाठी प्रत्येकाला तीन भाषा यायलाच हव्यात; तेव्हाच मराठीचेही भले होईल, असे मत ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी अक्षरभारती आणि आबासाहेब गरवारे महाविद्यालयातर्फे आयोजित अनुवादविषयक चर्चासत्रात व्यक्त केले. संस्थेच्या 'अनुवाद अकादमी'चे उद्‌घाटन यमाजी मालकर यांच्या हस्ते झाले.

ज्येष्ठ कवी डॉ. विठ्ठल वाघ यांच्या 'पुरुषसूक्त' या कवितासंग्रहाच्या डॉ. गजानन चव्हाण यांनी केलेल्या हिंदी अनुवादाचे प्रकाशन जाधव यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीकांत गुप्ता, हिंदी विभागप्रमुख प्रा. शैलजा मांडके, सोलापूरच्या सुविद्या प्रकाशनचे बाबूराव मैंदर्गीकर, प्रा. रंगनाथ तिवारी आणि माधव राजगुरू या वेळी उपस्थित होते.

मालकर म्हणाले, ''वैज्ञानिक प्रगती आणि जागतिकीकरणाच्या दबावामुळे 'अनुवाद युगा'चे महत्त्व वाढले आहे. भाषांच्या विकासासाठी अनुवादाची चळवळ व्यापक झाली पाहिजे.'' या वेळी ज्येष्ठ कवी हरिनारायण व्यास, मुरलीधर जगताप, डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर, डॉ. स. म. परळीकर, रमेश मुधोळकर, प्राचार्य स. मो. शहा, डॉ. प्रमोद लाळे या अनुवादकांचा सत्कार करण्यात आला. चर्चासत्रात डॉ. चेतन ठकार, डॉ. अनिकेत जावरे, डॉ. दामोदर खडसे, उमा कुलकर्णी यांनी अनुवादाविषयीचे अनुभव मांडले.

*** आनंदवनात गुलजार**

ज्येष्ठ गीतकार गुलजार यांनी १७ सप्टेंबरला आनंदवनाला भेट दिली. त्यांच्यासोबत दूरदर्शन कलावंत किशोर कदम आणि आशुतोष शेवाळकर होते. गुलजार यांनी आनंदवनातील विविध प्रकल्पांची पाहणी केली. स्वरानंदवन ऑर्केस्ट्राचा आस्वाद घेतला. अंध-अपंग कुष्ठरोगी कलाकारांनी गायलेली गाणी ऐकली. डॉ. भारती आमटे यांनीही गीते सादर केली. साधनाताईंचीही त्यांनी भेट घेतली. या वेळी साधनाताईंनी गुलजार यांना बाबांची पुस्तके भेट दिली.

चित्रपटातील गाणी बाजूला सारून चांगल्या शायरी, कविता, शास्त्रीय संगीत, हिंदुस्थानी लोकसंगीताचे सादरीकरण स्वरानंदवनच्या कलाकारांनी करावे, हृदयाला हात घालणारे गीत-संगीत पुढे येऊ द्या, असे आवाहन गुलजार यांनी केले. आनंदवनात कोणीही 'हँडिकॅप' नाही. त्यामुळे त्यांच्याविषयी न्यूनगंड बाळगण्याचे कारण नाही, असेही ते म्हणाले.

### * न्यायालयीन कामकाज आणि प्रसारमाध्यमे

न्यायदान आणि प्रसारमाध्यमे हे लोकशाहीचे महत्त्वपूर्ण स्तंभ आहेत. म्हणूनच खटल्यांच्या सनसनाटीपूर्ण बातम्या प्रसिद्ध करताना प्रसारमाध्यमांनी तारतम्य बाळगावे, असे आवाहन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दलवीर भंडारी यांनी २७ सप्टेंबर रोजी सिंबायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीत केले. महाराष्ट्राचे मुख्य न्यायमूर्ती स्वतंतेर कुमार, संस्थेचे अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार, प्रधान संचालक डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. एम. एस. रास्ते उपस्थित होते.

'न्यायदानाबाबत प्रसारमाध्यमांची भूमिका' या विषयावर बोलताना भंडारी यांनी अनेक खटल्यांची आणि त्यांच्या प्रसिद्धीची उदाहरणे दिली. दिल्लीत नुकत्याच घडलेल्या आरुषी हत्येचाही त्यात समावेश होता. ते म्हणाले, ''अनेक गाजलेले खटले निकालाच्या टप्प्यात असतानाच प्रसारमाध्यमे तपासणी अधिकारी आणि वकिलांच्या थेट मुलाखती प्रसिद्ध करून न्यायाधीशांपुढे संभ्रम निर्माण करतात. या मुलाखती सर्वसामान्य नागरिकांच्या संवेदनशील मनावर परिणाम करतात. मात्र न्यायाधीशांना यात सहभागी होता येत नसल्याने त्यांच्या निकालपत्राची चिरफाड होते.''

### * घटस्फोटामुळे अपत्यांचे आयुष्य उद्ध्वस्त

घटस्फोटामुळे पती-पत्नी विभक्त होतात, पण त्यांच्या मुलांचे आयुष्य उद्ध्वस्त होते. घटस्फोट हा सर्वांत शेवटचा पर्याय आहे, याची जाणीव पतिपत्नींनी ठेवावी असा सल्ला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायाधीश पी. व्ही. हरदास यांनी दिला.

रोटरी क्लब ऑफ पुणे गांधी भवन आणि कौटुंबिक न्यायालयातील समुपदेशकांच्या संघटनेच्या वतीने 'विवाहपूर्व आणि विवाहानंतरचे प्रश्न' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन न्यायाधीश हरदास यांच्या हस्ते झाले. या वेळी न्यायाधीश व्ही. व्ही. बोरीकर, श्रीकांत महाजन, ॲड. वैशाली भागवत, ॲड सीमा फडणीस, राजेंद्र तातर उपस्थित होते.

विवाह म्हणजे सहजीवनाचा करारच होय, असे स्पष्ट करीत न्यायाधीश हरदास यांनी घटस्फोट आणि पति-पत्नीतील वादासंबंधीचे दावे दाखल होण्याच्या वाढत्या

प्रमाणाविषयी चिंता व्यक्त केली. चांगल्या कुटुंबातून समाज आणि राष्ट्र घडते. त्यामुळे विवाहव्यवस्थेला महत्त्वाचे स्थान आहे. पति-पत्नी हे या कुटुंबातील महत्त्वाचे घटक असून, घटस्फोटामुळे ते विभक्त होतात. पण त्यांच्या मुलांचे यात मानसिक नुकसान होते. बदलती जीवनशैली, व्यावसायिक स्पर्धा यामुळे पति-पत्नीतील तणाव आणि घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे. घटस्फोट हा सर्वांत शेवटचा पर्याय आहे असेही ते म्हणाले.

## * सर्व्हे ऑफ इंडियाचे नकाशांकडे दुर्लक्ष

सर्व्हे ऑफ इंडियाच्या पुण्यातील विभागीय कार्यालयात तीन कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे नकाशे धूळ खात ठेवले आहेत. यात २५० पेक्षा अधिक प्रकारचे स्थळाकृती नकाशे तसेच प्रतिबंधित क्षेत्रांचे नकाशेही आहेत. सरकारी अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे कोट्यवधी रुपयांच्या नकाशांचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

नियमांनुसार नकाशे हाताळण्याची जबाबदारी राजपत्रित अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात येते. मात्र येथे नकाशांची हाताळणी तृतीय दर्जाचे कर्मचारी करतात.

महाराष्ट्र व गोवा राज्याच्या विभागीय कार्यालयात दोन्ही राज्यांच्या जिल्ह्यांची भौगोलिक माहिती असलेले नकाशे 'सर्व्हे ऑफ इंडिया'कडे आहेत. यात नद्या, धरणे, रल्वे, रस्ते, महामार्ग, डोंगररांगा, गावे, शहरे अशा सर्व स्थळांचा समावेश आहे.

राज्यातील सर्व शहरांच्या सीमा रेषांचे स्थळाकृती नकाशे सर्व्हे ऑफ इंडियाकडे उपलब्ध आहेत. या नकाशांची छपाई १९७० मध्ये झाली असून काही नकाशांच्या प्रती संपल्या आहेत. त्यामुळे मूळ किंमत २९ रुपये असताना ग्राहकाला ८९५ रुपये देऊन नकाशा मिळवावा लागतो.

प्रतिबंधित क्षेत्रे, देशाच्या सीमारेषा, समुद्रकिनारा, हवाई दलासाठी महत्त्वाचे, सैन्यदलाची प्रशिक्षण ठिकाणे आदी नकाशांची संख्या सुमारे ३५ हजार असून त्यांची बाजारातील किंमत तीन कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे.

## * साप्ताहिक सकाळचा वर्धापन दिन

''अण्वस्त्रांबद्दल भारतीयांमधील मानसिक द्वंद्व दूर होण्यास अणुकरारामुळे मदत होईल. मात्र संपूर्ण अण्वस्त्रमुक्तीचे ध्येय विसरून चालणार नाही,'' असे प्रतिपादन 'इंडिया टुडे'चे व्यवस्थापकीय संपादक आणि संरक्षणविषयक प्रश्नांचे नामवंत अभ्यासक राज चेंगप्पा यांनी १ ऑक्टोबर रोजी केले. भारताचा आण्विक वनवास संपविण्यासाठी आणि ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी अणुकरारांचा फायदा होईल, असेही त्यांनी नमूद केले.

'साप्ताहिक सकाळ'च्या २१ व्या वर्धापनदिनानिमित्त 'न्यूक्लिअर डील : व्हेअर वुई गो फ्रॉम हिअर?' या विषयावर भाषण झाले. 'सकाळ'चे अध्यक्ष प्रतापराव

पवार, 'साप्ताहिक सकाळ'चे संपादक सदा डुंबरे या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून महात्मा गांधी यांचे अहिंसेचे तत्त्वज्ञान, पंडित नेहरू यांचे विज्ञान-तंत्रज्ञान प्रसाराचे आणि स्वयंपूर्णतेचे धोरण, हिरोशिमा-नागासकीमधील विध्वंस, पोखरणमधील अणुचाचणी यांचा चेंगप्पा यांनी आढावा घेतला; तसेच भारताचा अणुकार्यक्रम, क्षेपणास्त्र विकास कार्यक्रम यावरही त्यांनी प्रकाशझोत टाकला. ते म्हणाले, ''अण्वस्त्रांबद्दलची द्विधा मन:स्थिती यामुळे दूर होईल. कारण देशाने फक्त प्रतिकारक्षमता सिद्ध करण्यापुरताच अणुकार्यक्रमाचा वापर केला आहे.''

चेंगप्पा म्हणाले, ''अणुकराराबद्दल देशात परस्परविरोधी मते मांडण्यात येत आहेत. देशाला ऊर्जेची टंचाई असून, विकासासाठी ऊर्जेची तीव्र गरज आहे. अणुऊर्जा प्रदूषणविरहित आहे. देशाच्या संरक्षणविषयक कार्यक्रमास यामुळे बळकटी मिळेल आणि जागतिक महासत्ता होण्यासाठी या अणुकराराचा उपयोग होईल, अशी मते कराराच्या समर्थकांकडून मांडण्यात येत आहेत, तर दुसरीकडे देशात अणुऊर्जेचा वापर केवळ तीन टक्के आहे, या करारामुळे स्वदेशी तंत्रज्ञानाचा विकास मागे पडेल, असे आक्षेप विरोधकांकडून नोंदविण्यात येत आहेत; परंतु देशाला ऊर्जेची तीव्र निकड आहे, हे सत्य आहे आणि शेजारी पाकिस्तान व चीन ही अण्वस्त्रधारी राष्ट्रे असताना भारताला हे धोरण उपयोगी ठरणार आहे.''

या वेळी साप्ताहिक सकाळच्या कथास्पर्धेतील विजेते संतोष शिंत्रे, भालचंद्र अकोलकर, सुचेता कडेठाणकर आणि रायभान दवंगे यांना पुरस्कार देण्यात आले.

### * 'तोचि आवडे' भजनाच्या सुरांत प्रकाशन

प्रसिद्ध गायिका आरती अंकलीकर-टिकेकर यांनी गायलेल्या 'एक सूर चराचर छायो' या भजनाच्या सुरांतच त्यांच्या हस्ते 'तोचि आवडे' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

'उत्कर्ष प्रकाशन'तर्फे सुधाकर जोशीलिखित 'तोचि आवडे' या पुस्तकाचे प्रकाशन अंकलीकर यांच्या हस्ते आणि 'अभि वन टू थ्री' या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन गंगाधर महांबरे यांच्या हस्ते झाले. 'सकाळ'चे संपादक (फीचर्स) मल्हार अरणकल्ले, समीक्षक शंकर सारडा, प्रकाशक सु. वा. जोशी आणि हेमलता जोशी या वेळी उपस्थित होत्या. जोशी यांनी आपला मुलगा अभिजित याच्या अकाली निधनानंतर त्याच्या आठवणींवर आधारित हे पुस्तक लिहिले आहे.

महांबरे म्हणाले, ''अभिजित हे अभिजात व्यक्तिमत्त्व होते. त्याच्या स्मृतींवर आधारित पित्याने सांगितलेली ही कहाणी काळीज हेलावणारी आहे.''

अरणकल्ले म्हणाले, ''कभिन्न अंधारात प्रकाशाचा शोध घेणाऱ्या माणसाचे दर्शन या पुस्तकात घडते. अस्तित्व असणे आणि ते पुसले जाणे यातील अंतर जोशी यांनी मांडले आहे.''

सारडा म्हणाले, ''या पुस्तकात अनुभवांची दाहकता आणि लेखनातील सच्चेपणा आहे.'' जोशी म्हणाले, ''मुलाच्या अकाली निधनाचे दु:ख उगाळण्यासाठी हे लेखन केलेले नाही, तर जिव्हाळ्याच्या माणसांशी तुटलेला संवाद जुळावा हा उद्देश आहे.'' सु. वा. जोशी यांनी प्रास्ताविक केले.

*** नदीसफाईबाबत सहावीतल्या मुलाचा अभ्यासप्रकल्प**

शहर स्वच्छतेबाबत शालेय विद्यार्थीही किती जागरूक होऊ लागले आहेत, हे विद्यार्थ्यांनी हाती घेतलेल्या अभ्यासप्रकल्पांवरून लक्षात येते. 'अक्षर नंदन' या शाळेतील सुश्रुत धनंजय ठकार या विद्यार्थ्याला गेल्या वर्षी सहावीत असताना होमी भाभा परीक्षेसाठी तयार केलेल्या अभ्यासप्रकल्पासाठी रौप्यपदक मिळाले आहे.

घरांमध्ये व विशेषत: रुग्णालयांमध्ये फरशा पुसणे, स्वच्छतागृहे धुणे वगैरे कामांसाठी फिनेलचा वापर केला जातो. नंतर हे पाणी सांडपाण्याच्या मार्गाने नदीत जाते. 'फिनेलमध्से क्रिसॉलिक ॲसिड असते. फिनेलच्या मटेरियल सेफ्टी डेटा शीट (एमएसडीएस) मध्ये असलेले द्रवपदार्थ सांडपाण्यात सोडू नये तर अथवा भूजलात मिसळू देऊ नयेत, असा नियम आहे. कारण क्रिसॉलचे जैविक विघटन होत नाही.'

सुश्रुतने सात रुग्णालयांचा अभ्यास केला. रुग्णालयांमध्ये या नियमाकडे सर्रास दुर्लक्ष केले जाते असे त्याला आढळून आले. क्रिसॉलचे जैविक विघटन न झाल्यामुळे हे कण पाण्यात जसेच्या तसे राहून पाणी प्रदूषित करतात. पाणी प्रदूषणाच्या अनेक कारणांपैकी फिनेल हे एक आहे. पाणी प्रदूषणाचे विविध प्रकारचे घातक परिणाम होतात. त्यामुळे जैविक विघटन शक्य असलेला पर्याय आपण फिनेलला देऊ शकतो का हा प्रश्न उभा राहिला.

त्याने कडुलिंब, तुळस, रिठा आणि शिकेकाई वगैरे वनस्पतींचे अर्क काढले. सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी पोषक परिस्थिती असलेल्या आगार प्लेटवर फिनेल तसेच या अर्कांचे ठिपके ठेवून २४ ते ४८ तासांनी त्यांचे निरीक्षण केले. त्यातील सूक्ष्म जंतूंच्या वाढीचा आकार व संख्या बघून त्याने असा निष्कर्ष काढला की वर सांगितलेल्या वनस्पतीचे अर्क फिनेलला पर्याय होऊ शकतात. फिनेल व वनस्पती अर्कांमध्ये बुडवलेल्या मूग व आळिवाच्या बियाही सुश्रुतने तीन कुंड्यांमध्ये पेरल्या. (संपर्क - २५३८४८४५).

*** 'इंटेलिजेंट क्लासरूम प्रोजेक्ट'**

कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या चैतन्य इंग्रजी माध्यमाच्या शाळेत 'इंटेलिजेंट क्लासरूम प्रोजेक्ट' हा उपक्रम राबवला जात आहे. लॅपटॉपच्या साह्याने दृकश्राव्य सादरीकरणाद्वारे प्रत्येक विषय शिकविणे, असे या उपक्रमाचे स्वरूप आहे.

कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष वालचंद संचेती, मानद सचिव मोहिनी

तेलंग, शाळेच्या मुख्याध्यापिका एस. पी. परदेशी व अन्य शिक्षक या प्रसंगी उपस्थित होते. संचेती म्हणाले, ''या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वर्गात दृकश्राव्य माध्यमातून सर्व विषय शिकता येणार आहेत. विद्यार्थ्यांना आवडेल आणि समजेल अशा स्वरूपात प्रत्येक विषयाचे सादरीकरण तयार करण्यात आले आहे.

### * 'सिंबायोसिस'ची चरित्रकथा मराठीत

''पारंपरिक उच्चशिक्षण घेत असतानाच त्याला आधुनिकतेची जोड देण्यासाठी राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील बुद्धिवंतांनी एकत्रित येऊन विचार करण्याची गरज आहे,'' असे मत कोल्हापूरचे श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांनी व्यक्त केले.

'सिंबायोसिस'चे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी लिहिलेल्या 'सिंबायोसिस - एका संकल्पनेची चरित्रकथा' या मराठी अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते झाले. या वेळी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य बाळ गाडगीळ, राज्य माहिती आयोगाचे आयुक्त विजय कुवळेकर, सिंबायोसिस अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम. एस. रास्ते, 'वनराई'चे अध्यक्ष डॉ. मोहन धारिया, मॅकमिलन प्रकाशनाचे राजीव बेरी उपस्थित होते.

शाहू महाराज म्हणाले, ''सिंबायोसिसचा प्रवास उलगडणारे हे पुस्तक समाजासाठी प्रेरणादायी आणि दिशादर्शक आहे. ज्या काळात 'ग्लोबल एज्युकेशन' हा शब्द अनेकांच्या शब्दकोशातही नव्हता, त्या काळात मुजुमदार यांनी आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी केलेली धडपड या पुस्तकातून अनुभवायला मिळते.''

कुवळेकर म्हणाले, ''मुजुमदार यांनी आत्मचरित्र न लिहिता संकल्पनेवर आधारित चरित्र लिहिले आहे. प्रतिकूल परिस्थितीचे कटू अनुभव मांडत असतानाच नव्या वाटा शोधण्यासाठी परिस्थितीचा कसा उपयोग केला, हेही नमूद केले आहे.''

'मॅकमिलन'च्या दीपाली चौधरी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### * नद्यांचे योग्य व्यवस्थापन हवे

पुराचे नियंत्रण करण्यापेक्षा नद्यांचे योग्य व्यवस्थापन करण्याची गरज आहे. सध्या बिहारमध्ये कोसी नदीला आलेला पूर मानवनिर्मित आहे. नदीवर चालू असलेले प्रकल्पाचे काम तातडीने थांबवल्यास काही काळाने पूर परिस्थिती नियंत्रणात येऊ शकते, असे मत शांततामय समाज संस्थेचे कलानंद मणी यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले, यावेळी अफार्मचे अध्यक्ष डॉ. मुकुंद घारे उपस्थित होते.

नद्यांवर ठिकठिकाणी टाकण्यात आलेल्या बांधांमुळेच सगळीकडे पूर येत असल्याचे मणी यांनी नमूद केले. अतिवृष्टीमुळे नद्यांना येणारे पूर आटोक्यात आणायचे असतील तर पाण्याला वाहते करायला हवे. पाण्याला बांध घालून, धरणे बांधून अडवले नाही तर पूर निसर्गत: आटोक्यात येतील, असे त्यांनी

सांगितले.

कोसी नदीवरच्या प्रकल्पाअंतर्गत २० मेगावॅट विजेची निर्मिती अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र फक्त चार मेगावॅट निर्मिती होत आहे. १०० कोटींच्या प्रोजेक्टमुळे आता मदतीपोटी नऊ हजार कोटी खर्च करण्याची वेळ आली आहे असे घारे म्हणाले.

कोसी नदीला आलेल्या पुरामुळे मोठ्या प्रमाणात हानी झालेली असतानाही केंद्र सरकारचा आपत्ती निवारण कार्यक्रम ही समस्या सोडविण्यात पूर्णत: कुचकामी ठरला आहे, अशी टीका ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांनी केली.

### * 'ग्लूम टू ग्लोरी'चे प्रकाशन

'मेरा जीवन एक खुली किताब है। इसमें कुछ भी छिपाने जैसा नही है। जो है वो आपके सामने है,' असे भावपूर्ण प्रतिपादन 'चक दे इंडिया'चे खरे नायक मीरंजन नेगी यांनी केले.

दिल्ली एशियाडच्या वेळी खलनायक ठरलेल्या आणि 'चक दे इंडिया' चित्रपटामुळे सार्थपणे नायक म्हणून नावारूपाला आलेल्या नेगी यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन मुंबईत १५ सप्टेंबर रोजी हॉकीचा 'ब्रँड अँबेसिडर' व अभिनेता सुनील शेट्टी यांच्या हस्ते झाले. 'ग्लूम टू ग्लोरी' हे केवळ औपचारिक आत्मचरित्र आहे. तसे पाहिले तर त्याचे लेखन लहानपणापासूनच सुरू होते. मला 'डायरी' लिहिण्याची सवय आहे. भारतीय संघातील पहिली निवड, पहिले सराव शिबिर, आशियाई स्पर्धा, ड्रेसिंग रूममधील 'टेन्शन', अशा अनेक आठवणी मी टिपून ठेवायचो. याशिवाय एक 'स्क्रॅप बुक'ही ठेवले होते. माझ्याविषयी वेळोवेळी आलेले लेख, छायाचित्रे यांची वृत्तपत्रातील कात्रणे त्यात आहेत. त्यामुळे आत्मचरित्र लिहिणे सोपे गेले. डायरी आणि 'स्क्रॅप बुक'चा मिलाफ या १८० पानी पुस्तकात आहे.

पुस्तक जास्त लोकांनी वाचावे म्हणून पॉप्युलर प्रकाशनने किंमतही दीडशे रुपये इतकी कमी ठेवली आहे. एका दिवसात पुस्तक वाचता येईल,'' असे त्यांनी सांगितले.

'चक दे इंडिया' चित्रपटात महिला हॉकीपटूंची भूमिका केलेल्या सर्व मुली प्रकाशन सोहळ्याला आवर्जून उपस्थित होत्या.

### * डिजिटल क्रांतीत मराठी

''मराठी माणूस आज जगात सर्वत्र आपल्या कर्तृत्वाने यशाची नवनवी शिखरे पादाक्रांत करीत आहे. उपग्रहाद्वारे चित्रपट हस्तांतराचे तंत्र शोधून डिजिटल क्रांती घडविणारा माणूस मराठी असल्याने आपली मान अभिमानाने उंच झाली आहे,'' असे उद्‌गार मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी ता. २७ सप्टेंबर रोजी लंडन येथे काढले. लंडनच्या महाराष्ट्र मंडळाच्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित

कार्यक्रमात महाराष्ट्र मंडळाच्या सामाजिक कार्यासाठी मुख्यमंत्र्यांनी १५ लाख रुपयांची देणगी जाहीर केली. त्यांच्या हस्ते ज्येष्ठ क्रिकेटपटू अजित वाडेकर आणि चित्रपट हस्तांतरात डिजिटल क्रांती घडविणारे संजय गायकवाड यांना विशेष पुरस्कार देण्यात आला.

मुख्यमंत्री म्हणाले, ''डिजिटल मीडियाच्या क्षेत्रात क्रांती घडविणाऱ्या संजय गायकवाड या 'मेड इन इंडिया' तरुणाचा बोलबाला आज जगात सर्वत्र आहे. हा तरुण मराठी असल्याने आम्हा सर्वांची मान आणि शान उंचावली आहे.''‘विजयाची परंपरा सुरू करणारा कर्णधार' असे अजित वाडेकर यांचे वर्णन मुख्यमंत्र्यांनी केले. संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. यू. म. पठाण यांच्या घरी जाऊन तसेच बाबा आमटे यांना देण्यात आलेला महाराष्ट्र मंडळाचा पुरस्कार आनंदवनात जाऊन त्यांच्या कुटुंबीयांकडे सुपूर्द करू, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले.

*** लोणावळ्यात रेल्वे वस्तुसंग्रहालय**

लोणावळा स्थानकापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या रेल्वेच्याच १७ एकर जागेत मध्य रेल्वेकडून येत्या दोन वर्षांत भव्य वस्तुसंग्रहालयाची उभारणी केली जाणार आहे.

११ कोटी ६० लाख रुपयांची प्राथमिक गुंतवणूक असलेल्या या संग्रहालयाची जागतिक पातळीवरील सर्वांत मोठ्या संग्रहालयांमध्ये गणना होऊ शकेल. भारतात पहिली रेल्वेगाडी धावली ती पूर्वीचे बोरीबंदर आणि ठाणे स्थानक यांच्या दरम्यान. त्या वेळी वाफेच्या इंजिनावर चालणारी गाडी पाहण्यासाठी एकच गर्दी उसळली होती आणि रेल्वेचे संपूर्ण वेळापत्रक वर्तमानपत्रात झळकले होते. सीएसटी स्थानकाबाहेरून दिसणारी गाडी आणि बॅलार्ड इस्टेट येथे असलेले स्थानक काळाच्या ओघात निघून गेले. मात्र छायाचित्रांच्या आणि लेखांच्या माध्यमातून हा सर्व वारसा आता नागरिकांसाठी खुला करण्यासाठी मध्य रेल्वेने वस्तुसंग्रहालयाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. दिल्ली येथे राष्ट्रीय आणि चेन्नई, कोलकत्ता आणि नागपूर येथे विभागीय स्तरावरील संग्रहालय सुरू होऊनही देशातील पहिली रेल्वेगाडी धावलेल्या मध्य रेल्वेवर असे संग्रहालय नव्हते. मात्र मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापक सौम्या राघवन यांनी हा प्रकल्प मार्गी लावला.

*** संगीतकार खय्याम यांचा सत्कार**

''चित्रपटसृष्टीत 'व्यावसायिक' तत्त्वावर काम करत असताना मी माझ्याच 'अंदाज'मध्ये काम केले. आपल्या कामातील दर्जा कायम रहावा, असा आग्रह धरला,'' असे विचार ज्येष्ठ संगीतकार खय्याम यांनी २४ सप्टेंबर रोजी पत्रकारांशी बोलताना मांडले. 'सच्चे सूर के लिये मराठी लोग आँख बिछाते है,' अशा शब्दांत त्यांनी येथील रसिकतेचा गौरव केला.

सांगीतिक कारकिर्दीची साठ वर्षे पूर्ण करणाऱ्या खय्याम यांच्या रचनांचा विशेष कार्यक्रम ता. २५ सप्टेंबर रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सादर करण्यात आला. खय्याम यांचा सत्कार; तसेच स्मरणिका प्रकाशनही या वेळी झाले.

''साठ वर्षे या क्षेत्रात काम केल्यावर आजही मला 'ऑफर' येतात, याचे समाधान वाटते आणि आपण चांगले काम केल्याची ही पावतीही वाटते,'' असे सांगून खय्याम म्हणाले, ''मी मोजके पण दर्जेदार काम केले. माझी गाणी रसिक आजही आठवतात, गुणगुणतात. रसिक श्रोते हीच माझी ताकद आहे. माझ्या तत्त्वांवर ठाम राहून मी काम केले. प्रसंगी त्यासाठी मोठ्या बॅनरचे चित्रपटही नाकारले. काही लोकांची नाराजी ओढवून घेतली. 'लोकप्रियता' आणि 'दर्जेदार काम' यात मी नेहमी फरक केला. त्यामुळे 'उमराव जान', 'रझिया सुलतान', 'कभी कभी'सारखे संगीत निर्माण होऊ शकले.''

''भारतीय संगीत हा महासागर आहे. इथल्या जन्माला, जगण्याला आणि मरण्यालाही संगीताचा संदर्भ आहे. सुदैवाने मला उत्तम गायक, वादक आणि कवी भेटले. त्यामुळेही माझा 'दर्जा' टिकवून ठेवण्यास मदत झाली. उत्तम काव्याला उत्तम सुरांची जोड मिळाली. तरच 'मास्टरपीस' निर्माण होतो, हा अनुभव मी अनेकदा घेतला आहे. चित्रपटांप्रमाणेच गैरफिल्मी गाणीही खूप केली. ती गाजली. सध्याचे वाहिन्यांवरील 'शो' लाटांसारखे आहेत. ते येतात, क्षणकाल चमकतात आणि लाट ओसरावी तसे विस्मरणात जातात. जे सुंदर आहे, अभिजात आहे तेच काळावर मात करून टिकते,'' अशी जाणीवही त्यांनी करून दिली.

### * जागतिक हृदय दिन

''हृदयाच्या शस्त्रक्रियेनंतरही चांगले जीवन जगता येते. शस्त्रक्रियेमुळे खचून न जाता सकारात्मक विचार करून पूर्ववत कामाला लागले पाहिजे. त्यासाठी नियमित व्यायाम आणि वैद्यकीय तपासणीची आवश्यकता आहे,'' असे प्रतिपादन 'सकाळ'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी २८ सप्टेंबर रोजी केले.

'जागतिक हृदय दिना' निमित्ताने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या माई मंगेशकर कार्डियाक सेंटरतर्फे हृदय शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांसाठी 'मिनी वॉकेथॉन' स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात स्पर्धेचा समारोप झाला. त्यानंतरच्या कार्यक्रमाला प्रसिद्ध बॅडमिंटनपटू नंदू नाटेकर आणि प्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रतापराव पवार म्हणाले, ''व्यायामाला वेळ मिळत नाही, ही व्यायाम न करण्याची सबब आहे. व्यायाम केल्याने कामावरही चांगला परिणाम होतो. नियमित व्यायाम करूनही हृदय शस्त्रक्रिया होण्याची शक्यता असते. हृदयविकाराचे संकेत आपल्याला मिळत असतात. ते संकेत समजत नाहीत किंवा त्याकडे दुर्लक्ष केले

जाते. त्यामुळे शस्त्रक्रिया करावी लागते. शस्त्रक्रियेनंतर सकारात्मक विचार करून पुढील वाटचाल केली पाहिजे. शरीराची रचना अत्यंत गुंतागुंतीची असते. त्यामुळे रोगनिदान अचूक न झाल्यास डॉक्टरांना दोष देऊ नये.''

श्री. नाटेकर म्हणाले, ''बॅटमिंटन खेळताना झालेल्या किरकोळ दुखापतीशिवाय कोणतेही मोठे दुखणे मला झाले नव्हते. नियमित व्यायाम असूनही हृदय शस्त्रक्रिया करावी लागली.''

श्री. दामले म्हणाले, ''कामाचा ताण हे हृदयविकाराचे प्रमुख कारण सांगितले जाते. मात्र, आवडीचे काम करताना कामाचा ताण वाटत नाही. मनाविरुद्ध काम करावे लागल्यास त्याचा मानसिक त्रास होतो. अशा वेळी सुवर्णमध्य काढण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.''

वॉकेथॉन स्पर्धेत पुरुष गटात लक्ष्मण पोंढरे यांनी पहिला क्रमांक मिळविला. प्रदीप काकडे यांनी दुसरा, तर सुहास कोल्हटकर यांनी तिसरा क्रमांक मिळविला. महिलांच्या गटात सविता म्हाळगी यांनी, तर लहान मुलांच्या गटात पूजा साबळे यांनी पहिला क्रमांक मिळविला. कार्डियाक सेंटरचे संचालक आणि हृदयरोगतज्ज्ञ डॉ. शिरीष साठे यांनी प्रास्ताविक केले. अरुण नूलकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अमोल सहस्रबुद्धे यांनी आभार मानले.

*** डॉ. माधवी वैद्य - ६०**

जीवनाच्या वाटचालीत अनेक गोष्टी शिकताना विविध क्षेत्रांतील दिग्गज हे गुरू म्हणून लाभले. जिज्ञासा आणि प्रबळ इच्छाशक्ती यातून कारकीर्द घडली, अशी भावना महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी व्यक्त केली.

वैद्य यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार २६ सप्टेंबर रोजी करण्यात आला. डॉ. कल्याणी दिवेकर आणि प्रा. मिलिंद जोशी यांनी घेतलेल्या मुलाखतीतून विद्यार्थिप्रिय प्राध्यापिका, 'अनन्वय', आर्या कम्युनिकेशन्स या संस्थांच्या प्रमुख, 'कवी शब्दांचे ईश्वर' या मालिकेच्या निर्मात्या, राष्ट्रपती पुरस्कारविजेत्या 'इट्स प्रभात' लघुपटाच्या दिग्दर्शिका, पुष्पौषधीचे ज्ञान घेऊन रुग्णांवर उपचार करणाऱ्या अशी वैद्य यांच्या व्यक्तिमत्त्वाची विविध रूपे उलगडली.

वैद्य म्हणाल्या, ''पीएच.डी. साठी चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या साहित्याचा केलेला अभ्यास हा माझ्या आनंदाचा ठेवा होता. भालचंद्र फडके, कृष्णदेव मुळगुंद, डॉ. वि. मा. बाचल यांच्याकडून खूप काही शिकता आले. घरातून पतिराज वैद्य यांनी पाठिंबा दिला; पण कधी लुडबूड केली नाही. वेगवेगळ्या माध्यमांतून काम करण्याचा अनुभव घेतला. आता भविष्यात लेखनावर लक्ष केंद्रित करणार आहे.''

*** व्हायचे होते गणितज्ञ, आवडू लागले अवकाश - डॉ. नारळीकर**

लहानपणीच वेगवेगळ्या वैज्ञानिकांच्या गोष्टी वाचायला मिळाल्या, गणितातल्या गमती-जमती शिकायला मिळाल्या म्हणून या दोन्ही विषयात रुची वाटायला लागली, आणि त्या वयात गणितज्ञ व्हायचे असे ठरवले होते, अशा आठवणी ज्येष्ठ शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांनी २७ सप्टेंबर रोजी सागितल्या.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे गो. रा. परांजपे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा पुरस्कार नारळीकर यांना प्रदान करण्यात आला. यावेळी मसापचे अध्यक्ष द. मा. मिरासदार, कार्याध्यक्ष वि. भा. देशपांडे, कार्यवाह माधवी वैद्य उपस्थित होत्या. 'मी वैज्ञानिक कसा झालो?' हे सांगत त्यांनी आपल्या जडणघडणीच्या प्रवासाचे अनुभव शेअर केले. लहानपणाचा काळ, केंब्रिज विद्यापीठात घालवलेले दिवस आणि संशोधनाबाबतचे विचार त्यांनी मांडले.

संशोधन करताना कामाचे समाधान असेल तर अधिक मजा येते. तिथेही लालफितीचा कारभार असला तर मात्र वैफल्य टाळता येणे अशक्य आहे, असा टोलाही त्यांनी लगावला. एखाद्या प्रश्नाचे उत्तर कोणालाच माहिती नाही आणि आपण तेच शोधत असू तर ते सापडल्यावर होणारा आनंद अवर्णनीय असल्याचेही त्यांनी नमूद केले.

लहानपणी घरी लावलेल्या एका फळ्यावर चॅलेंज म्हणून मामा गणिते सोडवायला देत असे, यातून गणिताच्या निरनिराळ्या रूपांची माहिती झाली, हा विषयही खुलवता येतो हे लक्षात आले. विज्ञानातले किस्से, गणितातल्या गमतीजमती मुलांना ऐकायला मिळाल्या तर त्यांची त्या विषयाची भीती जाते असे नारळीकर म्हणाले. नवे काहीतरी करण्याची ओढ, विचारातील ओरिजनॅलिटी आणि नियमितपणा संशोधकाजवळ असावा लागतो. तसेच, आपण योग्य असल्याचा आत्मविश्वास असला की, कोणत्याही संशोधनात भाग घेता येतो, असेही त्यांनी सांगितले.

*** क्रिकेट मंडळाची 'श्रीमंती'**

भारतीय क्रिकेट मंडळ ही उत्पादन करणारी किंवा फायदा कमाविणारी कंपनी नाही, तरीही ती केवळ भारतातीलच नव्हे तर क्रिकेटविश्वातील सर्वांत श्रीमंत क्रिकेट संघटना म्हणून ओळखली जाते. मावळते अध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट मंडळाने ही भरारी घेतली आणि २००७-०८ या वर्षात एक हजार कोटी रुपयांची कमाई केली.

१९८३ मध्ये कपिलदेव यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने विश्वकरंडक जिंकला होता. त्या वेळी तिजोरीत ठणठणाट होता. क्रिकेटपटूंच्या गौरवासाठी गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या एका कार्यक्रमाद्वारे मिळालेली रक्कम कपिलदेव यांच्या संघाला देण्यात आली होती. आज २५ वर्षानंतर याच भारतीय क्रिकेट

संघटनेकडे लक्ष्मी पाणी भरत आहे.

मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २००७-०८ या वर्षासाठी ८६२ कोटी रुपयांच्या उत्पन्नाचे बजेट होते; परंतु प्रत्यक्षात मात्र एक हजार कोटी रुपयांची मिळकत झाली. यातून सर्व खर्च ६९७ कोटींचा झाला असून, ३०३ कोटी रुपयांचा निव्वळ फायदा झाला आहे. (२००६-०७ मध्ये हाच फायदा २३१ कोटींचा; तर २००५-०६ मध्ये केवळ ३३ कोटींचा होता) मिळविलेल्या एक हजार कोटी रुपयांच्या उत्पन्नात सर्वांत मोठा वाटा आहे तो दूरचित्रवाणी हक्क (मीडिया हक्क) वितरणाचा. यात एकूण ५५ टक्के उत्पन्न म्हणजेच ५५९ कोटी रुपये मिळाले आहेत. त्या अगोदरच्या दोन वर्षांतील आकडेवारी अनुक्रमे ३१३ कोटी आणि ३४१ कोटी रुपयांची होती.

संघाची मैदानावरही उत्तम कामगिरी असल्यामुळे मंडळाला फायदाही होत आहे. परदेश दौऱ्यातून मंडळाने २२६ कोटी रुपये कमविले. २००६-०७ मध्ये ही रक्कम २१४ कोटींची होती; तर २००५-०६ मध्ये ती अवघी ५९ कोटी इतकीच होती.

*** डॉ. कमलेश यांचा सत्कार**

'संदर्भ' स्नेहमेळावा समितीतर्फे प्रसिद्ध कलावंत-शिक्षक-समीक्षक डॉ. कमलेश (किशोर सोमण) यांच्या शैक्षणिक वाटचालीच्या रौप्यमहोत्सवानिमित्त राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. जयंत बेंद्रे आणि अरविंद ब्रह्मे यांनी कमलेश यांची मुलाखत घेतली.

कमलेश म्हणाले, ''वैश्विकता हा साहित्याचा आत्मा आहे. भाषाभाषांमध्ये देवाणघेवाण झाली, तर भारतीय संस्कृतीची मुळे अधिक घट्ट होतील. पूर्ण समाधान देणारा अनुवाद हा जवळजवळ अशक्य आहे. मैफलीमध्ये तबल्याचे जे स्थान, तेच साहित्यामध्ये अनुवादकाचे असते. अनुवादक हा निमित्तमात्र असल्याने अनुवादामध्ये तो दिसूच नये. कलावंत, त्याचा जीवनप्रवास आणि निर्मितीप्रक्रिया याविषयी मला आकर्षण आहे. महेश एलकुंचवार यांची जीवनदृष्टी सखोल आहे. त्यामुळे पीएच.डी. प्रबंधासाठी हा नाटककार मी निवडला.'' बोराडे म्हणाले, ''पूर्वी शाळेमध्ये 'संदर्भासह स्पष्टीकरण करा' असा प्रश्न असायचा. आता जगण्याचे संदर्भ हरवले आहेत. आपण केवळ स्पष्टीकरण देत असतो. कमलेश यांच्या जगण्याला वेगवेगळे संदर्भ आहेत हे मला आज त्यांच्या मुलाखतीतून समजले.''

*** वामनदादा कर्डक चरित्रकाव्य**

यवतमाळ येथील अमोलकचंद महाविद्यालयातील प्रा. सागर जाधव यांच्या महाकवी वामनदादा कर्डक चरित्रकाव्य ग्रंथाचे प्रकाशन लवकरच होणार आहे. चारशे पृष्ठांच्या या ग्रंथात महाकवी कर्डक, पूर्व आंबेडकरी शाहीर भाऊ फक्कड, भीमराव

कर्डक, केरूजी घेगडे, महाकवी वामनदादा कर्डकांचे समकालीन शाहीर अण्णा भाऊ साठे, प्रभाकर गवई, गोपीनाथ मिसाळ, राजानंद गडपायले, दीनबंधू शेगावकर, लक्ष्मण केदार, श्रावण यशवंते यांच्या संक्षिप्त चरित्रांचा समावेश आहे.

### * कोल्हापूर बालकुमार साहित्य संमेलन

नव्या तंत्रज्ञानाच्या युगातील विद्यार्थ्यांची बौद्धिक व मानसिक गरज तृप्त करणाऱ्या प्रभावी बालसाहित्याची निर्मिती होण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन मुकुंदराव निगवेकर यांनी कोल्हापुरातील सहाव्या मराठी बालकुमार साहित्य संमेलनात अध्यक्ष म्हणून केले. ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा प्रमुख पाहुणे होते.

या वेळी 'सकाळ'चे रमेश वंसकर ('चंद्रावरचे घर' कविता) यांना भाऊसाहेब शहा स्मृती पुरस्काराने आणि इतर बालसाहित्यकारांना सन्मानित करण्यात आले.

श्री. मुकुंद निगवेकर म्हणाले, ''विज्ञान-तंत्रज्ञानाने मुलांसमोर नवे विषय, नवे प्रश्न आले आहेत. त्यामुळे बालसाहित्यिकांनी विवेकाने सखोल चिंतनाच्या आधारेच नव्या प्रश्नांची उकल करणे गरजेचे आहे.''

### * सतीश आळेकरांवरील सीडीचे प्रकाशन

'महानिर्वाण', 'महापूर', 'बेगम बर्वे' अशा प्रवाहाबाहेरच्या नाटकांतून भोवतालच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारे ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांच्या नाट्यप्रवासाचा वेध घेणाऱ्या 'नाटककार सतीश आळेकर' या माहितीपटाच्या सीडीचे प्रकाशन २ ऑक्टोबर रोजी प्रा. समर नखाते यांच्या हस्ते सुदर्शन रंगमंच येथे झाले. या वेळी सतीश आळेकर, ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे, अतुल पेठे आणि नाट्य क्षेत्रांतील इतर मान्यवर उपस्थित होते. आळेकरांच्या नाटकातील भवतालचा, भाषेचा, प्रयोगाचा शोध घेतला आहे. या माहितीपटाची संकल्पना, संहिता, छायाचित्रण आणि दिग्दर्शन अतुल पेठे यांचे आहे. रेखा इनामदार साने आणि राहुल पुंगलिया यांनी सहसंहितालेखन केले आहे. नरेंद्र भिडे यांचे संगीत संयोजन असून, संकलन समीर शिपूरकर यांनी केले आहे.

### * कर्तृत्ववान महिलांची पिढी

''आधुनिक महाराष्ट्र घडविणाऱ्या पहिल्या कर्तृत्ववान महिलांची पिढी घडवण्याचे काम हुजूरपागा शाळेने केले आहे. सामाजिक भान जपण्यास प्रवृत्त करणारी शाळेची १२५ वर्षांची परंपरा संपूर्ण देशासमोर यावी,'' असे विचार कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटीच्या हुजूरपागा शाळेने शतकोत्तर रौप्यमहोत्सवात पदार्पण केले. या निमित्त आयोजित कार्यक्रमाला प्राच्यविद्या अभ्यासक डॉ. सरोजा भाटे, संस्थेचे अध्यक्ष ॲड, बी. पी. शाळिग्राम, उपाध्यक्ष उषाताई वाघ आदी उपस्थित होते. एकोणिसाव्या शतकातील स्त्रियांची शिक्षण आणि हुजूरपागा

शाळेच्या योगदानाचा आढावा घेत डॉ. ढेरे म्हणाल्या, ''एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात राज्यात समाजप्रबोधनाच्या चळवळींनी वेग धरला असला, तरी महिलांना शिकवण्यासाठी मोठ्या दिव्यांतून जावे लागत असे. शिकणाऱ्या स्त्रियांना लोकांचे शिव्याशाप झेलण्यापासून, घराच्या चार भिंतीआड होणाऱ्या अत्याचाराला सामोरे जावे लागे. अशा परिस्थितीतही ज्या महिलांनी निर्धाराने शिक्षण पूर्ण केले, त्यांनीच खरा आधुनिक महाराष्ट्राचा पाया रचला आणि इतर महिलांसमोर आदर्श ठेवला. व्यक्तिगत उन्नतीबरोबर सामाजिक भान जपण्यास प्रवृत्त करणाऱ्या हुजूरपागा शाळेच्या शिकवणीचा या महिलांच्या जडणघडणीत मोठा वाटा आहे.''

*** 'करी' आणि 'नान'चे जपान्यांना आकर्षक**

भारताच्या समृद्ध खाद्य संस्कृतीने आता जपानी नागरिकांनाही आकर्षित केले असून, 'करी' व 'नान' हे पदार्थ तेथे लोकप्रिय होऊ लागले आहेत. विशेष म्हणजे, चिनी व थाई पदार्थांबरोबर असलेल्या स्पर्धेत या भारतीय पदार्थांनी बाजी मारली आहे.

भारतीय खाद्य पदार्थांबाबतचे जपान्यांचे हे आकर्षण लक्षात घेऊन पाकिस्तानी, बांगलादेशी व श्रीलंकेच्या पद्धतीचे अन्न देण्याऱ्या रेस्टॉरंट्सवरतीही भारताचा तिरंगा डौलाने फडकू लागला असून, मेन्यूकार्डावरच्या पदार्थांत 'इंडियन' हा शब्द आवर्जून वापरला जाऊ लागला आहे.

सिद्दिकी समूहाच्या 'इंडियन पाकिस्तानी' या रेस्टॉरंट समूहाची जपानभर वीसपेक्षा जास्त हॉटेले आहेत; पण 'इंडियन' या शब्दामुळे त्यांचा व्यवसाय तेजीत आहे. जपानी माणसाच्या दृष्टीने 'इंडियन'चा अर्थ म्हणजे उत्कृष्ट आणि स्वादिष्ट अन्न! नावात 'इंडियन' नसेल, तर जपानी माणूस तिकडे फिरकणारही नाही, असा अनुभव इस्लामबादहून आलेल्या मोहंमद सगीर या व्यावसायिकाने सांगितला. तो स्वत: 'पोतहार' या पाकिस्तानी हॉटेलात काम करतो; पण हॉटेलच्या प्रवेशद्वारातच तिरंगा आहे आणि जेवणाच्या दोन तासांच्या वेळेत फक्त 'करी' व 'नान' यांना मागणी असते.

मसाल्यांच्या वैविध्यामुळे 'करी' लोकप्रिय होत असल्याचे मत 'स्पाईस मॅजिक'च्या बेला चंद्रानी यांनी व्यक्त केले. त्या गेली ३८ वर्षे जपानमध्ये आहेत.

*** 'बीएसएनएल' ब्रॉडबँडद्वारे आयपी टीव्ही**

शंभर टीव्ही चॅनेल्स, बारा रेडिओ चॅनेल्स, नवे-जुने चित्रपट, गाणी, मुलांसाठी व्हिडिओ गेम, शैक्षणिक चॅनेल्स या सर्व सुविधा ब्रॉडबँडद्वारे एकत्रित देण्यासाठी भारत संचार निगमने (बीएसएनएल) आयपी टीव्ही सेवेचा प्रारंभ केला.

आयपी टीव्हीची सुविधा बीएसएनएलच्या ब्रॉडबँडसेवेसोबत मिळते. बीएसएनएलने डीव्ही नेट या कंपनीच्या माध्यमातून मनोरंजनाचा हा खजिना उपलब्ध करून दिला आहे.

'बीएसएनएल'चे मुख्य जनसंपर्क अधिकारी शशिकांत कुलकर्णी म्हणाले, ''आयपी टीव्हीची ही सुविधा इतर कंपन्यांहून वेगळी आहे. ही सुविधा आपल्या फोन आणि ब्रॉडबँडबरोबरच मिळते. प्रत्येकासाठी स्वतंत्र लाइन घ्यावी लागत नाही. व्हिडिओ कॉन्फरन्सिग, ईमेल आणि एमएमएस या सुविधाही कॉम्प्युटरऐवजी टीव्ही सेटवरून मिळतील. आपल्या गरजेनुसार चॅनेल्स व योग्य किफायतशीर पॅकेज निवडण्याचेही स्वातंत्र्य आहे. या सेवेसाठी लागणारा सेटटॉप बॉक्स विकत घेता येतो. शिवाय तो भाडेतत्त्वावर उपलब्ध आहे. आयपी टीव्हीचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे चित्रपट पाहताना तो मध्येच थांबवू शकतो, पुन्हा पाहू शकतो, पुढचा भाग पाहू शकतो. एकाच वेळी दोन वेगळ्या ठिकाणी वेगळे चित्रपट पाहू शकतो. या सुविधा अन्य केबल टीव्हीमध्ये नाहीत.'' संपर्क (०२०) २४४८९२९२.

*** अर्पण महोत्सव**

'न्यू एज फाउंडेशन'तर्फे ज्येष्ठ गायक पं. मल्लिकार्जुन मन्सूर यांच्या स्मृत्यर्थ आयोजित 'अर्पण महोत्सवा'त फाउंडेशनच्या अध्यक्षा आणि प्रसिद्ध गायिका प्रियदर्शनी कुलकर्णी यांच्या 'अर्पण' या सीडीचे प्रकाशन जयपूर घराण्याचे ज्येष्ठ गायक उस्ताद अजिजुद्दीन खाँ यांच्या हस्ते झाले. 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर या वेळी उपस्थित होते.


पं. मन्सूर यांनी 'मारुबिहाग' रागाने आपल्या गायनाचा प्रारंभ केला. 'रसिया आओ ना' या विलंबित त्रितालातील बंदिशीनंतर त्यांनी 'बसंती केदार' रागाची 'अत्तर सुगंध' ही विलंबित त्रितालातील आणि 'लाजवंती' रागाची 'ध्यान रंग मन रंग' ही झपतालातील बंदिश सादर केली.

*** डायमंड पब्लिकेशन : १२ अनुवादित ग्रंथांचे प्रकाशन**

सेज पब्लिकेशन या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या प्रकाशन संस्थेच्या शैक्षणिक संदर्भ ग्रंथाच्या अनुवादाचे काम डायमंड पब्लिकेशन्सने हाती घेतले असून या प्रकल्पातील पहिल्या बारा पुस्तकांचा प्रकाशन समारंभ नुकताच पुण्यात पार पडला. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, डॉ. नरेंद्र जाधव अध्यक्षस्थानी उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाले, ''भारतात प्रत्येक भाषेत अभिजात साहित्य आहे. ते इतर भाषांत अनुवादित झाले पाहिजे. आज प्रकाशित झालेल्या पुस्तकांना शैक्षणिक मूल्य आहे. अशी पुस्तके प्रकाशित करायला प्रकाशक सहसा तयार होत नाहीत. डायमंड पब्लिकेशन्सने ते काम करून स्वत:चा वेगळा ठसा उमटवला आहे.''

सेज पब्लिकेशन्सचे श्री. विवेक मेहरा म्हणाले ''भारतात इंग्रजी भाषा बोलणाऱ्या व्यक्तींची संख्या तुलनेने कमी आहे. प्रादेशिक भाषा बोलणाऱ्यांची संख्या जास्त मोठी आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे लिखाण किंवा विषय त्यांच्यापर्यंत पोहचत नाहीत.




डावीकडून डॉ.अ.रा. कुलकर्णी, डॉ.नरेंद्र जाधव, श्री. विवेक मेहरा (सेज पब्लिकेशन) श्री. दत्तात्रेय पाष्टे (डायमंड पब्लिकेशन)

त्यासाठी भारतातील वेगवेगळ्या भाषांत आमची पुस्तके अनुवादित करण्याचे आम्ही ठरविले आहे. या प्रकल्पात सर्वप्रथम अनुवाद सादर होण्याचा मान मराठीला मिळाला आहे.''

डायमंड पब्लिकेशन्सचे श्री पाष्टे म्हणाले, ''विद्यार्थ्यांसाठी जास्तीत जास्त चांगली पुस्तके प्रकाशित करण्याचा आमचा मानस आहे.''

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनीता दांडेकर यांनी केले.

*** 'जागत्या'चे प्रकाशन**

''ग्रामीण भागाचा कायापालट करण्याची क्षमता असणाऱ्या रोजगार हमी योजनेची चळवळ सर्व जिल्ह्यांमध्ये पोचणे आवश्यक आहे. गावकऱ्यांकडून गावाचा विकास साधण्याची क्षमता असणाऱ्या या योजनेद्वारे महात्मा गांधींचे ग्रामस्वराज्याचे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकेल,'' असे विचार राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी 'जागत्या' या सामाजिक लेखापरीक्षण संदर्भ पुस्तकाचे प्रकाशन करताना व्यक्त केले.

व्यासपीठावर पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, विभागीय आयुक्त डॉ. नितीन करीर, जिल्हाधिकारी चंद्रकांत दळवी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ, पुस्तकाचे संकलक श्याम देशपांडे उपस्थित होते.

'जागत्या' पुस्तकाच्या निर्मितीमागची भूमिका स्पष्ट करताना डॉ. करीर म्हणाले, ''या योजनेंतर्गत पुणे विभागातील पाच जिल्ह्यांत एक एप्रिलपासून विविध उपक्रम

राबवले जात आहेत. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे, मागासवर्गीय, प्रकल्पग्रस्तांसाठी सार्वजनिक स्वरूपाच्या कामांमधून रोजगार उपलब्ध करून दिला जात आहे. हे काम व्यवस्थित होते की नाही, याचे लेखापरीक्षण ग्रामसभेने करणे अपेक्षित आहे. ते कसे करावे, याबाबत सरकारचे नियम, अध्यादेश काय आहेत, यासाठी 'जागत्या' हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल.''

*** भविष्यातही वृत्तपत्रांचे महत्त्व कायमच**

''भविष्यात वृत्तपत्रांना अनेक स्पर्धांना तोंड द्यावे लागणार आहे. मात्र, कितीही आक्रमणे झाली तरी त्यांचे अस्तित्व कायमच राहणार आहे,'' असा विश्वास २ ऑक्टोबर रोजी झालेल्या महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघाच्या अधिवेशनात 'चर्चा-पत्रकारिता २०२०' या विषयावरील चर्चेत व्यक्त करण्यात आला. कुमार केतकर (संपादक, लोकसत्ता), खासदार भारतकुमार राऊत ('टाइम्स ऑफ इंडिया'चे संपादकीय सल्लागार), किरण ठाकूर (संपादक, बेळगाव तरुण भारत) आणि दिनकर रायकर (संपादक लोकमत) हे सहभागी झाले होते.

'वर्तमानपत्राची ओळख अग्रलेखातून होते काय?' 'संपादकत्व हे जाहिरात आणि विपणनाच्या आधिपत्याखाली आहे काय?', 'विविध आवृत्त्यांमुळे वाचकांवर अन्याय हातो काय?', 'वाहिन्यांमुळे वर्तमानपत्रांचे अस्तित्व धोक्यात आले आहे काय?' आदी प्रश्नांच्या आधारे या संपादकांनी ''आजचा शाळकरी हाच '२०२०'चा वाचक असल्याने त्याची 'वाचक' म्हणून भूक भागविणे हे पुढील काळाचे मुख्य काम राहणार आहे,'' असे सांगितले. वाहिन्यांचा विस्तार आणि या क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणुकीचा वर्तमानपत्रांवर काहीही परिणाम होणार नाही. युवा पत्रकारांना २०२०मध्ये उज्ज्वल भवितव्य आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

केतकर : आगामी काळात अग्रलेखांना महत्त्व राहणार नाही. कार्पोरेट स्पर्धेसाठी संपादक. जाहिरात आणि विपणन यांचे सहजीवन गरजेचे आहे. विविध आवृत्त्यांमुळे स्थानिक वाचकाची, व्यावसायिकाची भूक भागते. वाहिन्या वर्तमानपत्रांना पोषकच ठरतील.

राऊत : अग्रलेख हा नियम ठरत नाही. संपादकांवर व्यवस्थापनाचा दबाव असतो, याचा मला अनुभव नाही. वाचकांच्या विविध गरजा भागविण्याचा मजकूर म्हणून पेज-३ आणि विविध आवृत्त्यांकडे पाहावे.

आगाशे : माहितीच्या महापुरात संपादकीयाचे महत्त्व वाढेल. आधुनिक तंत्रात 'पेज-३' ला पर्याय नाही. किमान किमतीत संपूर्ण अंक देणे अशक्य असल्याने विविध आवृत्यांची गरज. '२०२०'मध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचे आव्हान असेल. वाचकांसाठी विश्लेषणात्मक मजकूरही आवश्यक ठरणार आहे.

ठाकूर : वाहिन्यांचा परिणाम असला तरी वर्तमानपत्रेच प्रभावी ठरतील. भांडवलदार या क्षेत्रात घुसल्याने छोट्या वर्तमानपत्रांची आर्थिक कोंडी होत आहे. पैशापेक्षा सेवा

आणि विचारालाही महत्त्व हवे. अनेक शोध आणि स्पर्धेला सामोरे जावे लागेल.

रायकर : सामाजिक ऐक्य आणि वाचकांसाठी संपादकीय स्तंभ महत्त्वाचा आहे. महसूल, खप आणि वाचकांसाठीच पुरवण्या असतात. आगामी स्पर्धेत वर्तमानपत्रे अधिक विस्तृत आणि प्रगल्भ होतील.

### * महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघ

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या सहकार्याने आयोजित महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघाच्या पहिल्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन ना. शरद पवार यांच्या हस्ते झाले. महसूलमंत्री नारायण राणे, भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस गोपीनाथ मुंडे, विधान परिषदेचे उपसभापती वसंत डावखरे, ऊर्जामंत्री दिलीप वळसे पाटील, खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, महापौर राजलक्ष्मी भोसले, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष धनंजय जाधव व्यासपीठावर होते.

''बातम्या वस्तुस्थितीवर आधारितच असतील, हा विश्वास आता वाचकांमध्ये राहिलेला नाही. वृत्तपत्रे व पत्रकारितेच्या भवितव्यासाठी ही बाब गंभीर आहे,'' असे मत केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी व्यक्त केले. प्रगतीच्या दिशेने वाटचाल होत असताना नव्या पिढीत निराशावाद निमाण होणार नाही, याची काळजीही पत्रकारांनी वार्तांकन करताना घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

अन्याय-अत्याचाराच्या घटनांनी अस्वस्थ होणारा पत्रकार, समाजाशी असलेली बांधिलकी आणि विश्वासार्ह बातमी ही पत्रकारितेची मूल्ये, बाळशास्त्री जांभेकर, लोकमान्य टिळकांची परंपरा कोठे गेली, असा सवाल करून पवार म्हणाले, ''पूर्वी वृत्तपत्रे कमी होती; पण ती चालविणाऱ्यांचा दर्जा मोठा होता. त्या वेळी वृत्त सत्यावर आधारित असे. पत्रकार सखोल अभ्यास व प्रदीर्घ वाचन करीत. त्यांच्या लेखनाने मार्गदर्शन होत असे. या पार्श्वभूमीवर, आज आपण कोठे आहोत? 'पेड न्यूज'च्या नव्या संस्कृतीतून एकाच ठिकाणच्या परस्परविरोधी बातम्या वाचायला मिळतात. अशा बदलात विचारप्रवर्तक लिहिण्याची प्रवृत्ती कितपत शिल्लक राहिली आहे, याबाबत आत्मपरीक्षण न केल्यास पत्रकारिता व वृत्तपत्र क्षेत्राच्या मर्यादा दिसू लागतील.''

मुंडे म्हणाले, ''पीत पत्रकारिता, 'टेबल न्यूज', 'पेड न्यूज' या पार्श्वभूमीवर पत्रकारितेचे पावित्र्य राखण्याचे काम वृत्तपत्रांनी केले पाहिजे. पत्रकारांचे लेखनस्वातंत्र्य जतन करणे, हे सरकारचे कर्तव्य आहे. पत्रकारांवरील हल्ले रोखण्यासाठी सरकारने स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी.''

ज्येष्ठ पत्रकार रामभाऊ जोशी, चंद्रकांत दीक्षित, विश्वास इंदूरकर तसेच विजय सरदेशपांडे यांचा सत्कार करण्यात आला. 'पन्नाशीतील महाराष्ट्र' या स्मरणिकेचे प्रकाशन त्यांनी केले. सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले.

### * 'पॉप्युलर बुक हाऊस' ५५व्या वर्षात पदार्पण!

डेक्कनवरील 'पॉप्युलर बुक हाऊस'ने १० ऑक्टोबरला ५५ व्या वर्षात पदार्पण केले.

मराठी, इंग्रजी, हिंदी भाषांतील पुस्तक; तसेच चित्रपट, नाटके, भावगीते यांच्या सीडीज्, व्हीसीडीज् आणि डीव्हीडीजही येथे उपलब्ध आहेत. दहा ऑक्टोबर १९५४ मध्ये या पुस्तकांच्या दुकानाची स्थापना माधव गाडगीळ यांनी केली होती.

### * महामहोपाध्याय पोतदार

''स्वातंत्र्यलढ्यात प्रत्यक्ष सहभागी न झालेल्या महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी समाजकारणाच्या आखाड्यात आपल्या अमोघ वक्तृत्वाने आणि कृतीने समाजपुरुषाल जागे केले,'' अशा शब्दांत भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या मानद सचिव डॉ. सरोजा भाटे यांनी पोतदार यांच्या कार्याचा गौरव केला.

शुभलक्ष्मी पोतदार लिखित 'बहुरूप पोतदार' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते झाले. डॉ. भाटे म्हणाल्या, ''मराठी आणि संस्कृत भाषेची अस्मिता असूनही हिंदी प्रचारसभेच्या कार्यात सहभागी होणारे वैदिक परंपरेचे अभिमानी, भारत इतिहास संशोधक मंडळाचे आधारस्तंभ, लोककलांचे संरक्षक असे पोतदार यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू या पुस्तकातून दिसतात. कागदपत्रे, दगड आणि चित्रांतून इतिहास दिसणारे पोतदार म्हणजे चालता बोलता इतिहास होता. हे पुस्तक वाचकांच्या मनाचे सात्त्विक कप्पे उघडणारे आहे.''

पोतदार म्हणाल्या, ''पोतदारांचे 'दत्तो वामन' हे चरित्र विद्वानांसाठी लिहिले होते; पण नव्या पिढीला पोतदारांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख व्हावी, हा या पुस्तकलेखनामागचा उद्देश आहे.''

### * साने गुरुजींचे स्वप्न

साने गुरुजींच्या 'श्यामची आई'तील शिकवणीप्रमाणे आजच्या प्राथमिक शिक्षणातून शिकवण देण्याची गरज असून महाराष्ट्रातील साक्षरांना विचारशील, विवेकशील आणि कृतिशील बनवण्याचे साने गुरुजींचे स्वप्न 'साधना'ने साकार करण्याचा प्रयत्न केला असे प्रतिपादन राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी ११ ऑक्टोबर रोजी केले.

साधना साप्ताहिकाच्या हीरक महोत्सवी वर्षाची सांगता राष्ट्रपतींच्या उपस्थितीत झाली. यावेळी राज्यपाल एस. सी. जमीर, मुख्यमंत्री विलासराव देशमुख, डॉ. देवीसिंह शेखावत, ग. प्र. प्रधान, मोहन धारिया, महापौर राजलक्ष्मी भोसले, नरेंद्र दाभोळकर आणि अप्पासाहेब सारेपाटील उपस्थित होते.

'श्यामची आई' हे मातृप्रेमाचे महान्मंगल स्तोत्र आहे. अत्यंत गरिबीच्या जीवनस्तरावर देखील उदात्त जीवनमूल्ये बाळगणारी माता आपल्या मुलाच्या व्यक्तिमत्त्वाची कशी

जडणघडण करते आणि आचारविचारांत जीवनमूल्यांचे बीजारोपण कसे करते, याचा आलेख यामध्ये मांडण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षणातून आजही अशी शिकवण देण्याची गरज आहे, असेही पाटील म्हणाल्या.

'साधना'ची गेल्या साठ वर्षांमधील वाटचाल 'प्रकाशाकडून प्रकाशाकडे' झालेली आहे. हे साप्ताहिक आता वेबसाईटवर गेले आहे. त्यामुळे गुरुजींचे स्वप्न खऱ्या अर्थाने जगभर विस्तारत असल्याने पाटील यांनी नमूद केले.

*** 'जागतिक बदल जाणण्यासाठी वृत्तपत्र वाचन गरजेचे'**

जागतिक बदलाची प्रतिबिंबे वृत्तपत्रांत उमटतात. या बदलांचे आपल्यावर काय परिणाम होतात, हे समजावून घेण्यासाठी वृत्तपत्र वाचणे ही काळाची गरज असल्याचे मत 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर यांनी महात्मा फुले समता प्रतिष्ठानतर्फे आयोजित व्याख्यानात व्यक्त केले. प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष डॉ. बाबा आढाव, अध्यक्ष दादासाहेब नाईकनवरे, ज्येष्ठ पत्रकार गो. कृ. पटवर्धन, एस. एम. जोशी सोशालिस्ट फाउंडेशनचे विश्वस्त प्रा. सुभाष वारे व्यासपीठावर उपस्थित होते.

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात वृत्तपत्रांच्या कार्यशैलीत झालेल्या बदलाची माहिती देत मालकर यांनी यातले कोणते बदल आपण घ्यायचे याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे, असे सांगितले. बदलत्या जगाची माहिती थेट आपल्यापर्यंत पोचण्यासाठी वृत्तपत्रांचे वाचन अपरिहार्य असल्याचेही ते म्हणाले.

डॉ. आढाव यांनी वृत्तपत्रांतील बदल समाजिक परिवर्तनाच्या पायावर आधारलेला असावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. या बदलात जनतेच्या आशा-आकांक्षाचे प्रतिबिंब उमटावे असेही ते म्हणाले.

*** चित्रपट महोत्सवासाठी 'वावटळ'ची निवड**

मुंबईत होणाऱ्या 'थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सवा'साठी पुण्यातील अरगडे डी. एस. एंटरटेन्मेंटनिर्मित 'वावटळ' या चित्रपटाची निवड झाली.

अनंत सामंत यांच्या 'के फाइव्ह' या कादंबरीवर आधारित या चित्रपटात तेजस्विनी पंडित, अशोक समर्थ, मुकेश तिवारी, सुनील शेंडे आणि विनय आपटे यांच्या भूमिका आहेत.

दंगलीमध्ये सापडलेली महिला एक वर्षानंतर घरी परत येते, तेव्हा कुटुंब आणि समाज तिला स्वीकारतो का, या प्रश्नाचा वेध चित्रपटातून घेतला आहे. निर्माते बाळासाहेब अरगडे पाटील आणि दिग्दर्शक शिवाजी लाटे पाटील यांनी सांगितले. दिल्ली येथे नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या 'पॅनोरमा महोत्सवा'साठी या चित्रपटाची निवड झाली आहे. नव्या कलाकारांना आणि तंत्रज्ञांना संधी दिली आहे.

### * ल क्लेझिओ यांना साहित्याचे नोबेल

फ्रेंच साहित्यिक ज्यां मेरी गुस्ताव ल क्लेझिओ यांना यंदाचे साहित्यासाठीचे नोबेल पारितोषिक जाहीर झाले आहे. १४ लाख डॉलर रकमेचे हे पारितोषिक जाहीर करताना स्वीडिश ॲकॅडमीने क्लेझिओ यांच्या १९६०च्या दशकातील साहसपूर्ण कादंबऱ्या, निबंध आणि मुलांसाठीच्या लेखनाचा गौरव केला आहे.

क्लेझिओ यांचा जन्म १९४०मध्ये झाला. त्यांची पहिली कादंबरी १९६३मध्ये प्रकाशित झाली. 'आशय संपलेल्या सर्वसामान्यांच्या बोलीभाषेला त्यांनी वेगळ्या शब्दांचा आधार दिला आणि वास्तवाचेही बळ दिले,' असा गौरव स्वीडिश अकादमीने केला आहे.

ल क्लेझिओ यांनी लहान वयातच फ्रान्सहून नायजेरियाला स्थलांतर केले. त्या एका महिन्याच्या प्रवासावर त्यांनी 'अ लाँग व्हॉएज' आणि 'ओरादी नॉयर' या दोन प्रवासवर्णनात्मक कादंबऱ्या लिहिल्या.

### * राज्यभरातील ग्रंथालयांत लवकरच संगणक अभ्यासिका

'गाव तेथे वाचनालय' या राज्य सरकारच्या योजनेंतर्गत ग्रामीण भागात सुरू असणाऱ्या वाचनालयांना आर्थिक मदत व्हावी, या उद्देशाने मायटेक संस्थेच्या वतीने राज्यभरातील ग्रंथालयांत संगणक अभ्यासिका सुरू करण्यात येणार आहेत. राज्य ग्रंथालय संघाचे उपकार्याध्यक्ष सोपानराव पवार आणि 'मायटेक'चे सुदाम चौरे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष विकास टिंगरे उपस्थित होते. पवार म्हणाले, ''हा उपक्रम राबविण्यासाठी माहिती तंत्रज्ञान कंपन्यांची मदत मिळत आहे. पर्सिस्टंट कंपनीने या प्रकल्पासाठी १५ संगणक उपलब्ध करून दिले असून, इतर माध्यमांतून आणखी एक हजार संगणक उपलब्ध करण्यात येणार आहेत. टप्प्याटप्प्याने राज्यातील सर्व ग्रंथालयांतून ही योजना राबविली जाणार आहे.'' चौरे म्हणाले, ''जिल्हा, तसेच गावपातळीवरील अनेक बेरोजगार तरुण संगणक शिक्षणाच्या सुविधेपासून वंचित राहिलेले आहेत. खासगी क्लासचे शुल्क अनेकांना परवडत नाही. यासाठी संस्थेने ग्रंथालयांमध्ये 'सेल्फ स्टडी किट'च्या साह्याने विविध अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले आहेत. माफक शुल्कात हे अभ्यासक्रम गरजू विद्यार्थ्यांना पूर्ण करता येतील.'' अधिक माहितीसाठी ९४२२०८९४१८ या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

### * गुलाबराव महाराज साहित्य संमेलन

''दहशतवाद, जातीयवाद या महाभयानक व्याधींनी जगभर भीतियुक्त व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. याचा मुकाबला करण्यासाठी व शांतता निर्माण करण्यासाठी संतांची शिकवण उपयुक्त ठरेल,'' असे प्रतिपादन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी ११ ऑक्टोबर रोजी आळंदी येथे केले

श्रीमती पाटील यांच्या हस्ते संत गुलाबराव महाराज साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन झाले. मुख्यमंत्री विलासराव देशमुख समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. राज्यपाल एस. सी. जमीर, ऊर्जामंत्री दिलीप वळसे-पाटील, पालकमंत्री अजित पवार, डॉ. देवीसिंह शेखावत, संमेलनाध्यक्ष प्रा. राम शेवाळकर, ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, प्रा. वि. दा. कराड आदी या प्रसंगी उपस्थित होते.

त्या म्हणाल्या, ''भारतीय संस्कृती वैश्विक आहे. या संस्कृतीचे पुनरुत्थान होऊन पुन्हा ती विश्वाला व्यापेल, वारकरी संप्रदाय एक विश्वधर्म म्हणून पुढे येईल, अशी भाकिते खूप काळापूर्वीच संत ज्ञानेश्वर आणि संत श्री गुलाबराव महाराज यांसारख्या संतांनी केली होती. त्याची प्रचिती आता येऊ लागली आहे. आळंदी, देहू यांसारखी तीर्थक्षेत्रे वैश्विक ज्ञानक्षेत्रे करण्याच्या दृष्टीने पावले टाकली जात आहेत हे त्याचेच प्रतीक आहे. गुलाबराव महाराजांनी सर्वधर्म समन्वयाचा मूलगामी सिद्धांत मांडून, सर्व धर्माचा व त्यांच्या तत्त्वज्ञानाचा ऊहापोह केला. संत ज्ञानेश्वर व गुलाबराव महाराज यांसारख्या संतांनी जीवनाकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन दिला आहे. गुलाबराव महाराजांच्या वाङ्‌मयाचे सर्व भाषांमध्ये भाषांतर होणे ही काळाची गरज आहे.''

''गुलाबराव महाराजांच्या वाङ्‌मयासाठी राज्य सरकार आर्थिक सहकार्य करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देशमुख यांनी दिली. डॉ. भटकर, प्रा. शेवाळकर, प्रा. कराड यांचीही भाषणे झाली.

### * वाटवाघळावरील पुस्तक 'तिमिरदूत'

आकर्षक रंगसंगती असलेले अथवा मधुर शीळ घालणारे पक्षी सगळ्यांनाच आवडतात. पण 'वटवाघळा'चा विषय निघतो तेव्हा ई.. किती विचित्र पक्षी आहे, त्याला पाहिले तर दिवस वाईट जातो, अशी प्रतिक्रिया ऐकायला मिळते. निसर्गात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या सस्तन प्राण्यावर दहा वर्षे अभ्यास करून डॉ. विशाखा कोराड यांनी 'तिमिरदूत' हे पुस्तक लिहिले आहे.

'वन्यजीव सप्ताहा'निमित्त आयोजित कार्यशाळेमध्ये 'तिमिरदूत' पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. याबद्दल डॉ. कोराड म्हणाल्या, ''वटवाघळाबद्दल समाजात गैरसमज असल्याने हा प्राणी नेहमीच दुर्लक्षित राहिला आहे. वटवाघूळ हा पक्षी नसून उडता येणारा सर्वांत लहान सस्तन प्राणी आहे. त्याचा अभ्यास करण्यासाठी १९९८ मध्ये सुरुवात केली. पुणे जिल्हा आणि सह्याद्रीमध्ये फिरून त्याचे जीवन आणि इतर वैशिष्ट्यांचे निरीक्षण केले. सध्या राज्यात वटवाघळांच्या तीसहून अधिक जाती आढळतात. सहा जाती अत्यंत दुर्मिळ आहेत. जंगलाचा ऱ्हास होत असल्याने वटवाघळांचे आयुष्य धोक्यात आले आहे. 'तिमिरदूत' हे पुस्तक मराठी आणि इंग्रजी या दोन्हीही भाषांमध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहे.

## * 'समाज परिवर्तन घडविणारे साहित्य निर्माण झाले नाही.'

साहित्यक्षेत्र आणि समाजात परिवर्तन घडवून आणू शकेल असे साहित्य रवींद्रनाथ टागोर यांच्यानंतर देशात निर्माण झाले नाही, असे मत ज्येष्ठ समीक्षक द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

'अक्षरधारा'संस्थेच्या वतीने सिंहगड रस्त्यावरील पुष्पक मंगल कार्यालयात आयोजित पुस्तक प्रदर्शनाचे त्यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. संजय जोशी, जितेंद्र रानडे या वेळी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रा. प्रसन्नकुमार अकलूजकर होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''समाजावर प्रभाव टाकणारे, परिवर्तन घडवून आणणारे साहित्य ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू, तुकाराम गाथा या माध्यमातून झाले. त्यानंतरच्या काळात टागोरांचे साहित्य त्या उंचीपर्यंत जाऊ शकले. त्यानंतर मात्र, असे साहित्य निर्माण झाले नाही. टागोरांच्या साहित्याचा बंगालच्या समाजजीवनावर फार मोठा प्रभाव आजही आहे.'' लक्ष्मण राठिवडेकर यांनी आभार मानले.

## * आंतरराष्ट्रीय महोत्सवात 'आसक्त'च्या 'तू'ची निवड

इजिप्तची राजधानी कैरो येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय प्रायोगिक नाटकांच्या महोत्सवातील स्पर्धेसाठी पुण्याच्या 'आसक्त' निर्मित 'तू' या नाटकाची निवड झाली आहे. या महोत्सवाच्या इतिहासात यापूर्वी भारतातून केवळ दोन नाटकांची निवड करण्यात आली होती. 'तू'च्या निवडीमुळे प्रथम मराठी भाषेतील नाटक या महोत्सवात सादर करण्यात आले आहे.

'रूमी' या पार्शियन सूफी संताच्या काव्यरचनांवर आधारित असणाऱ्या 'तू'ला या निमित्ताने सूफी प्रांतात प्रयोग करण्याची संधी मिळाली आहे. 'तू'चे लेखन सतीश भावे यांचे तर दिग्दर्शक मोहित टाकळकर यांचे आहे. या नाटकाने २००६ मध्ये राज्य नाट्य स्पर्धेतही प्रथम पुरस्कार मिळवला होता. याशिवाय 'महिंद्रा एक्सलन्स इन थिएटर ॲवॉर्ड', सर्वोत्कृट लेखन, दिग्दर्शनाचे पुरस्कारही या नाटकाने मिळवले आहेत. दिल्ली, कोलकत्ता येथेही राष्ट्रीय स्तरावर या नाटकाने बाजी मारली. प्रेक्षक, समीक्षक, कलावंत या साऱ्यांनीच या नाटकाला दाद दिली.

'तू'च्या सादरीकरणातून निर्माण होणारे विश्व भाषेच्या बंधनाशिवाय सर्वत्र पोचते. हा प्रयोग सादर करण्यासाठी १५ कलाकारांनी कैरोचा दहा दिवसांचा दौरा केला.

## * सर्व भारतीय भाषा संमेलन राज्यात दर वर्षी होणार

सर्व भारतीय भाषांना एकदुसऱ्याच्या जवळ आणण्याचे महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीने हाती घेतलेले काम स्पृहणीय आहे. यापुढे दरवर्षी हे संमेलन राज्यात आयोजित केले जाईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांनी केली. तीन दिवसांचे हे संमेलन प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिरात संपन्न झाले.

आर.आर. म्हणाले, की जेव्हा जेव्हा जात, धर्म आणि भाषेच्या आधारावर विभागणी झाली तेव्हा आपण पराभूत झालो. विविधतेतही ताकद असते. विश्वभरातील ज्ञान आत्मसात करण्यासाठी इंग्रजी आवश्यक आहे, पण आपल्या देशाला जाणण्यासाठी हिंदी आणि राज्याला समजण्यासाठी त्या त्या राज्याची भाषा आत्मसात करणे अनिवार्य आहे.

### * केंद्रीय अकादमीवर भडके यांची निवड

पुणेकर चित्रकार गणपत भडके यांची केंद्रीय ललित कला अकादमीच्या कार्यकारिणीवर नुकतीच निवड झाली आहे. सन २००८ ते २०१३ या कालावधीसाठी ही निवड आहे. अकादमीच्या कार्यकारिणीवर वेगवेगळ्या राज्यांतून दर पाच वर्षांनी एकूण १५ कलाकारांची निवड केली जाते. भडके सध्या बाँबे आर्ट सोसायटीचे कार्यकारिणी सदस्य आहेत. त्यांची अनेक प्रदर्शने झाली असून, विविध पुरस्कारांचे ते मानकरी आहेत.


### * डॉ. परुळेकर सकाळ चॅरिटी ट्रस्टचे फिरते ग्रंथालय

डॉ. नानासाहेब परुळेकर सकाळ चॅरिटी ट्रस्टचे विविध समाजोपयोगी उपक्रम जोरात चालू आहेत. स्वच्छ आणि सुंदर पुण्यासाठी स्वच्छता अभियान, पर्यावरणविषयक जागृती निर्माण करण्यासाठी उतिष्ठत जाग्रत ही मासिक पत्रिका, रुग्णांना विश्रांतीसाठी स्वास्थ्यनिकेतन या उपक्रमांनी ट्रस्टने पुणेकरांचे लक्ष वेधून घेतले आहे. ९ एप्रिल २००५ पासून या ट्रस्टने फिरते ग्रंथालय स्थापन करून पुणेकर रसिक वाचकांना त्यांच्या आवडीचे पुस्तक घरपोच देण्याची सोय केली आहे. ग्रंथालयात जाऊन पुस्तके पाहणे आणि वाचनासाठी घेऊन येणे सध्या वेळेअभावी सर्वांनाच जमते असे नाही. त्यामुळे घरपोच पुस्तके देणारी ही फिरत्या ग्रंथालयाची कल्पना चोखंदळ पुणेकरांना अल्पावधीतच प्रिय व्हावी यात आश्चर्य नाही. महिना १०० रुपये वर्गणीत एका वेळी पाच पाच पुस्तके घरपोच मिळू शकतात. औंध, कर्वे रस्ता, वारजे, कर्वेनगर, घोले रस्ता, विश्रामबाग वाडा, बिबवेवाडी, सहकार नगर, टिळक रस्ता, हडपसर, धनकवडी या भागात ग्रंथालयाची रिक्षा विशिष्ट वारी सकाळी ९ ते १ या वेळात ठराविक ठिकाणी उभी राहते आणि वाचक सदस्यांना पुस्तकांची देवाणघेवाण करता येते. ग्रंथालयातील पुस्तकांची यादी सदस्यांना विनामूल्य देण्यात येते, त्यातील हव्या असणाऱ्या दहा पुस्तकांची यादी दरमहा सदस्याने दिली तर ती पुस्तके पुरवण्याचा आणि ग्रंथालयात नसलेली पुस्तके विकत आणूनही देण्याचा प्रयत्न केला जातो. वर्षाची वर्गणी एकदम भरल्यास सवलत मिळते. स्वत: ग्रंथालयात येऊन पुस्तके बदलणाऱ्या सदस्यांना दरमहा फक्त ५० रुपये वर्गणी द्यावी लागते. सभासद संख्या सध्या सहाशेच्या घरात आहे. ती हजारावर जावी अशी अपेक्षा आहे.

ग्रंथालयाकडे सध्या १५ हजार पुस्तके आहेत आणि नवीन पुस्तकांची खरेदी

सातत्याने चालू असते. पुण्यातील अनेक नामवंत व्यक्तींनी आपल्या खाजगी ग्रंथालयातील पुस्तकेही ग्रंथालयाला भेट दिली आहेत. त्यामुळे नव्या-जुन्या पुस्तकांची वाचकांची गरज सहज पुरवता येते. जास्तीत जास्त पुणेकर रसिकांनी या ग्रंथालयाचा लाभ घ्यावा अशी विश्वस्त चंद्रशेखर हरी जोशी यांची अपेक्षा आहे. संपर्क - डॉ. नानासाहेब परुळेकर सकाळ चॅरिटी ट्रस्ट. २७ ब, बुधवार पेठ, अप्पा बळवंत चौक पुणे २. फोन - २४४८१०५५, २४४८३३७७, ९९२२४१९२११ ❐

## नवे कोरे





### आंधळा न्याय

नितीन बापट

**१५०रु. पोस्टेज २५रु.**

काही वेळेला अचानक झालेले गुन्हे तर काही वेळेला निव्वळ पैशासाठी, बाईसाठी नियोजन करून केलेले गुन्हे; पण गुन्हेगाराने कितीही शिताफीने गुन्हा लपविण्याचा प्रयत्न केला तरी काही ना काही खूण मागे उरतेच, जी त्याला पकडून देऊ शकते. पोलीस जर निरलस आणि कर्तव्यबुद्धीने तपास करतील तर समाजासाठी ती प्रगतीशील गोष्ट होईल.
ए.सी.पी. निखील साने आणि त्यांचे सहकारी ज्या तडफदारपणे आणि चिकाटीने गुन्ह्याच्या आणि गुन्हेगारांच्या मुळाशी पोहोचतात, ते पाहताना वाचक रंगून जाईल.
अशाच काही चमत्कृतिपूर्ण गुन्ह्यांच्या व गुन्हेगारांच्या तपासाच्या या मनोवेधक कथा.



# विशेष वार्ता

*** 'मेहता पब्लिशिंग हाऊस' ला**

**उत्कृष्ट पुस्तक निर्मिती पुरस्कार**

'फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स' दिल्ली ही संस्था प्रत्येक वर्षी उत्कृष्ट पुस्तक निर्मितीबद्दल प्रकाशकांना पुरस्कार देत असते. या वर्षी प्रगती मैदान दिल्ली येथे भरलेल्या दिल्ली बुक फेअर मध्ये हे पुरस्कार देण्यात आले.

भारतातील वेगवेगळ्या ९५ प्रकाशकांकडून १२४० पुस्तके स्पर्धेसाठी आलेली होती, त्यापैकी ७४ पुस्तकांना





**डावीकडून फेडरेशनचे अध्यक्ष श्री.रमेश गोवील, श्री.अरुण कुमार, श्री.मलहोत्रा व पुरस्कार स्वीकारताना श्री.एस.के. घई.**

पुरस्कार देण्यात आले. इंग्रजीतील ३७, हिंदीमधील ३१, मराठी ८, बंगाली २, मल्याळम् १, व तेलगू १ पुरस्कार दिले गेले.

'मेहता पब्लिशिंग हाऊस', पुणे यांच्या 'मी सायूरी' व 'सूर्याची गोष्ट' या दोन पुस्तकांना उत्कृष्ट पुस्तकनिर्मितीचे पुरस्कार मिळाले. भारत सरकारच्या शिक्षण विभागाचे सेक्रेटरी श्री. अरुणकुमार यांच्या हस्ते हे पुरस्कार वितरीत केले गेले.

मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे हे पुरस्कार श्री.एस.के. घाई यांनी स्वीकारले.




**अत्यंत गाजलेल्या**
**'MEMOIRS OF A GEISHA'**
**या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद...**

# मी सायूरी

**आर्थर गोल्डन**
**अनु. सुनंदा अमरापूरकर**


**४००रु. पोस्टेज ३०रु.**

# सूर्याची चोरी
## आणि
## गोष्टी देशोदेशीच्या

**चारुता पुराणिक**

**३०रु. पोस्टेज २०रु.**





# विशेष वार्ता

## * पहिल्याच कादंबरीला बुकर पुरस्कार - चार कोटीचा!

बुकर पुरस्काराचा यंदाचा मानकरी ठरला आहे अविनाश आडिगा. त्याच्या पहिल्याच कादंबरीला हा सव्वाचार कोटींचा पुरस्कार मिळाला.

लेखकाच्या पहिल्याच कादंबरीला बुकर मिळण्याचा हा तिसरा प्रसंग. या अगोदर भारतीय लेखिका अरुंधती रॉयच्या 'ए गॉड ऑफ स्मॉल थींग्ज'लाही हे भाग्य लाभले होते. हा पुरस्कार मिळवणारा अविनाश हा चौथा भारतीय. या आधी सलमान रश्दी, अरुंधती रॉय आणि किरण देसाई यांना हा पुरस्कार मिळाला होता. व्ही. एस. नायपॉल आणि रुथ प्रावर झाबवाला या भारतीयांचा यात अंतर्भाव केला तर ही संख्या सहा होते. अवघ्या ३३व्या वर्षी हा पुरस्कार. हा आणखी एक विक्रम.

पहिल्याच कादंबरीला असा जागतिक पातळीवरचा सन्मान मिळणे ही गोष्ट अमाप भाग्याची आहे.

अविनाश आडिगा हा मूळ मंगलोरचा. त्याचे डॉक्टर वडील मंगलोरलाच राहात. मंगलोरच्या कॅनरा हायस्कूलमध्ये एक हुशार विद्यार्थी म्हणून तो नावाजला गेला. शाळेत निबंध लेखनाची, जनरल नॉलेजची आणि वक्तृत्वाची अनेक बक्षीसे त्याने मिळवली. शाळेच्या सायन्स क्लबचा तो एक उत्साही सदस्य होता. खेळांची मात्र त्याला आवड नव्हती. लेखनाबाबत मात्र तो परफेक्शनिस्ट होता. तो १९९० मध्ये एस.एस.सी. झाला. त्या वर्षी त्याच्या

आईचे दीर्घ आजाराने निधन झाले, तरीही त्या परीक्षेत गुणवत्ता यादीत त्याचे नाव झळकले. प्रज्ञाशोध परीक्षेतही देश पातळीवर पहिल्या दहा क्रमांकात त्याने स्थान पटकावले. त्यामुळे भविष्यात तो आपल्या वडिलांप्रमाणे डॉक्टर (किंवा इंजिनिअर) होणार अशी त्याच्या शिक्षकांची आणि पालकांची अटकळ होती. परंतु त्याने इंग्लिश वाङ्‌मयातच पदवी घेण्याचे ठरवले आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. मंगलोरच्या अ‍ॅल्सोसिस कॉलेजमधून तो ऑस्ट्रेलियाला गेला. तेथून न्यूयॉर्कमधील कोलंबिया युनिव्हर्सिटीत त्याने इंग्रजी साहित्याचाच अभ्यास चालू ठेवला.

दि फायनान्शियल टाइम्स, मनी आणि वॉल स्ट्रीट जर्नल या वृत्तपत्रात व्यापार-उद्योग-आर्थिक प्रश्न यावर लेखन करण्यास त्याने आरंभ केला. टाइम या साप्ताहिकामध्ये तीन वर्षे त्याने वार्ताहर म्हणून काम केले. दिल्लीत वास्तव्य केले. त्यानंतर मुक्त पत्रकार म्हणून काम सुरू केले. याच काळात त्याने 'दि व्हाइट टायगर'चा प्राथमिक खर्डा तयार केला. (२००५) अमेरिकेत असताना राल्फ एलिसन, जेम्स बाल्डविन आणि रिचर्ड राइट या तीन कृष्णवर्णीय लेखकांचा प्रभाव त्याच्यावर पडला. राल्फ एलिसनच्या दि इनव्हिजिबल मॅन या कादंबरीत एका चटपटीत, उत्कृष्ट वक्तृत्व असलेल्या तरुणाला अमरिकेतील कृष्णवर्णीयांच्या चळवळीचा नेता आपल्या संघटनेत सहभागी करून घेतो. त्याला नेतृत्वाचे प्रशिक्षण देतो. त्याचा संघटनेसाठी उपयोग करून घेतो आणि सर्कशीतल्या पाळलेल्या प्राण्याप्रमाणे त्याला आपल्या मर्जीप्रमाणे राबवतो असे दाखविले आहे.

'द व्हाइट टायगर'चा नायक निवेदक बलराम हलवाई हा एका रिक्षावालाचा मुलगा आहे. कशीबशी दोन वेळची भाकरी मिळवणे हेच त्याचे स्वप्न. माणसांचे वर्गीकरणही बलरामचा बाप मोठ्या पोटाची माणसे आणि पोट खपाटीला गेलेली माणसे असेच करतो. गावातील समाजवादी नेत्याचे नाव शाळेत तपासणीला आलेले इन्स्पेक्टर विचारतात. बलराम त्याचे उत्तर बरोबर देतो. त्यामुळे ते इन्स्पेक्टर त्याला तू तर अगदी व्हाइट टायगर आहेस असे म्हणतात. तेच नाव त्याला पडते.

बलराम हलवाई आणि इनव्हिजिबल मॅन यांचा तसा संबंध नाही, परंतु देशातील राजकीय स्थितीचे आणि नेतृत्वाचे जे विदारक आणि स्फोटक विश्लेषण बलराम हलवाईच्या सामान्य रिक्षावाला ते उद्योजक या वाटचालीत दिसते - त्याची प्रेरणा कदाचित् या निग्रो लेखकांकडून धारदार झाली असावी. इ. स. २००५मध्ये प्रथम या कादंबरीचे लेखन झाले. परंतु लेखन समाधानकारक न वाटल्याने तसेच पडून राहिले. परदेशातून भारतात आल्यावर जानेवारी २००७मध्ये पुन्हा त्याने सर्व लिहून काढले. कादंबरीचे स्वरूप या लेखनाला आले आहे हे त्याला जाणवले.

गावातील एका श्रीमंताच्या घरी ड्रायव्हर म्हणून बलराम हलवाईला नोकरी मिळते आणि मालकाच्या अमेरिकेहून आलेल्या विवाहित मुलाच्या - अशोकच्या -

होंडा सिटी कारमधून सर्वत्र वावरताना बलरामला दिल्लीतील उच्चस्तरीय अनोख्या जगाचे दर्शन होते, ते त्याला साक्षात्कारासारखे वाटते. अवतीभावतीच्या घटनांवर बलराम बारकाईने लक्ष ठेवतो. इतर ड्रायव्हर्सबरोबर त्याची घसट वाढते. मालकाची वाट बघत बसणारे हे सगळे ड्रायव्हर मर्डर वीकली किंवा तसेच एखादे चटपटीत साप्ताहिक वाचत वेळ घालवतात. खून, मारामाऱ्या, बलात्कार, सूड याबद्दलच्या बातम्या वाचण्यात त्यांना आनंद मिळतो. कोणी दारूच्या बाटल्यांची अदलाबदल करतात, कोणी गाड्यांचे पेट्रोल चोरून विकतात, कोणी मेकॅनिकला खोट्याच दुरुस्तीचे बिल करायला सांगतात. या ड्रायव्हर्सची जणू एक अघोषित संघटना असते आणि त्या संघटनेचे स्वत:चे नीतिनियम असतात. कोणी मालकाला किंवा त्याच्या मित्रांना कॉलगर्लकडे घेऊन जातो, कोणी वारांगनांच्या वस्तीत नेतो, कोणी कॉलसेंटरमधल्या मुलींशी संधान जुळवतो... उच्चभ्रूंच्या जगातल्या या नाना लीलांचा साक्षीदार म्हणून बलराम हलवाई वावरत राहतो. भ्रष्टाचाराचे कोणालाही काही सोयरसुतक नसते. दिल्लीतील राजकीय वातावरणही त्याला जाणवत राहते. संधी साधून तो उद्योजक होतो. ही वाटचाल करताना एक खूनही त्याच्या हातून होतो. त्यामुळे त्याला संबंधितांना खूप पैसे चारावे लागतात.

स्वत: अविनाशने भारतात भरपूर प्रवास केलेला आहे. रेल्वे स्टेशन, बस स्टँड, झोपडपट्ट्या, गजबजलेले चौक, बाजार येथे निरुद्देश भटकंती करीत तासन् तास घालवलेले आहेत. लोकांचे बोलणे ऐकलेले आहे. मध्यमवर्गीयांच्या तसेच गोरगरीबांच्या भावनांचा वेध घेतला आहे. बलराम ही व्यक्तिरेखा अनेकांच्या मिश्रणातून तयार झाली आहे. कादंबरीतील घटना सर्व घडलेल्या आहेत असे नाही; परंतु त्या वास्तव आहेत. भारतीय वास्तवाशी प्रत्येक घटनेचा संबंध आहे. मद्यविक्रीची दुकाने, बार, कुंटणखाने, सरकारी रुग्णालये, शासकीय कार्यालये या प्रत्यकातले वातावरण हे वास्तवतेचे निदर्शक आहे. तळागाळातल्या दरिद्री लोकांना भारतातील नव्या संपन्नतेचे कोडे उलगडत नाही. भ्रष्टाचार सर्वत्र त्याला दिसतो. पिढीजात श्रीमंती गरीब लोकांना समजते, परंतु नवश्रीमंतांचा नखरा आणि उधळेपणा त्यांना उमगत नाही..

बुकर पुरस्कारासाठी या कादंबरीची निवड करताना परीक्षक समितीने सध्याच्या बदलत्या काळातील भारतीय मानसिकता जाणून घेण्यासाठी ही कादंबरी उपयुक्त ठरेल असे एक कारण दिले आहे. भारतातील दारिद्र्याचे हे चित्रण परीक्षकांना विदारक वाटले. एक नवीनच जाणीव देणारी, अंतर्दृष्टी देणारी ही कादंबरी आहे असे त्यांना वाटते

कादंबरीचा पहिला खर्डा करताना लेखकाला आपण हे सगळे कशासाठी लिहितो आहोत असा प्रश्न पडला होता. या सर्व तपशीलांचे धागेदोरे एकमेकाशी कसे जोडायचे असा प्रश्न पडल्याने लेखन थांबले होते.

'टाईम'चा राजीनामा देऊन भारतात परतल्यावर दिल्लीमध्ये अविनाश काही काळ राहिला. त्यावेळी भरपूर प्रवास केला.

एकदा कलकत्ता येथे गेल्यावर तेथील एका स्वयंसेवी संघटनेच्या संचालकाने त्याला म्हटले, ''हाताने रिक्षा ओढणारे बरेच लोक कलकत्त्यात आहेत. त्यामुळे बकालीपणा वाढला आहे. परदेशी कारखानदारांना त्यामुळे येथे गुंतवणूक करावी असे वाटत नाही असा एक अहवाल आहे. तेव्हा येथील सरकार या रिक्षांवर बंदी आणणार आहे.''

हे ऐकल्यावर अविनाशमधील पत्रकार खडबडून जागा झाला. त्याने काही रिक्षावाल्यांना गाठले. त्यांच्याबरोबर गप्पा मारल्या. एका बिहारी रिक्षावाल्याने त्याला आपल्या 'घरी' नेले. एका शेडमध्ये वीसजण राहत होते. त्यात हिंदू होते. मुसलमान होते. दोघे स्वयंपाक स्वतंत्रपणे करीत. परंतु सगळे खेळीमेळीने राहत. दिवसातून दोनदा झाडलोट करायची पाळी ठरवून दिलेली असे. ती शेड स्वच्छ होती. त्या रिक्षावाल्याने म्हटले, ''आम्ही सगळे भावाभावाप्रमाणे राहतो. स्वच्छता राखतो. मी मुसलमान आहे. पण कोणीही दुजाभाव दाखवत नाही.''

या घटनेवर एक बातमी किंवा लेख तयार करावा असे त्याला वाटले. पण ती कोण छापणार असाही प्रश्न पडला. त्यानंतर मात्र कादंबरीचे पुनर्लेखन करायला त्याने जेव्हा घेतले तेव्हा तो रिक्षावाला समोर उभा राहिला. कादंबरीची मध्यवर्ती व्यक्तिरेखा म्हणून रिक्षावाल्याचा मुलगा - बलराम - त्याने रंगवला– 'तेहलका'च्या सप्टेंबरचा एका अंकात स्वत: लेखकाने ही माहिती दिली आहे.

या कादंबरीचा आकृतिबंधही वैशिष्ट्यपूर्ण आहे.

भारतभेटीवर येणाऱ्या चीनच्या पंतप्रधानांना उद्देशून बलरामने लिहिलेल्या पत्राच्या स्वरूपातील ही कादंबरी आहे. एकूण सात रात्रींच्या दरम्यान हे पत्र लिहिले गेले आहे आणि त्यातून 'चीनसारखी आम्ही प्रगती का करू शकत नाही?' अशी भारतीयांची भावना प्रथमच प्रकट करून भारतातील सद्य:स्थितीचे तपशील देत येथील दुरवस्थेचे, हलाखीचे सर्वंकष, अंतर्मुख करणारे दर्शन घडवले आहे. ''तुम्हाला हिंदी येत नाही. मला चिनी येत नाही. तेव्हा दोघांचीही जी भाषा नाही, पण दोघांनाही जी समजते, त्या इंग्लिश भाषेत हे पत्र लिहिणे भाग आहे'' असा खुलासाही आरंभीच केला आहे.

भारतातील प्रतिभावंत लेखकांनी गेल्या दोनतीन दशकात जागतिक साहित्यात आपले स्थान महत्त्वपूर्ण आहे हे वेळोवेळी दाखवून दिले आहे. सलमान रश्दी, विक्रम सेठ, अमिताव घोष, रोहिंतान मिस्त्री, उपमन्यू चॅटर्जी, शशी देशपांडे, किरण देसाई, चेतन भगत, उर्वशी बुटालिया, अरुंधती रॉय... अशी कितीतरी नावे सहज समोर येतात. अविनाश आडिगा हे त्या यादीत विराजमान झालेले नवे नाव!

**शंकर सारडा**

# दखल

## ● परदेशी नियतकालिके

परदेशी वाहिन्यांनी आपल्या टेलिव्हिजनला जागतिकीकरणाच्या प्रवाहात वेगाने ढकलले आहे. त्या पाठोपाठ पुस्तक प्रकाशन संस्थाही भारतीय बाजारपेठेमध्ये आपला प्रभाव गाजवायला पुढे सरसावल्या आहेत. कॉमिक्स-चित्रकथांचीही घुसखोरी चालू आहे. परदेशी चित्रपटांनाही भारतीय प्रेक्षकांचा उदार आश्रय मिळत आहे. अनिल अंबानी आणि स्पिलबर्ग यांच्यात शेकडो कोटींचा करार झाला असून संयुक्तरीत्या चित्रपटांची निर्मिती होणार आहे. त्यातच आता मासिकांची आणि नियतकालिकांची भर पडत आहे. इ.स. २००२मध्ये परदेशी मासिकांच्या थेट भारतीय आवृत्त्यांना ७२ टक्के गुंतवणुकीस मान्यता देण्यात आली. आता त्यांच्या भारतीय आवृत्त्यांनाही परवानगी मिळाली आहे. माध्यमे आणि जाहिरात, स्वयंचलित वाहने, आरोग्य आणि तंदुरुस्ती, प्रवास आणि पर्यटन, माहिती तंत्रज्ञान, उद्योगव्यापार, क्रीडाक्षेत्र, फॅशन आणि जीवनशैली वगैरे विषयांना वाहिलेल्या मासिकांची निर्मिती आता भारतीय भागीदारीत करण्यासाठी परदेशी मासिकांचे प्रकाशक उत्सुक आहेत. टाटा इन्फोमीडिया, बेनेट कोलमन आणि कंपनी (टाइम्स ग्रुप), लिव्हिंग मीडिया (इंडिया टुडे), कस्तुरी अँड सन्स (हिंदू ग्रुप), प्लॅनमन, वासन पब्लिकेशन वगैरे भारतीय कंपन्या परदेशी नियतकालिकांच्या भारतीय आवृत्त्या काढून बाजारात आणत आहेत आणि त्यांच्या किंमती १०० रुपये किंवा जास्त असूनही ही मासिके भारतात हजारोंनी खपत आहेत. सरकारचे धोरण अशा संयुक्त प्रकल्पांना प्रोत्साहन देणारे आहे.

प्लेबॉय हे अमेरिकेतले मासिकही भारतीय आवृत्ती काढण्यासाठी उत्सुक आहे. त्यात सुंदर ललनांची आणि सौष्ठवयुक्त पुरुषांची

छायाचित्रे भरपूर छापण्यात येतात; सेक्सविषयक मजकूरही खूप असतो आणि आयुष्य सुखद करण्याच्या दृष्टीने खूप काही कानमंत्र देण्यात येतात. अमेरिका-युरोपात प्लेबॉय क्लबमध्ये सौंदर्यपुतळ्या बनी (होस्टेस) म्हणून टॉपलेस अवस्थेत वावरतात आणि उच्चभ्रू धनिकांना भुरळ घालतात. प्लेबॉय भारतात आले तर अशा क्लब्जचीही मालिका येथे सुरू होईल. आर. आर. पाटील यांच्या डान्स बारविरोधी धोरणाची मग काही मातबरी उरणार नाही. मासिकापाठोपाठ एक वेगळी संस्कृतीही येथे येईल.

गेल्या वर्षी परदेशी मासिकांच्या जाहिरातीच्या उत्पन्नात ५ ते २९ टक्के वाढ झाल्याचे आकडेवारीवरून दिसते. मात्र फॅशन, जीवनशैली, क्रीडाक्षेत्र, पुरुषांची मासिके यातील जाहिरातींचे उत्पन्न दहा ते तेरा टक्के घटले आहे. असोसिएशन ऑफ इंडियन मॅगेझिन्सने नुकतीच एक परिषद घेऊन आपल्या वाचकांना आकृष्ट करण्यासाठी काय पावले टाकावीत यावर विचारविमर्श केला. प्रादेशिक भाषांमध्येही या देशी-परदेशी मासिकांच्या आवृत्त्या प्रसिद्ध करण्याचा विचार यावेळी पुढे आला. न्यूजप्रिंटच्या किमतीत सतत वाढ होत आहे. लेखकांना मानधनही जास्त देण्याची निकड भासते. त्याशिवाय आशयघन लेखनाची अपेक्षा करता येत नाही... यावरही चर्चा झाली.

एकूण भारतातील इंग्रजी वाचकांना परदेशी मासिके सुलभपणे मिळण्याचे दिवस सुरू झाले आहेत, यात शंका नाही. मेन्स हेल्थ, जीक्यू मॅक्सिम, एफएचएम वगैरे नियतकालिकांच्या भारतीय आवृत्त्या गेल्या काही महिन्यात स्टॉल्सवर दिसू लागल्या आहेत.

## ● जीएंची महाकथा

जीए कुलकर्णी हे मराठीतले सर्वांत श्रेष्ठ कथाकार हे आता सर्वमान्य होत आहे. जीएंच्या कथेचे मोठेपण शोधण्याचा प्रयत्न गेली ४०/५० वर्षे चालू आहे. त्यांच्यावर अनेक पुस्तके व प्रबंध सिद्ध झालेले आहेत.

प्रसिद्ध समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी गेल्या काही वर्षात जीएंच्या कथेचे श्रेष्ठत्व कशात आहे यावर बरेच चिंतन केले आहे आणि जीएंची कथा ही कादंबरी, महाकाव्य आणि शोकनाट्य यांचे अनेक धर्म आत्मसात करूनही आपले कथापण टिकवून धरते; जीएंची कथा ही महाकथा असते असा निष्कर्ष काढला आहे. जीएंची महाकथा हे पुस्तकच दभिंनी आपल्या अमृत महोत्सवी जन्मदिवसानिमित्त प्रसिद्ध केले आहे. (प्रकाशक - अरुण सबाने, आकांक्षा प्रकाशन, मिलेनियम, बजाज नगर, नागपूर १०) जीएंच्या कथांमध्ये विशालता, भव्यता, वस्तुनिष्ठा, नि:पक्षपातीपणा, समग्र अस्तित्वाचा - केवळ मानवी जीवनाचा नव्हे - उभा छेद, निरुपण कुशलता, सांस्कृतिक संचिताचे दर्शन ही महाकाव्यप्रकाराची ठळक वैशिष्ट्ये आहेत. त्यांचे दर्शन काजळमाया या संग्रहातील ठिपका, गुलाम, कळसूत्र, रत्न व विदूषक या

रूपककथांमध्ये प्राधान्याने घडते.'' असे डॉ. द. भि. म्हणतात.

कथाकार म्हणून जीएंनी समग्र मराठी कथेचे गुणविशेष आपल्या कथासृष्टीत एकवटून टाकले हे त्यांचे अनन्यसाधारण कर्तृत्व आहे असे सांगून त्यांच्या कथेत दिवाकर कृष्णांची काव्यात्मता, फडक्यांची तंत्रदक्षता, खांडेकरांचा बोधवाद, य. गो. जोशी यांची कौटुंबिकता, चोरघड्यांची तरलता, पु. भा. भावे यांची उत्कटता, गाडगीळांचा भ्रमनिरास या साऱ्यांचे एकजीव रसायन झाले आहे.'' असा निर्वाळा दभि देतात.

जीएंच्या कथेत मानवी जीवनासह पशुपक्षी, भुतेखेते, देवदेवता, शाप-उःशाप या समग्र अस्तित्वाचा उभा छेद आहे. (महाकाव्य गुण), अज्ञान-आसक्ती-दुःख-ज्ञान (शोकनाट्य गुण) आहे, पुनरावृत्त पूर्ववृत्त कथन (भावकाव्याचा गुण) आहे, मानसगोचर नेपथ्यस्वरूप परिसर चित्रण (नाट्यगुण) आहे, पात्रप्रसंग - काळ यांची व्यामिश्रता (कादंबरी गुण) आहे, अंतिम अस्तित्व सूत्राचा शोध (ज्ञानशास्त्र गुण) आहे.

जीएंची बांधिलकी कुणाशी असते? जीवन व्यवस्थेशी, तिच्यावर अगम्य हुकमत गाजवणाऱ्या अज्ञात सूत्राशी. जन्म, अपयश, अपघात, अधूपण, व्याधी, मृत्यू यांच्या हेतुगूढतेशी!

जीएंच्या कथेने मराठी लघुकथेच्या सर्व संभाव्य शक्ती आत्मसात करून वापरून टाकल्या आहेत. आता मराठीत कोणा कथाकाराला कथा लिहिता येणार नाही, दीर्घकथा लिहावी लागेल. जीएंची कथा ही कथाही नाही अन् कादंबरीही नाही, ती महाकथा आहे असा त्यांचा निष्कर्ष आहे.

## ● प्रादेशिक अस्मितेचा शोध घेणारे 'शब्दालय'

श्रीरामपूरच्या सौ. सुमती लांडे यांनी गेली २०/२२ वर्षे शब्दालय नावाने वार्षिक दिवाळीला काढत असतात. त्यात वाङ्मयीन विषयांना प्राधान्य असते. गंभीर लेखही दिलेले असतात. त्यामुळे त्याचे वेगळेपण जाणवते. त्या दिवाळी अंकाच्या जोडीनेच त्यांनी शब्दालय प्रकाशनही चालवले आहे. या प्रकाशनातर्फे गेल्या २०/२२ वर्षात १८० पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यातील अनेक पुस्तकांनी वेगवेगळे पुरस्कारही मिळवले आहेत. अजय कांडर यांच्या आवानओल या काव्यसंग्रहाला महाराष्ट्र फाउंडेशन, इंदिरा संत, विशाखा, आरती प्रभू, वासंती गाडगीळ यांच्या नावाचे पुरस्कार मिळालेले आहेत. साहित्य अकादमी पुरस्कार विजेते सदानंद देशमुख यांचे लचांड हे पुस्तकही शब्दालयने काढले आहे. रंगनाथ पठारे यांची त्रिधा, दिवे गेलेले दिवस, चित्रमय चतकोर, तीव्रकोमल दुःखाचे प्रकरण, आस्थेचे प्रश्न, चक्रव्यूह, छत्तीसगड, नियोगींचे आंदोलन (संपादित) वगैरे पुस्तकेही शब्दालयचा दबदबा वाढवणारी आहेत. राजन गवस (चांगदेव-चतुष्ट्य), म. सु. पाटील (बालकवींचे काव्यशिल्प), राजन खान (पांढऱ्या जगातला अंधार), पोपट सातपुते (गरम झळा),

देवकी वळवडे (अनाहत), द. ता. भोसले (जन्म) वगैरे लेख ही शब्दालयच्या श्रेयनामावलीचे साक्षीदार आहेत.

शब्दालय तर्फे शब्दालय हे त्रैमासिक सुरू करण्यात आले असून, त्याचा पहिला अंक नुकताच बाजारात आला आहे. या अंकात रंगनाथ पठारे, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, संतोष पवार वगैरेंचे लेख आहेत. गृहपत्रिकेपेक्षा वाङ्मयीन नियतकालिकाचे स्वरूप त्याला असावे असा सुमती लांडे यांचा प्रयत्न आहे. पोपट सातपुते यांनी रंगनाथ पठारे यांच्या 'शब्द कसबाच्या प्रभावाने' कार्यकारी संपादक म्हणून काम करायला संमती दिली आहे. एकेका अंकात एकेका जिल्ह्यातील लेखक कवींची तोंड ओळख करून द्यायची, त्या त्या जिल्ह्यातील वाङ्मयीन वातावरणाचा आलेख उभा करायचा असा एक अभिनव उपक्रम राबवण्यात येणार आहे. या अंकात परभणी जिल्ह्यातील साहित्य विश्वाची झलक कवी इंद्रजित भालेराव यांनी पाहुणे संपादक म्हणून दाखवली आहे. यंदा शासनाचा बालकवी पुरस्कार मिळवणाऱ्या अविनाश साळापुरीकर यांच्या काव्यावर त्यांनी लिहिले आहे. अविनाशच्या काव्याचा हा जाहीरनामा पहा.

*आपल्या प्रतिभेने परत परत खेचून*
*आणावे लागेल बालपण*
*आणि हरेक काकडणाऱ्या माणसाला*
*पुरवावी लागेल आपल्या जवळच्या आगीतून*
*थोडी थोड ऊब*
*मित्रांनो, चांगलं लिहिणं प्रत्येक काळाची गरज असते*
*ती माणसाची खाज बनता कामा नये.*

आपल्या भिक्षुकी करणाऱ्या वडिलांचे संदर्भ देताना अविनाशचे शब्द धारदार होतात.

*ज्या करामतीने आपल्या बाळशाचे झाले*
*गुबगुबीत ठोळे*
*त्या गुळचट भिक्षुकीने*
*नेले फरफटत*
*बापाचे दोनही डोळे*

घरातल्या पोथ्यांची आवरासावर करताना, त्यांच्यावरची मखमली वस्त्रे काढताना आपल्याला मळमळायला होते आणि जपून ठेवलेल्या मतलबांच्या दुर्गंधाने जीव वरखाली होतो - यासारख्या प्रतिक्रिया चक्रावून सोडतात.

परभणीतल्या राजेश वाचनालयात ५२ हजार ग्रंथ आहेत. दोन हजार सदस्य आहेत. १९८४ पासून अ वर्ग जिल्हा ग्रंथालय म्हणून मान्यता आहे. अनुसया वाचनालयात १३५८०० ग्रंथ आहेत. ब वर्ग दर्जा आहे. या ग्रंथालयांनी परभणीला वाङ्मयीन वैभव बहाल केले आहे.

'शब्दालय' त्रैमासिकाने श्रीरामपूरच्या शब्दालय प्रकाशनाच्या दबदब्यात भर पडेल. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील वाङ्मयीन घडामोडींचाही परामर्श नियमाने घेतला जाईल. या नियतकालिकाला शुभेच्छा!

## ● १२२ कोटींची शालेय पुस्तकांची विक्री- एका प्रकाशन संस्थेची!

प्रकाशन संस्थांची उलाढाल किती होते हे आपल्याला कळत नाही. पण ती प्रचंड असू शकते हे ब्ल्यू बर्ड (इंडिया) लि. च्या ताज्या अहवालावरून लक्षात येते.

ब्ल्यू बर्ड ही प्रकाशन-मुद्रण क्षेत्रातील संस्था. गेल्या ८ वर्षात तिने मोठीच प्रगती करून ४५८ कोटी रुपयांची उलाढाल करण्यापर्यंत मजल मारली आहे, हे ऐकल्यावर आपल्याला आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. शालेय वह्यांचे उत्पादन आणि विक्री यातून २८६ कोटी रुपये मार्च २००८ अखेर संपलेल्या वर्षात तिने मिळवले. शालोपयोगी पुस्तकांच्या आणि मार्गदर्शकांच्या विक्रीतून १२२ कोटी रुपये आणि मुद्रणातून ४१ कोटी रुपये उत्पन्न झाले. वह्यांच्या निर्यातीतूनदेखील ब्ल्यू बर्डने ६ काटी रुपये मिळवले. ही निर्यात अमेरिका, यूरोप, आफ्रिका, आखाती देश यांच्यामध्ये होते. जागतिकीकरणाच्या या प्रवाहात सामील होण्यासाठी ब्ल्यू बर्डला उत्पादनांचा दर्जाही तसाच उत्तम ठेवावा लागतो. उद्योजकतेतील मौलिक योगदानाबद्दल मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते या कंपनीला गौरवान्वित करण्यात आले. आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, राजस्थान, तामीळनाडू, पंजाब या राज्यात ब्ल्यू बर्डची प्रादेशिक कार्यालये असून महाराष्ट्रात पुणे, चिंचवड, मुंबई, नवी मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद, नागपूर, सोलापूर, नाशिक, अकोला, अहमदनगर येथेही विक्रीकेंद्रे आहेत. बंगलोर, कर्नाटक, इंदूर येथे नवी उत्पादनकेंद्रे सुरू करण्यात आली असून पुणे येथील मुख्य उत्पादन केंद्रात ३५० लोक काम करतात. नवनीत प्रकाशनच्या धर्तीवर शालेय वह्या-पुस्तकांची निर्मिती करून त्यांची आपल्या विविध राज्यातील विभागीय कार्यालयांद्वारे विक्री करण्याच्या योजना आखलेल्या आहेत. शाळांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे शालेय साहित्याची मागणी वाढत आहे आणि ती सतत वाढत राहणार आहे. विज्ञान प्रयोगवही, यशराज प्रश्नपत्रिकासंच, वर्कबुक, माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा प्रश्नपत्रिका संच, संगणक शिक्षण, सायन्स जर्नल, संगणक शिक्षक, चित्रकला वह्या, चित्रे रंगवा वह्या, पंचतंत्र, परीकथा, अंकलिपी, डिक्शनरी, टारझन, नॉडी, १०१ फॅक्टस, लोअर मॅथेमॅटिक्स, ताजमहाल अशी विविधता प्रकाशनांमध्ये ठेवलेली आहे. गेल्या वर्षी ३४ कोटी रुपयांचा फायदा झाला. पुस्तकांची विक्री ५९ टक्के वाढली. नितिन सोनटक्के हे ब्ल्यू बर्ड इंडिया लि. चे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर असून, संचालक मंडळावर डेव्हिड कुंदर, सतीश भागवत, अनिल आगाशे, अपूर्व सोनटक्के, संतोष धनकुडे, नंदकिशोर लाहोटी वगैरेंचा समावेश आहे. अखिलेश सोनी हे कंपनीचे सेक्रेटरी आहेत. शेअर

बाजारात नोंदणी झाली असून शेअरचे भाव गेल्या वर्षात ३० ते ९३ रुपयांच्या दरम्यान हेलकावत होते. २२ हजार भागधारक असून ३५ कोटीचे भागभांडवल गोळा करण्यात आले आहे. नोंदणीकृत कार्यालय प्रभात रोडवर आहे. झालानवाडी, गोऱ्हे खुर्द येथे उत्पादन केंद्राची इमारत आहे. कंपनीला २५७ कोटींचे कर्ज असून जाहिरातींसाठी १० कोटींची तरतूद आहे.

## ● कोल्हापूरचे बालसाहित्य संमेलन

बालकुमार साहित्यक्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्था आहेत. कोल्हापूरला मराठी बालकुमार साहित्य सभा ही त्यापैकी एक संस्था आहे. तिच्या वतीने कोल्हापूर येथे सप्टेंबरच्या चौथ्या आठवड्यात सहावे मराठी बालकुमार साहित्य संमेलन झाले. या संस्थेचे पहिले संमेलन १९९२ मध्ये झाले. त्यानंतर गेल्या १५ वर्षात ५ संमेलने झाली. संमेलनाचा आर्थिक बोजा मोठा असतो. त्यामुळे दरवर्षी संमेलन भरवणे शक्य होत नाही. त्यामुळे १५ वर्षात ५ संमेलने असे प्रमाण पडले तरी संस्थेचे अस्तित्व टिकून आहे याचेच अप्रूप वाटते. शेवडे गुरुजी, वसंत निगवेकर, शशिकांत महाडेश्वर, श्याम कुरळे, मोहन जोशी, रजनी हिरळीकर, वासंती इनामदार जोशी, रा. तु. भगत, मुकुंद निगवेकर वगैरे मंडळींचा ही संस्था स्थापन करण्यात पुढाकार होता. आज यातील शेवडे गुरुजी नाहीत. परंतु बाकी सर्वजण या संस्थेच्या कामात रस घेतात. कथाकथन - कवितावाचन कार्यक्रम, कथाकथन स्पर्धा, कथालेखन मार्गदर्शक कार्यशाळा, उत्कृष्ट बालसाहित्याला पुरस्कार, नवलेखक शिबिरे, बालसाहित्य प्रदर्शने वगैरे उपक्रम दरवर्षी होतात; त्यामुळे संस्थेचे कार्य चालू राहते आणि कोल्हापूर परिसरातल्या बाललेखक-कवींना प्रोत्साहन मिळत राहते. शशिकांत महाडेश्वर (अध्यक्ष), रजनी हिरळीकर आणि श्याम कुरळे (उपाध्यक्ष), गोविंद गोडबोले आणि डॉ. मा. ग. गुरव (कार्याध्यक्ष), अशोक पाटील (कार्यवाह), वसंत निगवेकर, मुकुंद निगवेकर (सल्लागार), नीलम माणगावे, अनुराधा खांडेकर, स्नेहा वाबळे, दिनकर पाटील इ. (सदस्य) हे विद्यमान पदाधिकारी आहेत.

सहाव्या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून मुकुंद निगवेकर यांची निवड करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून शंकर सारडा उपस्थित होते. त्यांच्या हस्ते उद्घाटन झाले. उद्घाटन करताना बालसाहित्याला सध्या जगभर प्राप्त झालेल्या महत्त्वपूर्ण स्थानाची कल्पना देऊन हॅरी पॉटरसारखी पुस्तके बालकांप्रमाणेच प्रौढांनाही पुन्हा वाचनाकडे आकृष्ट करून वाचन संस्कृतीला चालना देत आहेत असे त्यांनी म्हटले. मराठीत आजवर बालसाहित्याकडे उपेक्षेने पाहिले जात होते; परंतु गेल्या पाचसहा वर्षात मराठीतील बालसाहित्य हे बहुरंगी आणि आकर्षक स्वरूपात निघू लागले आहे, मेहता पब्लिशिंग हाऊस, ज्योत्स्ना प्रकाशन, पॉप्युलर, मौज, नवनीत, ब्ल्यू बर्ड, ऊर्जा, गमभन प्रकाशन वगैरे संस्था पाश्चात्यांच्या धर्तीवर बालसाहित्य काढू

लागल्या आहेत. काहींनी परदेशी बाल पुस्तकांचे हक्क मिळवून त्यांचे प्रकाशन मराठीत सुरू केले आहे. बालवाङ्मयाला चांगले मानधन मिळू लागले आहे, शालेय ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ झाल्याने बालवाङ्मयाची विक्री वाढली आहे, पालकही आपल्या मुलांना चांगली पुस्तके विकत घेऊन देत आहेत; मुलांना लहान वयातच वाचनाची गोडी लावण्याचे महत्त्व पालक-शिक्षकांना पटले आहे, डिस्ने, पोगो, निक वगैरे टीव्ही चॅनल्स मुलांसाठी कार्यक्रम सादर करीत आहेत... हे सर्व बालसाहित्याला समृद्ध करणारे आहे,'' असे काही विचार या प्रसंगी त्यांनी मांडले. आपल्या लेखकांनी भारतीय जनजीवनाचे दर्शन घडवणारे बालसाहित्य लिहिले तर तेही आता इंग्रजीत व जगातील अन्य भाषांत जाऊ शकेल असे वातावरण आहे. उदारीकरण आणि जागतिकीकरण यांचा तो प्रभाव आहे. त्याचा लाभ उठवावा असे त्यांचे बालसाहित्यकारांना आवाहन होते.

संमेलनाचे अध्यक्ष मुकुंद निगवेकर हे वनविभागात दीर्घकाळ अधिकारी होते. त्यांच्या बंटी आणि बंगा या नव्या पुस्तकाला बरेच पुरस्कार मिळाले. त्याला अरण्यातील प्राणी-वनस्पती सृष्टीची पार्श्वभूमी आहे. त्यांनी आपल्या भाषणात काही महत्त्वाचे विचार मांडले.

१. वेगाने बदलणाऱ्या तंत्रयुगाचा परिणाम मुलांच्या एकूण जीवनावर पडला आहे. मुले चौकस आणि बहुश्रुत झाली आहेत, परंतु त्यांच्या दृष्टिकोनात उथळपणा आला आहे; त्यांच्या कृतीत उतावळेपणा आला आहे. चंगळवादी वृत्ती बोकाळली आहे, आत्मकेंद्रित वृत्तीची मुले ही भविष्यकाळातील राष्ट्रीय समस्या असणार आहे. या मुलांना ध्येयप्रवण करणे, जीवनाचा निरामय आनंद घेण्याची कला शिकवणे हे नव्या बालसाहित्याचे उद्दिष्ट असायला हवे. बालसाहित्याच्या रचनेत बदल करणे हे काळाचे आव्हान आहे.

२. मुलांच्या मनातील कोवळ्या भावभावना, साहसप्रियता, नावीन्याची ओढ, स्वप्नरंजनपूर्ती या अपेक्षांची पूर्तता पुस्तकांच्या वाचनातून व्हायला हवी. केवळ संस्कारकथा, बोधकथा या नावाखाली एकाच प्रकारचा अळणी बालसाहित्याचा रतीब मुलांना आता मानवणार किंवा आवडणार नाही.

३. विज्ञान आणि तंत्रज्ञान यामुळे नवे विषय, नवे प्रश्न समोर आले आहेत. वनविज्ञान, पर्यावरण, स्थापत्यशास्त्र, वैद्यकशास्त्र, अवकाश संशोधन, जैवतंत्रज्ञान, क्रीडा या प्रकारच्या विषयांचे ज्ञान विद्यार्थ्यांना हवे आहे. बालसाहित्यात हे विषय यायला हवे.

४. सोपे आणि रंजक लिहिणे हे प्रयत्नसाध्य परंतु कौशल्यपूर्ण ठरते. हॅरी पॉटरसारखे पुस्तक जगातील लक्षावधी मुलांना आकृष्ट करते. त्यासारखे वेगवेगळ्या देशातील मुलांना रिझवणारे पुस्तक आपले लेखक का लिहू शकत नाहीत? आपल्या पुस्तकांची भाषांतरे परदेशात का होऊ नयेत?

५. ग्रामीण आणि आदिवासी मुलामुलींना उपयुक्त ठरेल असे बालसाहित्य लिहिणारे लेखक हवे आहेत.

६. मराठी बालकुमार साहित्य संमेलन परदेशातही घ्यावे. त्यामुळे आपल्या लेखकांना विश्वाचे भान येईल. माहिती तंत्रज्ञानामुळे सर्व विश्व आज जवळ आले आहे. बालसाहित्य हे गढूळ पाण्याचे लोंढे राहू नयेत; अखंड झुळझुळणारे नव्या ताज्या प्रवाहाचे झरे व्हावेत.

एकूण या संमेलनातील उपस्थिती चांगली होती. शंभरेक बालसाहित्यकार व प्रकाशक, अभ्यासक उपस्थित होते. पुस्तकांचे स्टॉल्सही होते. विद्यार्थीही भरपूर होते. कार्यक्रमांची रेलचेल होती. अशी संमेलने जिल्ह्याजिल्ह्यात भरायला हवीत.

## ● मोबाइल व्हॅनद्वारे पुस्तकांची विक्री

चारपाच कोटी रुपयांची प्राथमिक गुंतवणूक करून कोणी मराठी माणूस पुस्तक विक्रीसाठी एखादा प्रकल्प राबवत असेल तर त्याचे कौतुकच करायला हवे. आजवर एवढी मोठी प्राथमिक गुंतवणूक कोणी केलेली नसेल.

'ग्रंथायन' या नव्या पुस्तक वितरण संस्थेने दहा मोबाईल व्हॅन्सद्वारे महाराष्ट्रात सर्वत्र पुस्तक विक्रीचा धाडसी उपक्रम सुरू केला आहे. या प्रत्येक व्हॅनमध्ये सुमारे दहा हजार पुस्तके असतील आणि या व्हॅन्स निरनिराळ्या जिल्ह्यांमध्ये सतत संचार करीत राहतील. या व्हॅन्समध्ये इंटरनेट सुविधा असून उपग्रहाद्वारे मुंबईतील मुख्य कार्यालयाशी संपर्क राहील. ग्लोबल पोझिशनिंग सिस्टिम अँड सॅटेलाइट लिंक्ड पॉइंट सॉफ्टवेअरद्वारे या प्रत्येक व्हॅनचा ग्रंथायनच्या आपल्या कार्यालयाशी सातत्याने संबंध राहील, पुस्तकांचा त्याद्वारे सारखा पुरवठा होत राहील. वर्षभरात अशा शंभर व्हॅन्स महाराष्ट्रभर पुस्तके, डीव्हीडी वगैरे रसिक ग्राहकांच्या दारापर्यंत घेऊन जातील. पहिल्या आठवड्यातच या दहा व्हॅन्सनी दहा हजारावर पुस्तकांची विक्री केली. यावरून वाचकांनाही ही कल्पना रुचलेली आहे हे लक्षात येते. सुरुवातच अशी उत्तम प्रतिसादाने झोकात झालेली असल्याने हा प्रयोग यशस्वी होईल असा भरवसा वाटतो. सध्या या व्हॅनमध्ये सत्तर टक्के पुस्तके मराठी आणि ३० टक्के इंग्लिश आहेत. पुढे हिंदी व इतर भाषांमधील पुस्तकेही उपलब्ध होतील. मराठीतील बहुतेक नामवंत प्रकाशकांची पुस्तके व्हॅनमध्ये मिळून शकतील.

ग्रंथायनचा व्याप केवळ मोबाईल व्हॅनद्वारे पुस्तकविक्री एवढ्यापुरता मर्यादित नाही. ग्रंथायनचे प्रवर्तक पंकज कुरुलकर हे सॉफ्टवेअर-हार्डवेअर क्षेत्रातील अनुभवी उद्योजक असून, या क्षेत्रात कोट्यवधींची उलाढाल करीत होते. लेखनाची ओढ असल्याने हा उद्योगाचा व्याप कमी करून त्यांनी लेखनावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले. परंतु पुस्तक प्रकाशन आणि वितरण या बाबत मराठी ग्रंथव्यवहार फारच मागे आहे असे त्यांच्या लक्षात आले. जोवर पुस्तकांचे वितरण पुणे मुंबईसारख्या

शहरांपुतेच मर्यादित आहे तोपर्यंत पुस्तकांचा खप वाढणार नाही आणि लेखक म्हणून मान्यता मिळणार नाही. तेव्हा अॅमेझॉन डॉट कॉमच्या धर्तीवर ग्रंथायन डॉट कॉम स्थापन करून ऑनलाइन पुस्तकविक्रीचा उपक्रम करण्याचे त्यांनी ठरवले. त्यानुसार ऑनलाइन पुस्तकविक्रीचा आरंभही त्यांनी केला आहे. ग्राहकाला ऑनलाइन नोंदणी करता येईल; ते पुस्तक दहा दिवसात घरपोच छापील किमतीला मिळेल. पुस्तकाची डिलिव्हरी घेताना रोख पैसे भरता येतील किंवा क्रेडिट कार्डद्वारे आधीच पैसे देता येतील. संस्था ऑनलाइन विक्रीसाठी पुस्तकांचे गोडाऊन ठेवणार नाही. (टोल फ्री फोन - १८०० २०९ ८०७४) (Granthayan.com)

## ● वर्दीवाला गुंडा - आठ लाख प्रती खपलेली कादंबरी

क्यूं कि सास भी कभी बहू थी, कहानी घरघर की, यासारख्या 'क'ने सुरू होणाऱ्या टीव्ही मालिकांची निर्माती एकता कपूर ही काही लेखकांचा सल्ला घेऊन कथानकाला वेडीवाकडी वळणे कशी द्यायची हे निश्चित करते. ४०/५० एपिसोडमध्ये संपणाऱ्या कथा पाच पाच वर्षे लांबवायच्या ठरवल्यावर मग अशा योगायोगांना, अपघातांना, स्मृतिभ्रंशांना कथानकात घुसवणे क्रमप्राप्तच ठरते. तर त्यासाठी तल्लख कथाकादंबरीकारांची मदत अपरिहार्यच! अशा सल्लागारांमध्ये हिंदीतील एक बेस्टसेलर कादंबरीकार वेद प्रकाश शर्मा यांच्यावर एकता कपूरचा त्यातला त्यात जास्त भरवसा आहे. दर महिन्यात किमान आठ दिवस तरी वेद प्रकाश शर्मा मीरत या आपल्या गावाहून मुंबईला येतात आणि एकता कपूरला नवनव्या आयडिया देतात. जुन्या कथेत नवा प्राण भरतात.

वेद प्रकाश शर्मांचे वय पंचावन्न वर्षे आहे परंतु ते गेली ३५ वर्षे कादंबऱ्या लिहित आहेत आणि त्यांच्या नावावर १६०च्या वर कांदबऱ्या आहेत. हे येथे लक्षात घ्यायला हवे. गुलशन नंदा टाइप स्वस्तातल्या पेपर बॅक्स कादंबऱ्या त्यांच्या 'सोप' फॅक्टरीतून नियमितपणे बाहेर पडत असतात. क्यूं की वह बीबियाँ बदलते थे, विधवा का पती, गुन का फैसला यासारखी शीर्षके असणाऱ्या, न्यूजप्रिंटवर छापलेल्या, वीस पंचवीस रुपयांना मिळणाऱ्या या कादंबऱ्या हिंदी वाचकांना टाइमपास करायला फारच मदत करतात. वर्षाला दोन ते आठ कादंबऱ्या लिहिण्याचा करार असून प्रत्येक कादंबरीला दोन लाख रुपये किमान मानधन त्यांना मिळते. या कादंबऱ्या न्यूजप्रिंटवर छापल्या जातात, स्वस्तात मिळतात म्हणून त्यांची वाङ्मयीन किंमत क्षुल्लक लेखू नका, त्या चांगल्या वाङ्मयीन कादंबऱ्याप्रमाणेच मेहनत करून लिहिल्या जातात असे वेद प्रकाश शर्मा म्हणतात. त्यातल्या काही कांदबऱ्यांवर चित्रपटही निघाले आहेत. बहु माँगे इन्साफ, इंटरनॅशनल खिलाडी, सबसे बडा खिलाडी वगैरे चित्रपटांना उत्तम पटकथेचे पुरस्कारही मिळाले आहेत. वर्दीवाला गुंडा या कादंबरीच्या आठ लाख प्रती खपल्या आहेत, आणि तिचा इंग्रजी अनुवादही लौकरच बाजारात येणार

आहे. वेद प्रकाश शर्मा आपल्या या यशावर खूष आहेत. ''मला इंग्रजी वाचता येत नाही. त्यामुळे माझ्यावर कोणी वाङ्मयचौर्याचा आरोप करू शकणार नाही.'' असे ते म्हणाले.

हिंदीमध्ये लक्षावधी प्रतींची मजल गाठणारे काही लोकप्रिय लेखक आहेत. गुलशन नंदासारखे. त्यांनी मोठा वाचकवर्ग मिळवला. त्यांचेच अनेक वारसदार आजही त्यांचे कार्य पुढे नेत आहेत. वेद प्रकाश शर्मा हे त्यातील एक... मराठीत त्यांना आजतरी प्रतिस्पर्धी नाही.

## ● डिजिटल पुस्तकांद्वारे मराठी साहित्यक्षेत्रातले सीमोल्लंघन

विजया दशमी म्हणजे सीमोल्लंघनाचा दिवस. यंदाचे सीमोल्लंघन मराठी साहित्यक्षेत्र डिजिटल पुस्तकांद्वारे साजरे करीत आहे असे म्हटले तर ते यथार्थच ठरेल. तसे पाहिले तर सीडीवर मराठी पुस्तके उपलब्ध होऊ लागली आहेत. परंतु त्यांचे स्वरूप प्रयोगात्मक राहिले आहे. व्यावसायिक पातळीवर तसे प्रयत्न अजून फारसे झालेले नव्हते. आता एमएमएस डिजिटल कंपनीची त्यासाठी माणिक वैद्य आणि संजीव वैद्य यांनी स्थापना केली असून त्यासाठी उत्कर्ष प्रकाशनच्या सुधाकर जोशींचे सहाय्य त्यांनी मिळवले आहे. डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट एमएमएस डिजिटल डॉट कॉम या संकेत स्थळावर वैद्यांनी व्यंकटेश माडगूळकर, शांता शेळके, प्रा. राम शेवाळकर, रवींद्र पिंगे, सुधीर गाडगीळ वगैरे लेखकांची पुस्तके डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून दिली आहेत. ती मुद्रित स्वरूपात याआधीच बाजारात वाचकांना मिळू शकतात. परंतु आता ती संगणकावर वाचण्याची सुविधाही या नव्या व्यवस्थेमुळे वाचक-रसिकांना घेता येईल. लोकप्रिय पुस्तके ही पारंपरिक मुद्रित स्वरूपाबरोबर आता सीडीवर आणली जात आहेत आणि इंटरनेटवर विशिष्ट शुल्क भरून ती डाऊनलोड करता येतील. तूर्त २६ पुस्तके एमएमएस कंपनीने प्रारंभादाखल डिजिटल केली आहेत, त्याचप्रमाणे विपुलश्री, माहेर, मेनका यांचे अंकही या वेबसाइटवर पाहता येतील. क्रेडिट कार्डद्वारे वाचकांनी विशिष्ट शुल्क भरल्यावर इंटरनेटवरून डाऊनलोड करून सीडीवर घेता येतील. सीडीवरून ती वाचता येतील. काही पुस्तके लेखकाच्या किंवा एखाद्या कलावंताच्या माध्यमातून कथाकथनाप्रमाणे ऐकताही येतील. ज्यांना वाचणे अवघड वा कंटाळवाणे वाटते, त्यांना ही श्राव्य पुस्तके श्रवणाद्वारे कानामनात साठवून त्यांचा आनंद घेता येईल. तूर्त हे तंत्रज्ञान काहीसे खर्चिक आहे, त्यामुळे छापील पुस्तकापेक्षा ते महागडे वाटणे स्वाभाविक आहे. डॉलरच्या भाषेत हिशेब केला तर एका पुस्तकासाठी सात-आठ डॉलर्स म्हणजे तीनशे-चारशे रुपये पडतील. संगणकाच्या मॉनिटरवर पानामागून पाने वाचत जाणे हे ही आरंभी डोळ्यांना कष्टदायक ठरू शकेल. छापील पुस्तकाच्या वाचनापेक्षा संगणकावरच्या फल्कावर वाचणे हा दमछाक करणारा अनुभव ठरेल.

परंतु या तंत्रज्ञानाचा वापर आता अधिकाधिक होत राहणार. काही पुस्तके छापील स्वरूपात निघणारच नाहीत, ती दृक-श्राव्य सीडीच्या स्वरूपातच यापुढे निघतील. त्यांचा आस्वाद घेण्यासाठी संगणकाचा वापर अटळ ठरेल. अमेरिका-यूरोपमधील बरेच लेखक पुस्तक प्रकाशनासाठी प्रकाशकांकडे खेटे मारण्याला वैतागलेले आहेत, ते आपली पुस्तके सीडीच्या रूपात इंटरनेटवर वेबसाइटवर टाकतात आणि जिज्ञासू वाचक त्यांचा लाभ घेतात. त्यासाठी आवश्यक ते शुल्क अर्थातच देण्याची त्यांची तयारी असते. मराठीतील काही आघाडीचे प्रकाशक नव्या लेखकाला सांगतात - आमच्याकडे पुस्तक निघायला ४ वर्षे तरी लागतील... अशा वेळी लेखक आपली पुस्तके डीटीपी करून सरळ वेबसाईटवर टाकू शकतील... संजीव वैद्य यांनी मराठीत त्यादृष्टीने प्रयत्न सुरू केले ही स्वागतार्ह बाब आहे. त्यांनी आपले दर हे स्पर्धात्मक ठेवले तर त्यांना प्रतिसाद मिळणे सोपे जाईल.

## ● विज्ञानमंत्री कपिल सिब्बल यांच्या काव्यलेखनाचे रहस्य : मोबाईल

मोबाईलचे अनेक फायदे आपल्याला अचंबित करतात. कोणाही व्यक्तीशी कधीही संपर्क साधण्याचे एक सुलभ आणि स्वस्त साधन म्हणून मोबाईलने अल्पावधीतच सर्वांना झपाटून टाकले आहे. फोन, कॅमेरा, टेपरेकॉर्डर, रेडिओ, म्युझिक प्लेयर, कॅलेंडर, ऑर्गनायझर, संदेशवाहक इत्यादी सर्व सुविधांचा संगम त्यात झाला आहे. आता मोबाईलमुळे काव्यरचनेलाही स्फूर्ती मिळते आणि कवीही बनता येते ही आणखी एक मोबाईलची खासियत जाणवू लागली आहे. भारताचे एक अग्रगण्य कायदेपंडित आणि केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री कपिल सिब्बल यांचा 'आय विटनेस : पार्शल ऑब्झर्वेशन्स' हा काव्यसंग्रह इंडिया इंक / रोली या प्रकाशन संस्थेने नुकताच प्रकाशित केला आहे. संसदेत पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी भारत-अमेरिका अण्वस्त्र करारासंबंधात विश्वासदर्शक प्रस्ताव मांडला. त्यावर गरमागरम चर्चा झाली. त्या चर्चेच्या दरम्यान शेवटच्या दिवशी ठरावावर मतदान होण्यापूर्वी भाजपाच्या काही खासदारांनी लाच म्हणून मिळालेली नोटांची पुडकी सभागृहात आणून सर्वांनाच नि:शब्द करून सोडले. या घटनेवरची कविता कपिल सब्बिल यांनी आपल्या मोबाईलवर लिहिली... ती या पुस्तकात समाविष्ट करण्यात आलेली आहे. 'टू ट्रस्ट ऑर नॉट टू ट्रस्ट' हे तिचे नाव.

*२२ जुलै*
*एक संस्मरणीय दिवस*
*विश्वासघाताचा तसेच*
*विश्वासाचा*
*गोंधळात आणि गदारोळात*
*आम्ही विजय मिळवला*

*निश्चितच भरभक्कम!*

संसद म्हणजे सार्वभौम न्यायाचे मंदिर. त्यावर भ्रष्टाचाराने आणि हावरेपणाने केलेले आक्रमण... तरीही राष्ट्राला पुढे मार्गक्रमण करणे क्रमप्राप्तच आहे असे शेवटी अंतर्मुख करणारे चिंतन.

राजकीय धकाधकीत आणि धावपळीत आपल्या मोबाईलवर एसएमएसच्या रूपात कपिल सिब्बल यांनी अशा अनेक कवितांचे लेखन केले.. आणि हा १४४ पृष्ठांचा संग्रह लगेच प्रसिद्धही केला. प्रकट चिंतनाच्या स्वरूपातील या सर्व रचना, त्यात काव्याचे, छंदलयीचे किंवा यमकाचे फारसे अवडंबर माजवलेले आढळणार नाही. परंतु अधूनमधून होणारा विनोदाचा शिडकावा आणि सद्य:स्थितीवरचे भाष्य या सर्व रचनांमध्ये वाचकांना गुंतवून ठेवते. कपिल सिब्बल यांच्या या कविता मोबाईलमुळे निर्माण झालेल्या असल्या तरी त्यात त्यांची निरीक्षणशक्ती, चिंतनशीलता, चिमटे घेण्याची प्रवृत्ती, राजकारण्यांवर तिरकस भाष्य करण्याची हौस, आणि काव्यरचनेतील सफाई जाणवते. राजकारणाचा आणि भेटीगाठींचा तगादा असतानाही पार्लमेंटमध्ये किंवा कार्यक्रमात थोडाफार वेळ मिळाला तर मोबाईलवर आपले विचार व्यक्त करणारे एसएमएस लिहिणे शक्य असते. त्यातूनही काव्य निर्माण होते आणि संग्रह निघू शकतात हे सिब्बल यांनी दाखवून दिले आहे.

## ● पुणे बुक फेअर

पुणे बुक फेअर हा उपक्रम गेटवे फेअर्स प्रा. लि. या संस्थेतर्फे पी. एन. आर. राजन हे उत्साही कार्यकर्ते गेली पाच वर्षे राबवत आहेत. सीबीएक्स (बांधकाम आणि गृहप्रकल्प प्रदर्शन), ऑटो ००८ (ऑटोमोबाइल) ही प्रदर्शनेही गेटवेतर्फे आयोजित करण्यात येतात.

सातवे ग्रंथप्रदर्शन गणेश कला क्रीडा मंदिरमध्ये दि. १५ ते १९ ऑक्टोबर दरम्यान भरले. त्याचे उद्घाटन डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी सकाळचे संपादक यमाजी मालकर आणि वाडिया कॉलेजचे माजी प्राचार्य एच. डी. मूगट हे उपस्थित होते. डॉ. नरेंद्र जाधव यांनी अशा प्रदर्शनांचा उपयोग वाचन संस्कृतीच्या प्रचारासाठी होतो, सकस साहित्याला मोठा वाचकवर्ग असतो असे प्रतिपादन केले. सध्या तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे ऐहिक समृद्धी वाढत आहे. परंतु सांस्कृतिक समृद्धीही त्याच प्रमाणात वाढायला हवी याकडे आपले पुरेसे लक्ष नाही. वाचनामुळे ती वाढू शकेल. चिंतन करणारा, चिंतनशील, विचारी समाज निर्माण होण्यासाठी आणि समंजसपणे सर्व समाजाचे व्यवहार चालवण्यासाठी योग्य ती मानसिकता वाचन संस्कृतीमुळेच निर्माण होऊ शकते असे विचार यमाजी मालकर यांनी मांडले.

या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात इराणचा स्टॉल होता. फ्रेंच, जपानी, चिनी,

पर्शियन पुस्तके उपलब्ध होती. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन, हेरिटेज इंडिया, सनातन संस्था, सोशिओ-लिगल इन्फर्मेशन सेंटर, साहित्य अकादमी, पुणे महापालिका, नॅशनल बुक ट्रस्ट, ओरिएंट ब्लॅक स्वान, लोकायत, भारत सरकारचा प्रकाशन विभाग, गोवा कोकणी अकादमी, जनगणना विभाग, डेनेट आणि कंपनी, सेंटर फॉर स्टडीज इन सिव्हिलिझेशन वगैरे संस्थांचे स्टॉल्सही होते. तेजग्यान, सुविद्या, सन पब्लिकेशन असे मोजकेच मराठीतील व्यावसायिक प्रकाशक होते. सामना, केसरी, प्रभात, पुणे चिंचवड समाचार, चित्रलेखा या वृत्तपत्रांचाही सहभाग होता. या प्रदर्शनाला मराठी प्रकाशन संस्थांचा फारसा प्रतिसाद मिळत नाही. स्टॉलच्या किमान १५ हजार रुपये भाड्याच्या मानाने पुस्तकांची विक्री होत नाही हे मुख्य कारण. तरीही इराण, पाकिस्तान वगैरे देशांतील प्रकाशक, भारतीय व अन्य संस्था यांना या प्रदर्शनाकडे आकृष्ट करून घेण्यात आयोजक यशस्वी होतात हे फारच कौतुकास्पद वाटते. अत्रे सभागृहात अक्षरधारा, शुभम साहित्य वगैरेंच्या प्रदर्शनाला एका दिवसात जेवढी माणसे भेट देतात, तेवढी माणसे पुणे बुक फेअरला पाच दिवसातही येतात असे नाही. वाचक-ग्राहक नसेल तर बुक फेअरला प्रतिसाद कसा मिळणार? त्यासाठी प्रसिद्धीचे आणखी काही मार्ग चोखळणे जरूर आहे. आलेल्या स्टॉलवाल्यांना चांगला धंदा मिळायला हवा. पुणे बुक फेअरमध्ये 'पुणे' हे नाव अग्रभागी असल्याने परदेशातून वा दिल्लीहून येणाऱ्या प्रकाशकांचा येथे पुस्तके खपत नाहीत असा ग्रह होता कामा नये. पुण्याची शान सांभाळली गेली पाहिजे. स्टॉल्सची संख्या ७०च्या आतबाहेर असते. ती देखील त्यामानाने अल्पच आहे. पुस्तकांची संख्याही बेताचीच... हे काही पुण्याला शोभत नाही.

## ● पुणेकर साहित्यिकांना डावलणारा भारतीय लेखकांचा मेळावा

साहित्य अकादमीच्या प्रेरणेने आणि पुढाकाराने पुण्यामध्ये भारतीय भाषांतील साहित्यकारांचे दोन दिवसांचे संमेलन घेण्यात आले. गुजराती, मराठी, कोंकणी, आसामी, मणिपुरी, नेपाळी, बंगाली आणि सिंधी या भाषांमधील चाळीसावर साहित्यिक या संमेलनाला उपस्थित होते. ईशान्य भारतातील आणि पश्चिम भारतातील लेखक-कवींमधील संपर्क आणि संवाद वाढावा म्हणून साहित्य अकादमीने वेगवेगळ्या भाषांतील आणि भागातील लेखक-कवींना एकत्र आणण्याचा एक प्रकल्प राबवण्याचे ठरवले आहे. या वर्षी या अगोदर गोवा आणि अहमदाबाद येथे अशा दोन मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले होते.

साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळवलेल्या लेखकांना साहित्य अकादमीच्या लखी एक स्वतंत्र आणि मानाचे स्थान असते. त्यांना अकादमीच्या विविध उपक्रमात सहभागी करून घेण्यात येते. त्यामुळे या परिषदेतही त्यांना प्राधान्य मिळणे स्वाभाविक

आहे. साहित्य अकादमीचे अध्यक्ष बंगाली साहित्यकार सुनील गंगोपाध्याय आणि सचीव ए. कृष्णमूर्ती यांचीही या परिषदेला उपस्थिती होती. या मेळाव्याचे निमंत्रक म्हणून 'उचल्या' या अकादमी पुरस्कार विजेत्या पुस्तकाचे लेखक लक्ष्मण गायकवाड यांची योजना झाली होती. त्यांनीच प्रास्ताविक भाषण केले. इंदिरा पूनावाला शबनम या पुण्याच्या कवयित्री आणि विनोद अस्सुदानी यांनी सिंधीचे प्रतिनिधित्व केले. कोकणीचे आर. एस. भास्कर, गजानन जोग, पुंडलिक नाईक, गुजराती कवी दिलीप झवेरी, मीनल दवे, किशोर सोळंकी यांचा सहभाग होता. बंगाली लेखक देवव्रत देव, आसामी लेखक प्राणजित बोरा यांनी काव्यवाचन सत्रात आपल्या कविता वाचून दाखवल्या. मणिपूरच्या चकमा या बोलीभाषेतील जोगमाया चकमा यांचेही काव्यवाचन ऐकायला मिळाले. अकादमीचे पुरस्कार विजेते मैबाम नभकिशोर सिंग, जेरी पिंटो (इंग्लिश) सुधन्य त्रिपुरा (कोकबोरोक भाषा) यांचीही हजेरी लागली होती.

एवढे भारतीय पातळीवरचे हे आयोजन साहित्य अकादमी करते; परंतु पुण्यातील साहित्यिकारांना त्याची योग्य ती पूर्वसूचनाही देऊन या अन्यभाषक कविलेखकांना भेटण्याची काही योजना करीत नाही याचे आश्चर्य वाटले. मराठीच्या सल्लागार मंडळाचे निमंत्रक लक्ष्मण गायकवाड यांना तशी काही गरज वाटली नाही, हेही खटकल्याविना राहत नाही.

**शंकर सारडा**


**नवे कोरे**

## ज्याचा त्याचा...


**विजय तांबे**

मळलेल्या वाटांची मिरासदारी
जरा दूर झटकून
नेहमीचे थांबे, वळणं आणि
रुजलेल्या खुणा
यांसकट नियम-रिवाजांना
अलगद बगल देऊन,
नवं काही शोधलं जातं,
संपूर्ण परिघाबाहेरचं
तुम्हाला खिळवून ठेवणारं,
अंतर्मुख करणारं
अशीच अनुभूती देतो
'ज्याचा त्याचा'...



**१२०रु. पोस्टेज २५रु.**

## नवे कोरे




# आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान

निरंजन घाटे

आजच्या आधुनिक 'माहिती - तंत्रज्ञान' युगाची बीजं दाखविणाऱ्या प्राचीन तंत्रज्ञानाची अनोखी ओळख


**१८०रु. पोस्टेज २५रु.**

# आपल्या पूर्वजांचे विज्ञान

निरंजन घाटे

आजच्या विज्ञान युगाचा पाया घालणाऱ्या महत्त्वपूर्ण शोधांचा अपूर्व मागोवा


**१८०रु. पोस्टेज २५रु.**




**मेहता पब्लिशिंग हाऊस**

## नवे कोरे

# द हंग्री स्पिरिट




**चार्ल्स हॅन्डी**
अनु. प्रशांत तळणीकर

**२००रु. पोस्टेज २५रु.**

एकीकडे जगातील एकतृतीयांश कामगार बेकार आहेत, तर त्याच वेळी दुसरीकडे जगाच्या एकूण व्यापाराच्या दोनतृतीयांश व्यापार फक्त ५०० कंपन्यांच्या हातांत आहे. या कंपन्या केवळ आपल्या गुंतवणूकदारांनाच उत्तरं देण्यास बांधील आहेत. या विषमतेच्या आणि अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर, बाजारपेठेला अभिमुख भांडवलशाहीपेक्षा अधिक चिरंतन आणि समृद्ध मूल्यांची गरज आहे असे चार्ल्स हॅन्डी यांचे प्रतिपादन आहे. जगभर त्यांच्या पुस्तकांच्या दहा लाखांहून जास्त प्रती खपल्या आहेत.

द हंग्री स्पिरिट हे एक प्रेरणादायी पुस्तक आहे. या पुस्तकात लेखकाच्या व्यक्तिगत विचारांची कळकळ तर जाणवतेच, पण त्यात आशावाद ठासून भरलेला आहे.

''चार्ल्स हॅन्डी : द हंग्री स्पिरिट म्हणजे आयुष्यभराच्या अनुभवांचं सार आहे. भांडवलशाही समाजामध्ये तग धरण्याचा हा एक व्यक्तिगत पवित्रा आहे. हॅन्डी यांची गोष्टीरूपानं विचार मांडण्याची शैली वाचकांना खिळवून ठेवते. हे एक महत्त्वपूर्ण पुस्तक आहे.'' : पीपल मॅनेजमेंट.

''द हंग्री स्पिरिट हा उद्योग-व्यापार संबंधित समस्यांचा तसेच सामाजिक अभिसरणाचा एक विस्तृत शोध आहे. या समस्यांचं हे एक चातुर्यपूर्ण, विद्वत्तापूर्ण आणि विवेकी विश्लेषण आहे.'' : मॉडर्न मॅनेजमेंट.

''चार्ल्स हॅन्डी हे जागतिक दर्जाचे ब्रिटनचे एकमेव व्यवस्थापन गुरू आहेत.'' : डायरेक्टर मासिक.

# पुस्तक परिचय

## सहावा अवतार परशुराम -
## विलक्षण घटनांनी भरलेले अद्‌भुत जीवन

# परशुधारी परशुराम

**सुधाकर शुक्ल**



**प**रशुधारी परशुराम ही सुधाकर शुक्ल यांची कादंबरी मानवी संस्कृतीतील एक महत्त्वपूर्ण टप्प्यावर प्रकाश टाकते. परशुरामाच्या चरित्रातील घटनांद्वारे ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यातील वेगळेपणाचे स्वरूप स्पष्ट करते. अनेक मूलगामी प्रश्न निर्माण करते.

दशावतारांपैकी मत्स्य, कूर्म, वराह आणि नरसिंह हे सजीवांच्या उत्क्रांतीच्या आरंभीचे चार अवतार प्राणीविश्वाशी निगडित आहेत. पाचवा वामन अवतार हा मानवाचा आद्य प्रतिनिधी दिसतो. बळीकडे त्याने तीन पावलांची भूमी मागितली आणि त्रैलोक्याचे स्वामीत्व मिळवले. परंतु त्याच्याबद्दल फार माहिती मिळत नाही. परशुराम हा सहावा अवतार. त्याच्याबद्दल मात्र बरीच माहिती मिळते. मानवी पराक्रमाचे आरंभीचे सर्वोत्तम प्रतीक म्हणून आपल्यापुढे तो उभा राहतो. त्याच्या जीवनचरित्रात अनेक विरोधाभास आढळतात.

तो ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज या दोहोंनी संपन्न आहे. ब्राह्मण आणि क्षत्रिय या दोन वर्णांचा संगम त्याच्यात झालेला आहे. या दोन्ही वर्णांचा संगम होणे त्या काळी समाजाला, धर्माला, नीतिव्यवस्थेला मान्य नव्हते. वेदविद्या आणि धनुर्विद्या या दोहोंचे ग्रहण करण्याच्या मार्गातही परशुरामाला आरंभी अडथळे आल्याचे दिसते. क्षत्रिय राजाच्या पोटी जन्मलेला विश्वामित्र, त्याने धनुर्विद्या संपादन केली. ब्रह्मर्षी वसिष्ठांच्या ब्राह्मतेजाने विश्वामित्राचा पराभव केला. विश्वामित्राने तपश्चर्या केली तेव्हा वसिष्ठांनी त्याला ब्रह्मर्षिपद दिले, अशीही कथा आहे.

परशुरामाच्या बाबतीत वेगळाच तिढा आहे. जमदग्नी ऋषी आणि यज्ञकन्या रेणुका हे परशुरामाचे जन्मदाते. जमदग्नीचे वडील भृगु कुळातील ऋषी ऋचिक. त्यांची पत्नी ही गाधीराजाची कन्या सत्यवती. सत्यवती आपल्याला क्षत्रिय पुत्र व्हावा आणि आपल्या आईला तपोनिष्ठ ब्राह्मण पुत्र व्हावा अशी इच्छा ऋचिक ऋषीजवळ व्यक्त करते. प्रसाद म्हणून ते दोन चरू मंत्रून सत्यवतीला देतात. सत्यवती आपला प्रसाद आपल्या मातेला देते आणि मातेचा प्रसाद स्वत:ला घेते. हे कळल्यावर ऋचिक ऋषी अस्वस्थ होतात. ही फार मोठी चूक झाली असे म्हणतात. कारण सत्यवतीला जो पुत्र होतो तो तपोनिष्ठ ब्राह्मण असतो; तर तिच्या आईला म्हणजे गाधीराजाच्या पत्नीला होणारा पुत्र क्षत्रिय होतो. हा घोटाळा निस्तरण्यासाठी 'आपल्या ब्रह्मनिष्ठ पुत्राला पराक्रमी क्षत्रिय पुत्र व्हावा' असा नवा वर ऋचिक ऋषी देतो. त्यामुळे जमदग्नी-रेणुका यांना झालेला राम हा पुत्र क्षत्रिय होणे क्रमप्राप्त ठरते. जन्माने तो ब्राह्मण. वेदविद्या तो वडिलांकडूनच ग्रहण करतो. त्यानंतर तो वडिलांना सांगतो, ''वेदविद्या मला प्राप्त झाली आहे. आता मला धनुर्विद्या शिकायची आहे.'' जमदग्नी त्याच्याशी वाद घालतात परंतु रामची प्रबळ इच्छा जाणून ''गुरू कश्यप यांच्याकडे जाऊन धनुर्विद्या घे'' असे सुचवतात.

कश्यप ऋषी हे सप्तर्षींपैकी एक. प्रजापती दक्षाने त्यांना आपल्या तेरा मुली दिल्या. त्या संबंधातून कश्यपाने स्थावरजंगमाची निर्मिती केली. (इंद्रासह सर्व देवता आणि बारा आदित्य, दैत्य, दानव, सिंह, व्याघ्र वगैरे वनचर प्राणी, असुर, गरुड, अरुण वगैरे पक्षी, सर्प नाग आदि सरपटणारे प्राणी या सर्वांचा त्यात समावेश होतो.)

परशुरामानेही आपण जिंकलेल्या सर्व क्षत्रिय राजांची राज्ये पुढे कश्यपालाच गुरूदक्षिणा म्हणून दिली आणि 'नवी भूमी निर्माण कर, सह्यगिरीच्या पश्चिमेला असलेल्या सागराला मागे हटवून अपरान्तभूमी तयार कर. तेथे वस्ती वाढव' या कश्यपाच्याच आदेशावरून कोकण प्रदेशाची उभारणी केली.

बारा वर्षाच्या कालावधीत कश्यपांच्या आश्रमात धुनर्विद्या संपादन करीत असतानाच अग्नी अस्त्र, वायू अस्त्र, वरुण अस्त्र, मोहनास्त्र वगैरे रामला प्राप्त होतात त्यांच्याच आज्ञेवरून तो गणपतीची तपश्चर्या करतो. गणेश प्रसन्न झाल्यावर आपला परशु रामला देतो. त्यामुळे तो 'परशुराम' होतो. इतर अस्त्रांसाठी मात्र शंकराची तपश्चर्या कर असे गणेश सुचवतो. पुढे शंकराकडून परशुरामाला काही अस्त्रे आणि शिवधनुष्य प्राप्त होते.

ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज या दोहोंनी संपन्न असणाऱ्या परशुरामाला आपला पराक्रम दाखविण्याची अनेक निमित्ते मिळतात.

अकृतव्रण या कुमाराच्या मागे वाघ लागतो. तेव्हा राम त्या वाघाला ठार मारून अकृतव्रणाचे प्राण वाचवतो. हा अकृतव्रण शेवटपर्यंत परशुरामबरोबरचे संबंध जपत राहतो. अकृतच्या पित्याने वेदशाळा चालवली म्हणून त्याला मालवनगरीच्या राजाने मृत्युदंड दिला. हे ऐकल्यावर त्याच्या आईने देहत्याग केला त्यामुळे 'हा मालव देशाचा राजा आपल्या नगरीत ऋषिमुनींना मज्जाव करतो. प्रजेवर जुलूम करतो.' म्हणून परशुराम त्याला वठणीवर आणतो. तेव्हा परशुरामाचे वडील जमदग्नी नाराज होतात. 'राजाला दंड देण्याचा अधिकार ब्राह्मणांना किंवा तपस्व्यांना नाही' ही त्यांची भूमिका असते.

''युद्ध करण्याची माझी इच्छा नाही. स्वत:हून मी युद्ध करणार नाही. परंतु कोणी राजा आमच्यावर अन्याय करू लागला तर शिवधनुष्याच्या बाणावर त्याचा मृत्यू अटळ आहे.'' असे परशुराम आपल्या वडिलांना सांगतो.

वसू हा त्याचा पाठशाळेतला मित्र त्याला भेटतो. सहस्रार्जुन हा हैहय या देशाचा उन्मत्त राजा ऋषिमुनींना त्रास देतो, आश्रम उद्ध्वस्त करतो, अशी माहिती वसू देतो. या सहस्रार्जुनाने जमदग्नींचा आश्रमही उद्ध्वस्त केलेला असतो. परंतु जमदग्नींचे महत्त्व जाणल्यावर तो आश्रम त्याने पुन्हा उभा करून दिलेला असतो. आपले पिताश्री मिंधेपणाने बोलतात याचे कारण तेव्हा परशुरामाच्या लक्षात येते. सहस्रार्जुनाने नारायणाची भक्ती केल्याने नारायणाने आपला अजिंक्य रथ त्याला दिलेला असतो,

त्यामुळे तो अजिंक्य मानला जातो. बल, पुरुषार्थ, पराक्रम आणि अनियंत्रित सत्ता यामुळे तो प्रजेवर अत्याचार करू लागतो. अग्नीवर तो अस्त्रे फेकतो, नागराजाला आव्हान देतो. रावणाला बंदीखान्यात डांबतो, दहशत निर्माण करतो.

या अन्यायी राजाशी युद्ध करून प्रजेला अत्याचारापासून वाचवावे असा निर्धार परशुराम करतो. सहस्रार्जुनाचा विनाश करण्याचा विचार तो वडिलांजवळ व्यक्त करतो तेव्हा ते त्याला त्यापासून परावृत्त करू पाहतात. मात्र अन्याय निवारणार्थ पराक्रमी वीरांनी शस्त्रांचा उपयोग करायलाच हवा असेही नि:संदिग्धपणे सांगतात.

अत्री ऋषी त्याला सांगतात, ''सहस्रार्जुनाचे आचरण उन्मत्तपणाचे आहे. त्याचा विनाश अटळ आहे. तो शेवट एका बलाढ्य पराक्रमी धनुर्धारीकडून होणार आहे... माझा तुला आशीर्वाद आहे.''

परशुराम तीर्थयात्रा चालू ठेवतो. ब्रह्मर्षी विश्वामित्रांची गाठ पडते. जमदग्नींचा पुत्र म्हटल्यावर विश्वामित्र आपल्या आणि वसिष्ठांच्या संघर्षाची कहाणी परशुरामला सांगतात. वसिष्ठ अजिंक्य ठरले, त्यांनीच ब्रह्मर्षी हे पद आपल्याला दिले. परंतु तरीही आपण दु:खी, अशांत आणि क्रोधी आहोत.. ''गाधीराजाचा पुत्र - क्षत्रिय - ब्रह्मर्षी झाला तरी मूळ क्षत्रिय धर्म कसा विसरता येईल?'' असा प्रश्न परशुराम विचारतो. वसिष्ठांचा आश्रम सहस्रार्जुनाने जाळला तेव्हा क्षत्रिय असूनही आपण त्याला रोखू शकलो नाही याची खंत वाटते असे मान्य करतात. परशुराम वसिष्ठांच्या आश्रमात जातो. सहस्रार्जुनाच्या हल्ल्याबद्दल विचारतो तेव्हा वसिष्ठ म्हणतात, ''आश्रम उद्ध्वस्त केला म्हणून मी उद्ध्वस्त झालो असे नाही.. मनात क्रोध उत्पन्न होऊ नये म्हणून मी जागरूक असतो... सहस्रार्जुनाच्या अस्त्रांचाही माझ्यावर प्रभाव पडला नाही... नवा आश्रम मी उभारला... मात्र सहस्रार्जुनाशी तू संघर्ष करणार असशील तर मी तुझ्या बाजूने असेन... या युद्धात जय किंवा पराजय या दोन्ही गोष्टी घडणार नाहीत. धर्माकरिता होणाऱ्या युद्धात जय वा पराजय मानू नये. शत्रूच्या मनात शत्रुत्व निर्माण झालं तरी तुझ्या मनात शत्रुत्व निर्माण होऊ नये. कर्तव्यपालन म्हणून तू युद्ध कर.''

ऋषिमुनींना विदेह नगरीत नेऊन बंदिवासात डांबणाऱ्या प्रभास राजाला 'सत्यव्रत आणि इतर ऋषिमुनींना मुक्त कर' असे परशुराम सांगतो. परशूच्या भयाने तो ते मान्य करतो. तेव्हा परशुराम त्याला बजावतो, ''ऋषींना बंदी करणं हा तुझा मोठा अपराध आहे... पुन्हा भेटशील तेव्हा अपराधाची शिक्षा भोगावी लागेल.''

तीर्थयात्रा संपल्यावर जमदग्नींच्या आश्रमात शिरताना शिष्य अकृत परशुरामला म्हणतो, ''ऋषिवर्य, आज आश्रमाकडे जाऊ नका. जमदग्नी रागात आहेत. रेणुकेला पाणी घेऊन यायला उशीर झाला म्हणून ते संतापले आहेत.'' तरीही परशुराम आश्रमात जातो.

वडील जमदग्नी त्याला आदेश देतात, ''पित्याची आज्ञा तू मानणार आहेस...

हा परशू उचल आणि मातेचं मस्तक शरीरापासून वेगळं कर... माझ्या आज्ञेचं पालन कर...''

''मी पित्याची आज्ञा मानू की गुरुजींची? तुमची आज्ञा स्वीकारली तर स्त्रीहत्येचा अपराध घडेल. मातृहत्येचा दोष स्वीकारावा लागेल.. पण मी तुमची आज्ञा मानतो.''

''...माते, क्षमा कर... मला कठोर शाप दे... तो मी स्वीकारीन...''

परशुराम आपल्या मातेचे शिर धडावेगळे करतो.

तो उद्विग्न होऊन तेथून जाऊन पाहतो तेव्हा वडील म्हणतात, ''मातेच्या चितेला अग्नी न देता निघालास? मी तुला मातृहत्येच्या अपराधापासून मुक्त करतो.. हवा तो वर माग...''

''मातृहत्येचं हे पातक माझ्या शिरावरून दूर करा. मातेला जिवंत करा.''

''तुझ्याकडून हीच अपेक्षा होती'' असे म्हणून जमदग्नी संजीवनी मंत्राने रेणुकेला जिवंत करतात...

जमदग्नींनी क्रोधाचा त्याग करावा असाही दुसरा वर परशुराम मागतो.

आपल्याच आईची पित्याच्या आदेशाने हत्या करणे ही परशुरामाच्या जीवनातील एक विस्मयकारक घटना आहे...

बायकोचा शिरच्छेद करण्याएवढे जमदग्नी एवढे संतप्त का झाले?

जलाशयावर चित्रगंधर्व इतर स्त्रियांबरोबर शृंगार करीत होता. पाणी आणायला गेलेली रेणुका त्याकडे पाहत राहिली. शृंगाराची भावना तिच्याही मनात जागी झाली. चित्रगंधर्वाबद्दल नाही तर स्वतःच्या पतीच्या संदर्भात... तिचा पतिव्रताधर्म कायमच होता. परंतु तरीही पत्नीचा वध करण्याएवढे ते संतापतात. हा वध स्वतः न करता ते परशुरामला करायला लावतात... याची कारणमीमांसा करणे आजही अवघड वाटते.

''राम, तू दोषी नाहीस. मातृहत्येचं पातक तुला लागणार नाही. रेणुका माझी पत्नी आहे. धर्मकार्यात मदत करणाऱ्या पत्नीची हत्या झाली असती तर तिचा पती अपराधी धरला गेला असता... रेणुकेचा मृत्यू हा खरा मृत्यू नव्हताच. ती याज्ञसेना आहे. अग्निसेना आहे. वधाची क्रिया घडली तरी तिचा वध झाला नाही हे लक्षात ठेव...''

परशुराम गंधर्वाची भेट घेऊन त्या जलाशयावर पुन्हा कधी न येण्याची ताकीद देतो. आजोबा ऋचिक ऋषीही परशुरामाला ''तुझा अपराध तू विसरून जा'' असे सुचवतात. ''तुझ्या हातून लोककल्याणाचे कार्य होणार आहे... कारण नसताना अपराधाच्या भावनेत तू गुंतून राहू नकोस. न्याय, नीती आणि धर्म यांच्या रक्षणासाठी तुझा जन्म आहे.''

ऋचिक ऋषी परशुरामाला आपल्याजवळचे वैष्णव धनुष्य देतात. ते त्यांना स्वतः भगवान विष्णूंनी दिलेले असते. ''हे धनुष्य तुला अन्यायाच्या प्रतिकारार्थ दिले

आहे. त्यामुळे तुझे सर्व जीवन बदलून जाईल. शिवधनुष्य आणि वैष्णव धनुष्य यांचे अपूर्व तेज आणि तुझा पराक्रम याद्वारे संपूर्ण पृथ्वी अन्यायापासून मुक्त होऊन जाईल. क्षत्रियाचे बल शस्त्रातून प्रकट होते. महत्त्वाची सारी अस्त्रं तुला प्राप्त झाली आहेत. लोककल्याण आणि अन्यायनिवारण यासाठी सिद्ध हो.''

तपश्चर्या करण्यासाठी परशुराम प्रभास क्षेत्री जातो. भगवान शंकरांच्या विश्रांतीचे ते स्थळ.

भगवान शंकर तपश्चर्येने प्रसन्न होतात. ''राम, आता आणखी तपश्चर्या करू नकोस... मातृहत्येची घृणा वाटू देऊ नकोस. नियतीच्या योजनेने काही घटना घडतात... खंत करू नकोस. तुझा जन्म कर्तव्य, कर्म आणि त्याग यासाठी आहे.. तू देहविसर्जन करण्याचा विचार मनातून काढून टाक.''

परशुराम विनंती करतो, ''भक्तांचा उद्धार व्हावा म्हणून आपण मी स्थापन केलेल्या पाषाणात वास्तव्य करावं. या पाषाणाला रामेश्वर लिंग म्हणून ओळखले जावे.''

शिवशंकर त्या विनंतीचा स्वीकार करतात, नारायणअस्त्र, अग्निअस्त्र, नागपाशअस्त्र, त्रैलोक्य विजय कवच वगैरे अस्त्रे व त्यांचे मंत्र देतात आणि अंतर्धान पावतात.

तेथून परशुराम पुलस्त्य ऋषींच्या आश्रमात जातो.

वाटेत गर्गमुनी भेटतात. सहस्रार्जुनाचे ते पुरोहित. सहस्रार्जुनाच्या मृत्यूची शापवाणी ते परशुरामाला ऐकवतात. पुलस्त्य ऋषीही अन्याय करणाऱ्या राजाचा विनाश करायलाच हवा असे त्याला सांगतात.

जमदग्नींच्या आश्रमातील कामधेनूची सहस्रार्जुन जमदग्नींकडे मागणी करतो. ती मान्य न झाल्याने आश्रम उद्ध्वस्त करून तो राजा कामधेनूला घेऊन जातो.

संतप्त परशुराम सहस्रार्जुनाच्या वधासाठी सज्ज होतो.

बृहस्पती ऋषी त्याला सांगतात, ''माझा दिव्य रथ मी तुला देतो. पण सहस्रार्जुनाचा वध एवढेच तुझे उद्दिष्ट असू नये... तुझ्या जीवनाचे उद्दिष्ट त्यापेक्षा मोठे आहे. आज लोकसमूह अनाथ आहे. त्याला कर्तव्याची जाणीव करून दे... तुला युद्धात नक्की जय मिळेल.''

...सहस्रार्जुनाशी, त्याच्या प्रचंड सैन्याशी एकटा परशुराम लढतो. त्याच्या सैन्याचा धुव्वा उडवतो.. अग्नी अस्त्र, वायू अस्त्र, पर्वत अस्त्र, नारायण अस्त्र... पण ही सर्व निष्प्रभ ठरतात. शेवटी विजयकवच... सहस्रार्जुनाचा राजमुकुट हवेत उडवून देते. परशुतून प्रखर अग्नीला घेऊन भयानक तेज सहस्रार्जुनावर आदळते... त्याचा रथ जळू लागतो. परशूचे वार... सहस्रार्जुन कोसळतो... त्याचे पुत्र घाबरून पळत सुटतात.

कामधेनूला घेऊन परशुराम आश्रमात येतो.

तरीही सहस्रार्जुनाचा वध केल्याबद्दल जमदग्नी परशुरामाला दोष देतात. ते आज्ञा देतात, ''ब्रह्महत्येच्या पातकातून मुक्त होण्यासाठी तपश्चर्येचा मार्ग स्वीकार.

आश्रम सोडून जा.''

तपश्चर्येला बसल्यावर भगवान शंकर परशुरामाला पाशुपत अस्त्र देतात. ''मातृहत्येचा कलंक तुला लागणार नाही.'' असा वर देतात.

सहस्त्रार्जुनाच्या मृत्यूनंतर त्याचे चार पुत्र जमदग्नींच्या आश्रमावर हल्ला करतात आणि जमदग्नींच्या अंगावर वार करून त्यांना ठार करतात. परशुराम त्या जखमा पाहून संतप्त होतो. रेणुका सती जाण्याचे ठरवते. तेव्हा परशुराम तिला अडवत नाही. महिष्मती नगरीचा विध्वंस करण्यासाठी परशुराम निघतो तेव्हा अत्री ऋषी त्या नगरीवर अग्नी अस्त्र सोडू नये अशी विनंती करतात. परशुराम परशूने सहस्त्रवीर्याच्या पुत्रांना ठार करतो. परशुराम प्रतिज्ञा करतो, ''सर्व विश्व मी ब्राह्मतेजाखाली आणीन. प्रजेवर अन्याय करणाऱ्या सर्व क्षत्रियांचा संहार करीन.''

विश्वामित्र त्याला म्हणतात, ''राम, तूही एक क्षत्रिय आहेस. मीही क्षत्रिय आहे. पृथ्वी क्षत्रियहीन करण्याचा विचार सोडून दे. क्षत्रियांचा नाश करण्याआधी ब्राह्मणांचा विचार कर. राजा प्रजेवर अन्याय अत्याचार करीत असेल तर त्याला जरूर दंड दे.''

अकृतही परशुरामची समजूत काढतो, ''प्रत्येक राजाचा वध... ब्रह्महत्येच्या पापाचा पर्वत आपल्यावर कोसळेल.''

अंग देशाच्या राजाच्या रथाची धूळ परशुरामावर उडते. त्याचा संताप उफाळून येतो. ''राजा, तू माझा अपमान केला आहेस. मृत्यूसाठी तयार हो.''

''क्षमा करा. मी चुकलो. मला अभय द्या.''

''अभय द्यायला मी बाहेर पडलो नाही. प्रत्येक राजाचा वध हे माझे ध्येय आहे.'' असे सांगून परशुराम त्याला कंठस्नान घालतो.

तुंग देशाच्या राजाचा तो बंदोबस्त करतो.

जडद देशाचा राजा वरुणास्त्राचा वापर करतो तेव्हा परशुराम त्याचे मस्तक उडवतो. कुंती प्रदेश, कलिंग, क्षुद्रक, त्रिदत्त, मातृसथामा... अनेक राज्ये तो ताब्यात घेतो. सरस्वती नदीच्या तीरावर गुरुदेव कश्यप भेटीला येतात. ''माझा प्रिय शिष्य राम आता राम राहिला नाही.'' अशी खंत ते व्यक्त करतात.

''पित्याच्या मृत्यूमुळे आणि मातेच्या विरहाने मी हिंसेला प्रवृत्त झालो.'' परशुराम.

''हिंसेतून हिंसेचीच निर्मिती होते हिंसेने काही साध्य होणार नाही. ब्राह्मणांची हिंसा करू नये.'' गुरुवर्य कश्यप.

''अन्यायाचं परिमार्जन क्षमेनं होणार नाही.''

''क्रोध अग्नी आता विझला पाहिजे. माझी तशी आज्ञा आहे.'' असे गुरुवर्य म्हणतात तेव्हा परशुराम आपला परशू भूमीवर ठेवतो. शिवधनुष्य काढून हातात घेतो तेव्हा कश्यप बजावतात, ''तुला शस्त्रत्याग करता येणार नाही. तू क्षत्रिय आहेस. शस्त्र हे रक्षणासाठी असते. ते वापर... विश्वजित यज्ञाची तयारी कर.''

विश्वजित यज्ञ केल्यावर गुरुदक्षिणेच्या वेळी परशुराम म्हणतो, ''मी जे जिंकले आहे ते सर्व- फक्त अंगावरची अस्त्रे आणि वस्त्रे सोडून- मी तुम्हाला अर्पण करतो.''

कश्यप ऋषी त्यावर म्हणतात, ''तू दान दिलेल्या भूमीवर राहण्याचा आता तुला हक्क नाही. या भूमीवर तू संचार करू शकशील, पण स्वामी म्हणून तुला अधिकार नाही.. मात्र तू नवी भूमी तयार करू शकशील.''

आणि सह्याद्रीच्या पश्चिमेकडील सागराला मागे हटवून तेथे नवीन भूमी - अपरान्त भूमी निर्माण करण्याचा मार्ग ते सुचवतात. ''त्या भूमीचे स्वामीत्व तुझ्याकडे राहील. त्या भूमीचा तू उद्धारकर्ता हो... भूमीचे सात भाग कर. ते क्षत्रियांना दे. वैश्यांना स्ती करण्याचे आमंत्रण दे.''

परशुराम त्या आदेशानुसार समुद्राला प्रार्थना करतो, ''तू थोडा मागे सरक. मला थोडी भूमी दे. शिवधनुष्यातून निघालेला बाण जाईल तेथवर मागे हो.''

त्याप्रमाणे सागराला मागे हटवून ब्रह्मवृंदांना परशुराम तेथे वसती करण्याचे आवाहन करतो.

दरम्यान मिथिला नगरीच्या जनक राजाकडे असेच आवाहन करण्यासाठी गेल्यावर परशुराम आपले शिवधनुष्य खाली ठेवतो. सीता ते शिवधनुष्य उचलते. तेव्हा तो चकित होतो. सीता ही एक अपूर्व शक्ती आहे असे म्हणून तो ते शिवधनुष्य सीतेला भेट देतो... स्वयंवराच्या वेळी ह्या धनुष्याला दोरी लावून दाखवणाऱ्या तरुणाला ही कन्या अर्पण कर असेही जनकाला सुचवतो... त्याप्रमाणे सीतेचे स्वयंवर होते. दशरथपुत्र राम हा पण जिंकतो...

अपरान्तीच्या नवनिर्मित भूप्रदेशात पाण्यासाठी परशुराम बाण मारून नदीप्रवाह निर्माण करतो. बाणगंगा हे नाव नदीला मिळते.

सागरकाठी वाळुकेश्वर महादेवाची स्थापना होते.

देवी प्रसन्न होऊन शांतादुर्गा म्हणून तेथे राहते.

ब्रह्मवृंदाची ६६ कुळे तेथे वास्तव्याला येतात.

महालसा-महालक्ष्मी, नागेश, सप्तकोटीश्वर, गोकर्ण... कन्याकुमारी वगैरे देवदेवतांनी आणि तीर्थस्थानांनी या भूमीला पावित्र्य लाभते.

...परशुरामाची ही भूमी धनधान्यसंपन्न होते...

अपरान्त भूमीतील ब्रह्मवृंदांना त्रस्त करणाऱ्या वरुणापूरच्या चंडासुराचा वध परशुराम देवी महालसेच्या हातून घडवून आणतो.

विमलासुराशीही परशुरामाचा संघर्ष होतो. विमलासुर हा देव, दानव, मानव यांच्यापासून अवध्य असतो. भगवान विष्णूकडून त्याला दिव्य शक्ती मिळालेली असते. ती शक्ती परशुरामाच्या परशूत स्थित होते. परशुराम पाशुपतास्त्राचा प्रयोग करतो. विमलासुराच्या छातीवर पाशुपतास्त्र आदळते. वेदनांनी कण्हत तो म्हणतो, ''मला माफ करा. मी केवळ तुमच्या हातून मृत्यू यावा म्हणून युद्ध केले. भगवान

शंकरांनी माझा नि:पात करण्याची तुम्हाला आज्ञा दिली तेव्हाच मी मृत्यू अटळ हे समजून चुकलो. आता फक्त एक करा. माझा मृत्यू होईल त्या जागी शिवलिंग स्थापन करा. त्याला विमलेश्वर नाव द्या.''

जनककन्या सीतेला दिलेले शिवधनुष्य रामाने उचलताना मोडले हे ऐकून तो रामाची भेट घेतो. रामाशी युद्ध करण्याचा त्याचा विचार राम असतो. परंतु, ''आपण ब्राह्मण... आम्हाला पूज्य... आपलं पूजनच आम्ही करणार'' असे सांगून दशरथपुत्र तो विचार मोडीत काढतो. परशुराम आपले वैष्णव धनुष्यही त्याला देऊन टाकतो...

आता धरतीवर करण्यासारखं काहीच कार्य उरले नाही हे जाणून परशुराम महेंद्र पर्वतावर जाण्याचे ठरवतो.

महेंद्र पर्वतावर तपश्चर्या करीत परशुराम उर्वरित काळ व्यतीत करतात.

परशुरामाच्या जीवनातील या घटना, त्यामागचे संघर्ष आणि मूल्यभान आजच्या आधुनिक समस्यांच्या आणि युक्तिवादाच्या संदर्भात कशा प्रकारे सुसंगत, विसंगत ठरतात हा विचारही लेखक सुधाकर शुक्ल यांच्या मनात असावा. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचे कर्तव्य आणि जीवनशैली या बबाबतीत असणारे भिन्नत्व, हिंसा-अहिंसा याबाबत दोन्ही वर्णांची भूमिका, पित्याची आज्ञा आणि गुरूची आज्ञा यात कोणाला प्रमाण मानायचे हा संघर्ष, पित्याच्या आज्ञेने आपल्याच मातेची हत्या करणे हे पापकृत्य करीत कर्तव्य पालन, प्रजेवर आणि ब्रह्मवृंदांवर अन्याय करणाऱ्या क्षत्रिय राजांचा बंदोबस्त करण्यासाठी ब्राह्मतेज असणाऱ्या परशुरामाने पुढाकार घेणे हे योग्य की अयोग्य, विविध अस्त्रांनी युक्त असणाऱ्या सहस्त्रार्जुनासारख्या दुष्टाशी युद्ध करण्यातील सूड भावनेची भावी फलनिष्पत्ती, त्याबाबत जमदग्नींची असणारी संघर्ष टाळण्याची धारणा, क्रोधावर मात करण्यातील अडचणी, युद्ध करताना सूड, क्रोध किंवा अविचार यांचाच पगडा मनावर असण्याची जाणीव, कामधेनूसारख्या बहुगुणी गायीला दान म्हणून मागण्यातील सहस्त्रार्जुनाची आततायी वृत्ती अथवा अनैतिकता; मातेच्या मृत्यूबद्दलच्या अपराध भावनेतून मुक्त होण्याची परशुरामाची तळमळ, शंकराच्या व गुरूंच्या युक्तिवादाने त्या भावनेतून होणारी मुक्ती आणि लाभणारा दिलासा... अनेक वादाचे आणि नैतिकतेचे प्रश्न या कादंबरीत त्या त्या घटनेच्या अनुषंगाने उपस्थित होतात. त्या वेळच्या चर्चांमध्ये दोन्ही बाजू पुढे येतात. निष्कर्ष समाधानकारक निघतातच असे नाही.

सर्वांत चमत्कारिक घटना म्हणजे जमदग्नींनी आपल्या मुलालाच माता रेणुकेची हत्या करण्याचा दिलेला आदेश. हा आदेश देण्यातील त्यांचा युक्तिवाद आजही अनाकलनीयच वाटेल. तसेच रेणुकेची हत्या करण्याएवढा तिचा अपराध तरी काय? सरोवरावर पाणी आणण्यासाठी रेणुका गेली असताना तेथे चित्रगंधर्व आपल्या स्त्रियांसह जलक्रीडा आणि शृंगारचेष्टा करत असल्याचे बघते. चित्रगंधर्वावर तिचे मन जात नाही; परंतु चित्रगंधर्वाच्या ठिकाणी ती आपल्या पतीला बघते... आणि

त्याच्याशी अशा शृंगाराची मनोमन कामना करते. हे जमदग्नींना मन:चक्षूंनी जाणवते. आणि रेणुकेने पाणी आणण्यास उशीर लावला हे कारण पुढे करून ते तिची हत्या करण्यास प्रवृत्त होतात. हा पुरुषी अहंकार... त्याचे आजच्या स्त्रीवादी, समतावादी वातावरणात काय समर्थन करणार? रेणुकेने व्यभिचार केला नाही; फक्त चित्रगंधर्वाची कामक्रीडा बघून त्याच्या जागी पतीची प्रतिमा कल्पनेने जोडून तिने पाहिले. पत्नीच्या मनात असा विचार येणे हा अपराध ठरावा का? जमदग्नी आपली नवरेशाही येथे गाजवतात... पुत्राच्या हातून रेणुकेची हत्या करण्याची कल्पना ही विकृती म्हणायची की पुरुषी वर्चस्वाची व्यूहरचना?... असे अनेक प्रश्न उद्‌भवतात.


परशुरामाने पृथ्वी क्षत्रियहीन करण्याची केलेली प्रतिज्ञा ही देखील अशीच अतिरेकी, आततायी वाटते. तिची अपरिहार्यता तर्कसंगत युक्तिवादाने पटवण्याचा प्रयत्न व्यर्थ ठरतो.

...परशुरामाच्या जीवनातील अनेक घटनांमागचे संदर्भ कालौघात हरवलेले असावेत. तरीही हे व्यक्तिमत्त्व आजही आपल्याला अनेक मूलभूत समस्यांचे भान देणारे आहे.

**किंमत : २००रु. सभासदांना : १४०रु. पोस्टेज : २५रु.**


# अवशेष

**राजा कदम**




**किंमत : १४०रु.**
**पोस्टेज २५रु.**

मानवी बॉंब म्हणून अतिरेकी ठरलेल्या परिसरात जातो, त्या वेळी मृत्यू केव्हा हवाय हे त्याचं त्यानं ठरवायचं नसतं.

या जीवनयात्रेत कोण कोणाच्या अंतिम यात्रेसाठी प्रथम हजर असेल, याची शाश्वती नाही. तरीही जीवनप्रवाह सुरक्षित, आनंददायी चाललेला आहे. परंतु मृत्यूचे सतत भान असल्यावर मनुष्यप्राणी किती शारीरिक, मानसिक संक्रमणातून जाऊ शकतो आणि अस्तित्वहीन जगू शकतो, यावर प्रकाश टाकणारी वाचनीय कादंबरी.


**मेहता पब्लिशिंग हाऊस,**

# पुस्तक परिचय

**आयुष्याला नवा अर्थ आणि आशय**
**देणाऱ्या प्रेरणादायक कथा**

## चिकन सूप फॉर द सोल
## भाग २

**जॅक कॅनफिल्ड / मार्क व्हिक्टर हॅन्सन**
**अनु. प्रज्ञा ओक**



**आ**पल्या जीवनात वेगवेगळ्या घटना घडत असतात, वेगवेगळ्या समस्या निर्माण होत असतात. कधी कधी तर मती कुंठित होते. कोंडीत अडकल्यासारखे वाटते. सगळे दरवाजे बंद आहेत असे वाटते. काय करावे सुचत नाही. कधी एकाकी वाटते, आपले कोणी नाही असे वाटते. कधी आपल्या उपेक्षेची जाणीव त्रस्त करते. कधी आपल्या लहानमोठ्या अपयशांची बोच मनाला पोखरत राहते. धडपडत्या, अडखळत्या पावलांना आधार मिळाला, कौतुकाची थाप योग्य वेळी पाठीवर पडली, दिलासा मिळाला, कोंडी फुटण्यासारखा कोणाकडून काही अनपेक्षित मार्ग वा सल्ला मिळाला तर... मनाला उभारी येते.

हे उभारी देण्याचे काम बोधकथांद्वारे होते. इतरांच्या अनुभवांच्या श्रवणाने होते. स्मितहास्याने, शाबासकीने, गुणगौरवाने, सांत्वनाने, सहानुभूतीने, विश्वासाने, श्रद्धेने होते. जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने बघण्याचा संदेश त्यातून मिळतो. चांगुलपणावरचा विश्वास दृढ होतो. निर्हेतुक मदतीने माणुसकीवरचा विश्वास वाढतो. नातेसंबंधांना नवा अर्थ प्राप्त होतो.

'चिकन सूप फॉर दि सोल' या नावाने १९९२ पासून अमेरिकेत प्रसिद्ध होणारी पुस्तकांची मालिका बेस्टसेलर्सच्या आपला अग्रक्रम टिकवून आहे, त्यात अशा अनुभवांच्याच हकीकतींचे संकलन असते आणि हकिकतीतून, प्रसंगातून अनेक व्यक्तींना निराशेच्या, औदासिन्याच्या गर्तेत खितपत असताना आशेचा नवा दीपस्तंभ दिसल्याचा प्रत्यय आलेला आहे. एकाच्या अनुभूतीचा उपयोग दुसऱ्याला होतो. दिव्याने दिवा उजळतो. छोट्या छोट्या घटना आपल्या आयुष्याला नवा अर्थ, नवी दिशा, नवे बळ देऊ शकतात. आपल्या जवळच्या व्यक्तींनी केलेला उपदेश ऐकताना आपल्या कपाळावर आठ्या उमटतात; परंतु आपल्या अडचणीच्या वेळी अनपेक्षितपणे कोणाचा अनुभव कानावर येतो आणि त्यामुळे आपली घुसमट थांबल्याची प्रचिती येते.

'चिकन सूप'च्या प्रत्येक भागात पन्नास-साठ ते शंभर छोट्या छोट्या अनुभवांचे निरनिराळ्या व्यक्तींनी केलेले शब्दांकन आढळते. काही ढोबळ विषयांच्या अनुरोधाने त्यांचे वर्गीकरण किंवा गट केलेले आढळतात.

आपल्या आयुष्यातील एखादी वेचक, प्रेरक घटना दोन-तीन पृष्ठात लिहून पाठवायची; ती घटना सत्यकथा असायला हवी. वाचकांकडून आलेल्या अशा घटनांपैकी निवडक घटनांना 'चिकन सूप'च्या मालिकेत स्थान मिळते. मोजक्या शब्दांत नेमका आशय व्यक्त व्हावा अशा प्रकारे त्यांचे पुनर्लेखनही आवश्यक तेव्हा केले जाते. दोनतीन मिनिटात कथा वाचून होते पण ती आपल्या जीवनाला वेगळे वळण देऊ शकते अर्थात प्रत्येक वाचकाला प्रत्येक कथा आवडावी, किंवा लागू पडावी अशी अपेक्षा कोणाचीच नसावी. एखादी कथा जरी आपल्यापुढील

समस्येचा उलगडा करणारी सापडली तरी आपल्या आयुष्याला नवा अर्थ देऊ शकते. कोणाला कोणती कथा आवाहन करून जाईल, हे सांगणे कठीण आहे. परंतु तशी एखादी तरी कथा निश्चितच गवसू शकेल असे या मालिकेत सतत भर पडत आहे त्यावरून वाटते.

'चिकन सूप फॉर द सोल'च्या दुसऱ्या भागातील सत्तर कथांचे प्रेम, पालकत्व, मृत्यू, स्वभाव वैशिष्ट्ये, शिकणे-शिकवणे, स्वप्ने, अडचणीवर मात, शहाणपण अशा गटांमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे.

'जीवन म्हणजे प्रेम आहे - मजेत राहा' तसेच साईबाबांचा संदेश 'प्रेम'या गटाच्या आरंभी देण्यात आला आहे. एखादी छोटीशी, क्षुल्लक कृतीही एखाद्या व्यक्तीच्या जीवनात संस्मरणीय ठरू शकते, असे लक्षात आणून देणारी पहिलीच कथा आपल्याला भिडल्याविना राहणार नाही.

**सर्कस** - मुलांना घेऊन सर्कस पाहण्यास गेलेल्या एका जोडप्याला तिकिटासाठी पुरेसे पैसे नसल्याने हिरमुसले व्हावे लागते... ते बघून पाठीमागचा एक गृहस्थ आपल्या जवळची २० डॉलरची नोट जमिनीवर टाकतो आणि त्या जोडप्यातील पुरुषाला सांगतो, ''अहो, तुमच्या खिशातून नोट पडलीय बघा.'' तो पुरुष ती नोट उचलतो. त्याला सत्याची कल्पना असते. पण मुलांची निराशा बघवत नसते. तो ती नोट उचलतो. कृतज्ञतेने मागच्या गृहस्थाकडे पाहतो. ''धन्यवाद सर! माझ्या कुटुंबासाठी हे फार मूल्यवान आहे.'' असे म्हणताना, त्या गृहस्थाच्या गालावर अश्रू ओघळतात. नोट टाकणाऱ्या त्या गृहस्थाला आणि त्याच्या मुलाला सर्कसला जाता येत नाही; परंतु आपण काही न घेता परतलोय असेही वाटत नाही. असे त्या गृहस्थाच्या मुलाला वाटते.

**मला मिठी मारू द्या** - अत्यवस्थ वडिलांना भेटायला खूप काळ दुरावलेला मुलगा जातो. तो म्हणतो, ''डॅडी, तुमच्या आजाराबाबतीत मला खूप दु:ख वाटतेय... आपल्यातला... दुरावा... मी त्याकडे आज जास्त डोळसपणे पाहू शकतोय. माझं खरोखर तुमच्यावर प्रेम आहे... कम ऑन डॅड. मला तुम्हाला मिठी मारू द्या... एकच क्षण मला मिठीत घ्या.'' गलितगात्र वडिलांचे दोन्ही हात जवळ घेऊन तो स्वत:भोवती वेढून घेतो... वडिलांची पकड घट्ट होते. मधल्या काळातला दुरावा दूर होतो. वडील अंत:स्फूर्तीनं म्हणतात, ''आय लव्ह यू.'' एक नवेच तेज त्यांच्या चेहऱ्यावर दिसते.

**सहवेदना** - आपल्या वर्गातल्या एका मुलाला ब्रेनट्युमर झाल्याने केमोथेरपी घ्यावी लागते आणि त्याचे सर्व केस जातात. त्याला वर्गातली मुले अजिबात चिडवत नाहीत... उलट दुसऱ्या दिवशी सर्व मुले गोटा करून शाळेत जातात... ती मुले त्याच्या दु:खात सहभागी होऊन त्याला अमाप दिलासा देतात. त्या

मुलाच्या पालकांना वाटते, ''हल्लीच्या पिढीबद्दल निराश व्हायचे कारण नाही.''

दुसऱ्या अशाच प्रसंगात केमोथेरपीने केस गेलेली मुलगी शाळेत तशीच जाते. कोणीही तिला चिडवत वा टोमणे मारत नाही... स्वत:बद्दल खात्री बाळगली तर लोक आपल्या बाजूने उभे राहतात. आपले आत्मबळ वाढवतात... आत्मसन्मानाची भावना धैर्य देते.

**मी तुमच्यावर प्रेम करतो** - 'मी तुमच्यावर प्रेम करतो' असे तुम्ही ज्या व्यक्तीला कधी सांगितलेले नाही, अशा व्यक्तीकडे जाऊन 'मी तुमच्यावर प्रेम करतो' असे म्हणायचे - असा गृहपाठ एक शिक्षक आपल्या मुलांना देतात. एका मुलाने आपल्या घटस्फोटित वडिलांना फोनवरून विचारले, ''डॅडी, मला तुमच्याशी काहीतरी बोलायचंय... संध्याकाळी मी घरी येऊ?'' संध्याकाळी तो वडिलांच्या घरी जाऊन म्हणतो, ''डॅडी, आज मी तुमच्या घरी एकच गोष्ट सांगायला आलोय. मी तुमच्यावर खूप प्रेम करतो.'' डॅडींच्या चेहऱ्यावरच्या आठ्या क्षणात दूर होतात. डोळ्यांत पाणी येते. ते त्याला जवळ घेऊन म्हणतात, ''राजा, मी सुद्धा तुझ्यावर खूप प्रेम करतो रे... पण हे मी तुला आधी सांगू शकलो नाही. इतकंच.''

तो क्षण त्या मुलाच्या आयुष्यातला सगळ्यात मौल्यवान क्षण असतो. दोनच दिवसांनी वडिलांना हृदयविकाराचा झटका येतो... त्यांचे देहावसान होते. प्रेमाची कबुली त्यांना निश्चितच आनंद देऊन गेली असणार. एखादी गोष्ट मनात आली तर ती लगेच करून टाका.. असा संदेशही ही कथा देते... वाट बघत बसू नका. करायचे ते आत्ताच करा.

...अशा छोट्या छोट्या कथांची ताकद खूप विलक्षण ठरते.

**कुठलेही पान. उघडा वाचू लागा** - 'चिकन सूप' मधील या छोटेखानी कथा एकापाठोपाठ एक अशा सलग वाचण्याची गरज नाही. कुठलेही पान उघडा. वाचू लागा. कथा वाचून झाल्यावर थांबा. त्या कथेबद्दल चिंतन करा. त्या कथेतून काहीतरी संदेश सहजपणेच मिळालेला असेल. कधी भावनात्मक आवाहनाने अंत:करण उचंबळून निघेल, कधी अडीअडचणीतून मार्ग कसा निघू शकेल हे जाणवेल. कधी नातेसंबंधांकडे पाहण्याचा वेगळाच दृष्टिकोन मिळेल. कधी माणसाच्या मोठेपणाचा, भव्यतेचा, औदार्याचा अनोखा आविष्कार होईल आणि आपल्या आत्मप्रतिमेची उंची स्तिमित करील. आहे हा क्षण आपण सार्थकी लावू शकतो.

आयुष्य किती आहे याचा हिशेब करीत बसू नका. सतत आपल्या आवडीचे काम करीत राहा.

**मार्टिन ल्यूथर किंग** - मार्टिन ल्यूथर किंग या अमेरिकेतील कृष्णवर्णीय नेत्याला अवघे ३९ वर्षांचे आयुष्य मिळाले. पण तेवढ्या कालावधीत शांततेचे

नोबेल पारितोषिक मिळवण्याएवढे कर्तृत्व प्रकट झाले. पंधराव्या वर्षी कॉलेज प्रवेश, पदवी संपादन, विवाह व अपत्य प्राप्ती, शेकडो पुरस्कार मिळवण्यासाठी, कृष्णवर्णीय दोन कोटी लोकांनी संघटना करून त्यांना स्वातंत्र्य, हक्क आणि आत्मसन्मान मिळवून देण्यासाठी, इतर गौरवर्णीय अमेरिकन्सच्या मनात समतेचा आणि सहकार्याचा विश्वास निर्माण करण्यासाठी, हजारो लोकांसमोर वेगवेगळ्या शेकडो सभासंमेलनातून संवाद संपर्क साधण्यासाठी, नेतृत्वाच्या प्रस्थापनेसाठी ही एवढी वर्षे पुरेशी आहेत असे दाखवून देणारे टिपणही या पुस्तकात आहे.

काम करायला कुठलेही वय चालते, तसेच कितीही अपयशांचा सामना करावा लागला तरी आयुष्यात कधीतरी यश हमखास मिळते, पदवी असो नसो, कर्तृत्वाला त्यामुळे आडकाठी येत नाही.

**कॅन्सर संशोधनासाठी निधी** - कॅन्सरमध्ये एक पाय गमावल्यावर टेरी फॉक्सने एक पायावर पळण्याचा विक्रम करून कॅन्सर संशोधनासाठी दहा लाख डॉलर्स निधी गोळा करण्याचा संकल्प केला. फुफ्फुसे निकामी झाल्यावर ही मोहिम त्याला थांबवावी लागली. पण तोवर २० कोटी डॉलर्स जमा झाले होते.

**झेरॉक्स** - १९४० साली कोणत्याही पेपरची कॉपी करण्याचे इलेक्ट्रिक यंत्र चेस्टन कार्लससने शोधून काढले. वीस कॉर्पोरेशन्सनी त्याला नकार दिला. हॅलोइड कंपनीने या शोधाचे हक्क विकत घेतले. याच कंपनीने पुढे नाव बदलून झेरॉक्स कॉर्पोरेशन असे नामकरण केले. झेरॉक्सने अब्जावधी डॉलर्स मिळवले...

चव्वेचाळीसाव्या वर्षी अंधत्व आलेल्या मिल्टनने पुढच्या १६ वर्षात पॅरेडाइज लॉस्ट हे महाकाव्य सिद्ध केले.

४६व्या वर्षी बहिरा झालेला संगीतकार बिथोवन पुढे अनेक सोनाटांची रचना करणारा ठरला.

३९ व्या वर्षी पोलिओने अपंग झालेल्या फ्रँकलिन रूझवेल्ट यांनी पुढे चार वेळा राष्ट्राध्यक्षपद भूषविले...

...अशा अनेक प्रेरणादायक, सकारात्मक गोष्टींचा खजिनाच 'चिकन सूप' मध्ये पानापानावर विखुरलेला आहे. आपल्या आत्म्याच्या विकासासाठी हा खजिना वापरायला हवा.

**किंमत : २००रु. सभासदांना : १४०रु. पोस्टेज : २५रु.**

# नम्र आवाहन

'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या परिवारात आपले स्वागत आहे.

नवीन, ताजे, ज्ञान-मनोरंजनपूर्ण, बालसाहित्य, अनुवादित साहित्य, विज्ञान साहित्य विषयक अशा असंख्य पुस्तकांची ओळख करून देण्यासाठी, रसिक वाचकांना आमच्या आकर्षक योजना कळविण्यासाठी, आम्ही उत्सुक आहोत.

आपण फक्त आपला ई–मेल कळवा.

पत्र पाठवा, फोन करा किंवा इंटरनेटवर कळवा.

आम्ही वाट पाहत आहोत.

आमचा Email ॲड्रेस

**info@mehtapublishinghouse.com**


**mehtapublishinghouse@gmail.com**

# पुस्तक परिचय

## डबघाईला आलेल्या साखर कारखान्याला उर्जितावस्था आणणाऱ्या कर्तबगार स्त्रीचे कर्तृत्व

# सम्राज्ञी

**तेजस्विनी जाधव**



**स**म्राज्ञी ही तेजस्विनी जाधव यांची पहिलीच कादंबरी; पण तिच्यात लेखनदृष्ट्या नवखेपणाच्या खुणा क्वचितच आढळतात.

पतीच्या आकस्मिक निधनाने सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदाची जबाबदारी अंगावर आलेल्या राजलक्ष्मी माने या गृहिणीपणाच्या भूमिकेत मग्न असणाऱ्या महिलेला डबघाईला आलेल्या कारखान्याला उर्जितावस्थेत आणण्यासाठी. योग्य ती पावले उचलावी लागतात, कारखान्याशी संबंधित परंतु आपमतलबी संधिसाधू हितशत्रूंचा बंदोबस्त करावा लागतो आणि कारखान्यातील भ्रष्टाचार तसेच अपप्रकार थांबवून कारखाना सुरळीत चालावा या दृष्टीने विविध मार्ग चोखाळावे लागतात.

स्वत: तेजस्विनी जाधव यांना पतिनिधनानंतर अशाच प्रकारे साखर कारखान्याचे चेअरमनपद सांभाळावे लागले होते. त्यामुळे सहकारी कारखान्याच्या एकूण कारभाराची स्पष्ट कल्पना होती. तेव्हा या कादंबरीतील सर्वच तपशील अत्यंत विश्वासार्ह आणि वास्तव उतरावे हे स्वाभाविकच आहे. मात्र ही कादंबरी म्हणजे आत्मकहाणी नाही. नायिका म्हणजे लेखिका नाही हे आरंभीच लक्षात घेतलेले बरे! हॉटेल, एअरपोर्ट यासारख्या हॅराल्ड रॉबिन्सच्या बेस्टसेलर कादंबऱ्यांमध्ये त्या त्या व्यवसायाचे सर्वकष स्वरूप प्रकट व्हावे अशा प्रकारे कथावस्तूची उभारणी केलेली असते; आणि वाचकांना त्या व्यवसायातील आश्चर्यकारक बारकावे जाणून घेताना खूप काही नवे आणि महत्त्वपूर्ण कळल्याचा आनंद मिळतो. तसाच काहीसा प्रत्यय 'सम्राज्ञी' वाचताना येतो.

महाराष्ट्रातील बहुसंख्य सहकारी साखर कारखाने राजकीय पुढाऱ्यांच्या वर्चस्वाखाली आहेत, किंवा आपल्या बऱ्याच पुढाऱ्यांचे पुढारीपण सहकारी संस्थांच्या बळावर टिकून राहिलेले आहे असे म्हणता येईल. हे कारखाने म्हणजे आपले राखीव कुरण असे त्यांना वाटते आणि त्यात कारखान्याच्या उभारणीपासून प्रत्येक टप्प्यावर भरपूर भ्रष्टाचार होत राहतो. कारखान्याचा खर्च वाढत जातो आणि इकडे पुढाऱ्यांच्या घरांनाही राजप्रासादाचे स्वरूप प्राप्त होत जाते. त्यातून साखर सम्राट, सहकार महर्षी, शिक्षण सम्राट... अशी नवी राजघराणी या लोकशाहीत अधिकार गाजवू लागतात... अशा कारखान्यांपैकी बहुसंख्य कारखाने 'आजारी' म्हणून घोषित होतात आणि सरकार त्यांना वाचवण्यासाठी कोट्यवधींची पॅकेजेस् देत राहते. त्या मदतीने कारखाने ठणठणीत होतात असे नाही परंतु पुढाऱ्यांचे वैभव वाढत जाते. हा सर्वसामान्य अनुभव.

'सम्राज्ञी' मधील साखर कारखान्याची स्थापना तीस वर्षांपूर्वी झालेली असली तरी आज मितीला गळीत हंगाम होत नाही, वीज बिलाची बाकी साडेचार कोटींची थकलेली असल्याने वीज कनेक्शन तोडलेले आहे, अशी त्याची दयनीय अवस्था झालेली आहे. यंत्रसामुग्रीच्या देखभालीसाठी दुरुस्तीसाठी तीनचार कोटींचा खर्च होऊनही यंत्रे गंजत पडली आहेत. मागच्या दोनतीन हंगामातील उसाच्या

बेण्याचे आणि उसाचे काही पैसे देणे बाकी आहे, आपल्या क्षेत्रातील ऊस शेजारच्या कारखान्यांकडे वळवणारे संचालक आणि वरिष्ठ अधिकारी येथे आहेत. ऊस वाहतुकीच्या आणि ऊस तोडीच्या नावावर लक्षावधी रुपयांचा ॲडव्हान्स घेऊन नंतर गायब होणारे कंत्राटदार आहेत. कर्मचाऱ्यांचे पगार थकलेले आहेत, ज्यांच्या शेतात ऊसाचे एक कांडही होत नाही त्या शेतकऱ्यांना संचालकांच्या मेहेरबानीने ऊसकर्ज सरसहा मिळते आणि खऱ्या ऊस उत्पादकांना एक पैसाही मिळू नये अशी व्यूहरचना केली जाते.. अशा अंदाधुदीत आजारी म्हणावा असा कारखाना... त्याची धुरा आकस्मिकपणे राजलक्ष्मी माने यांच्यावर येऊन पडते. पती दादासाहेब माने यांनी कारखान्याच्या निवडणुकीत आपले पॅनेल बहुसंख्येने निवडून आणलेले.. आमदारकीही भूषविलेली... एक चांगला कार्यकर्ता आणि नेता अशी प्रतिमा जनमानसात स्थिरावलेली... कार्यकर्त्यांची मोठीच फळी उभी केलेली... स्वभावप्रकृती लोकसंग्रहाची, त्यामुळे कार्यकर्ते म्हणून सर्वांनाच जवळ घेण्याची त्यांची वृत्ती... त्यांच्याच आश्रयाने मोठे झालेले कार्यकर्ते, कारखान्यातले विविध खात्यांचे अधिकारी... आपापली अधिकारपदे आणि महत्त्वाकांक्षा यामुळे अधिकाधिक आपल्या पदरी पडावे या तंत्रात तरबेज झालेले. कारखाना चांगला चालावा ही त्यांची इच्छाच नसते; मात्र आपल्याला चरायला कुरण इतपत त्यांचे अस्तित्व असावे ही त्यांची धारणा.. या असल्या नाठाळ सहकाऱ्यांना आणि विश्वासघातकी कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन कारखान्याचा कारभार योग्य प्रकारे चालावा म्हणून प्रयत्न करण्याचे उत्तरदायित्व राजलक्ष्मी माने यांच्यावर पडते... आधी क्वचितच कारखान्यावर आलेल्या वा राजकारण केलेल्या, पतीच्या अकाली मृत्यूने शोकविव्हळ झालेल्या राजलक्ष्मीबाईंना कारखान्याची पुन्हा नव्याने उभारणी करण्याचे आव्हान स्वीकारावे लागते.

कादंबरीचा आरंभ होतो तो कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर एस. एस. पाठक 'बोर्ड मीटिंग कधी काढायची' हे विचारण्यासाठी चेअरमन बाईसाहेबांची भेट घ्यायला त्यांच्या निवासस्थानी येतात... येथपासून.

पतिनिधनाच्या दु:खात चूर असणाऱ्या बाई स्वत:ला सावरू पाहतात... भ्रमावस्थेत सैरभैर असलेल्या त्यांच्या सांत्वनासाठी आलेली कस्तुराबाई त्यांना भानावर आणते, "बाई, असं रडू नका. शोभत नाही असं रडणं तुम्हाला... साहेब गेले आता. आता तुम्ही बाई नाही राहिला. माणूस झालाय तुम्ही. माणूस. आता माणूस म्हणून जगायला शिका. पुरुष होऊन कारभार करा. बाई म्हणून वागाल तर सगळे तुम्हाला खाऊन टाकतील. इथून पुढं आपण पुरुष आहोत एवढं लक्षात ठेवा."... आणि बाई अंगी बळ आणून बोर्ड मीटिंगची तारीख ठरवतात. अजेंडा ठरवतात. त्याचबरोबर कारखान्यावर आपल्या पी.ए.ला घेऊन जातात.

त्यांची एकुलती एक विवाहित कन्या ऐश्वर्या फोन करून सांगते, "मम्मी, मनातलं दु:ख झाडून टाक... रोज सरळ कारखान्यावर जाणं सुरू कर. खूप कर्तबगारी

दाखव. तू हुशार आहेस. तुझ्या कामात शिस्त आहे. इतके दिवस तुला असं काही करून दाखवता आलं नाही, आता दुर्दैवानं का होईना, तुला काम करण्यासाठी फील्ड मिळालंय. रोज कारखान्यावर जायला लाग. कामात बिझी राहशील.''

'बाईंना साखरकारखान्यातले काय कळते? त्यांना आपण सहज गुंडाळू शकू' अशी भावना बहुतेक कर्मचाऱ्यांची आणि सहकाऱ्यांची असते.

मॅनेजिंग डायरेक्टर पाठक, चीफ इंजिनियर भिडे, शेतकी अधिकारी घडमोडे, चेअरमन होण्याची आकांक्षा बाळगणारा संचालक पंढरीनाथ आडके, कारखान्याला गोत्याला आणू पाहणारे जिल्हा बँकेचे अध्यक्ष नरसिंगराव, डेप्युटी इंजिनियर मस्के, सुपरवायझर कातरे... असे अनेकजण कारखाना बंद पडावा, कारखाना चालू होऊ नये, असे मानणारे असतात. मागचं कर्ज उचललं पण फेड केली नाही म्हणून वरदेश्वर कारखाना डिफॉल्टर आहे. त्याला कर्ज मिळणार नाही, कर्जाची रक्कम आल्यावर बाईंना घेराव घालू... असे मनसुबे ते रंगवत असतात.

गतवर्षी गळीत झालेले नव्हते. कारखाना बंद होता. वीज नव्हती, बॉयलरचे प्रॉब्लेम होते, साडेतीन कोटी देखभालीसाठी खर्च करूनही मशिनरी सुस्थितीत नव्हती... तशात एकही संचालक भरवशाचा नव्हता. हे बाईंच्या लक्षात येते. त्यांना आपल्या मुलीची, ऐश्वर्याची आठवण येते. ''तू मुलगा असतीस तर'' असा विचार मनात येतो. अंत:करण विदीर्ण होते.

*''परंतु बाई आता कुक्कुलं बाळ नव्हत्या. स्त्रीहट्ट म्हणून रुसून बसणाऱ्या सौभाग्यवतीही नव्हत्या. सुरक्षिततेची कवचकुंडलं हिरावून घेतलेल्या त्या स्वयंसिद्धा होत्या. टेकायला कुठेही भिंत नव्हती. आसन घट्ट केल्याशिवाय पर्याय नव्हता.'' (पृष्ठ ६९)* असे लेखिका स्पष्ट करते.

पहिल्याच बोर्ड मीटिंगमध्ये बाईंना आपल्या संचालकांच्या मानसिकतेचा अंदाज येतो. ४० कोटींची साखर आणि उत्पादन खर्च ५७ कोटी... मेन्टेनन्सचा खर्च महाराष्ट्रात सरसरी ३४ रुपये टनामागे तर वरदेश्वरचा २२५ रुपये... शेतकी कमिटीच्या मीटिंगमध्ये बाईंच्याऐवजी संतोष निकमनेच सुपरवायझरशी चर्चा करावी असा प्रस्ताव आडके मांडू पाहतो पण बाई स्वत:च्या हाती चर्चेची सूत्रे घेऊन उपलब्ध उसाची आकडेवारी नेमकी जाणून घेऊ पाहतात... त्याची नोंद करतात. ट्रकवाल्यांना आणि ऊसतोडणी पथकांच्या मुकादमांना ॲडव्हान्स म्हणून आडके-घडमोडे दीडदोन कोटी रुपयांची मागणी करतात.. तेव्हा आदल्या वर्षी ॲडव्हान्स घेऊन ट्रक न आणणाऱ्यांवर कोर्ट कारवाईचा आदेश बाई देतात...

बाई मुंबईला जाऊन वीज बोर्डाच्या उन्मत्त अधिकाऱ्याला वीज पुरवठा करणे भाग पाडतात. त्यांनी त्याला पेचात पकडण्यासाठी केलेला युक्तिवाद ऐकताना त्या अधिकाऱ्याला घाम फुटतो... जिल्हा बँकेच्या उर्मट अहंकारी अध्यक्षाची गुर्मी... कर्जाच्या मार्गात अडसर होऊ शकते; हे लक्षात घेऊन शिखर बँकेत

जाऊन आणि मंत्र्यांना भेटून मार्ग काढतात. कर्जाचा आदेश देणारे पत्र एम.डी. पाठक शिखर बँकेतून बाहेर पडतानाच गायब करतात तेव्हा बाई जलद हालचाल करून ते पुन्हा मिळवतात.

बाई एकेक समस्या सोडवत जातात. त्यामुळे त्यांचे बूड अस्थिर करू पाहणाऱ्यांचा त्या आपल्यापरीने बंदोबस्त करीत राहतात. कारखान्याचा ऊस इतरत्र नेण्याचा प्रयत्न हाणून पाडतात. शेतकऱ्यांना आपलेसे करतात.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी आडके आणि त्याचे कार्यकर्ते एक तर सभासदांनी सभेला येऊ नये म्हणून त्यांना आणण्यासाठी ज्या गाड्या पाठवायच्या त्याच अडवून ठेवतात आणि भाडोत्री गुंड आणून बाईविरुद्ध पत्रके वाटून, सभेत गोंधळ माजवतात... बाई वस्तुस्थिती पत्रकारांना सांगून प्रतिकूल बातम्या थोपवतात. पत्रकातील आरोपांचा खोटेपणा उघडा पाडतात.

बॉयलर प्रदीपन कार्यक्रमाच्या वेळी नरसिंग आपलेच नाव प्रमुख पाहुणा म्हणून स्वीकारण्यास भाग पाडतात. प्रदेशाध्यक्षाचे नावही पत्रिकेवर घालतात.. पण त्याला परस्पर येऊ नका असे सांगून कार्यक्रमाला गालबोट लावू पाहतात. प्रत्यक्ष गळीत हंगामाच्या उद्घाटनाला मात्र बाई नवीन प्रदेशाध्यक्ष विनीता मॅडम आणि निरीक्षक यांना बोलावून आपल्या कर्तृत्वाची झलक दाखवतात. त्यामुळे विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यावर आमदारपदासाठी बाईंनाच उमेदवारी मिळते. ती निवडणूक त्या लाखावर मतांनी जिंकतात. त्यांना गोत्यात आणू पाहणाऱ्या आणि त्यांच्याकडून पैसे उकळू पाहणाऱ्या कार्यकर्त्यांना निवडूक प्रचारापासून चार हात दूरच ठेवण्याची व्यूहरचना करतात.

निवडणुकांना कमाईचे साधन समजणारा धूर्त हिंमतराव त्यांना सांगतो, ''दहा सर्कल आहेत. प्रत्येकी २/२ गाड्या द्या. जि. प., दूध संघाचे अध्यक्ष यांना गाड्या द्या. तुम्ही बंगल्यावरच थांबा. कार्यकर्ते प्रचार करतील. त्यांना बॅनर द्या, पोस्टर द्या. ते तुम्हाला सांभाळून घेतील. प्रचार हे काही तुमचे काम नव्हे. दादासाहेबांची गोष्ट अलग होती. आमची हयात त्यांच्या निवडणुकी उचलून देण्यात गेली.'' बाई फक्त त्याला गाड्या देऊन, त्याला फिरायला लावतात. परंतु गाडी घेऊन स्वत:च गावोगाव जातात. बायाबापड्यांना भेटतात. मतदारांशी संवाद साधतात. ''दादासाहेबांचे आमच्या गावावर फार उपकार आहेत. तीन पाझर तलाव त्यांनी मंजूर करून घेऊन पूर्ण केले... गावचा रस्ता त्यांनीच करून दिला... आमच्या मुलांना कामाला लावले'' यासारखे उद्‌गार बाईंना सर्वत्र ऐकायला मिळतात. निवडणुकांच्या वेळी बाई अत्यंत सावधगिरीने व्यूहरचना करतात.

निवडणुकीच्या दिवशी मतदान केंद्रावर बाईचे कार्यकर्ते डोळ्यात तेल घालून दक्ष असतात.

मतदान पेट्या कचेरीत ठेवताना त्या त्यांचे फोटो काढून घेण्याची सूचना अधिकाऱ्यांना करतात.

मतमोजणीच्या वेळीही सावधगिरी घेतात. त्यामुळे बाईंचा लाखावर मतांनी जय होतो.

त्यांचे नाव मंत्रीपदासाठी घेण्यात येते. नियोजित मुख्यमंत्री त्यांना बोलावून तसे सांगतात. बालकल्याण खाते देऊ करतात. पण बाई म्हणतात, ''माझे कार्यक्षेत्र म्हणजे गाव. माझा कारखाना. मला हे मोठे कार्यक्षेत्र नको. वरदेश्वरातच काम करण्याची माझी इच्छा आहे.''

मुख्यमंत्री स्तिमित होतात. ''मी नेहमी तुमच्या पाठीशी असेन'' असे आश्वासन देतात.

मुलगी ऐश्वर्या आईला म्हणते, ''मम्मी, सीएम साहेब आपण होऊन मंत्रिमंडळात घेत होते. तर तू का म्हणून नाही म्हटलंस? सार्थक झालं असतं जन्माचं.''

बाई त्यावर आपली भूमिका स्पष्ट करतात.

''मला महत्त्वाकांक्षाच नाही... जे दिसेल ते मिळवायला बघायचं. हाताला लागेल ते खिशात घालायचं हे मला बरोबर वाटत नाही. आपलं खरं काम काय ते मला नक्की कळलेलं आहे. लोकांच्या वागण्याचा अर्थच मला कळत नाही. हे लोक कशासाठी असे धावत सुटतात? हाती असलेल्या कामाला पूर्ण न्याय द्यायच्या आधीच ते दुसरं काही मिळवायला बघतात. कुठंच शांती नाही... कोणतंही काम लहान किंवा मोठं नसतं. फक्त ते नीट समजून घेऊन नीट केलं पाहिजे... छोटं कामही प्रभावी झालं तर करणाऱ्याला समाधान वाटतं. आयुष्याला मर्यादा असते. नुसतंच पळत सुटण्यात शेवटी कसलं सार्थक वाटणार?... माझं मन वरदेश्वर तालुक्यातल्या लोकांमध्ये अडकत राहतं. देवानं म्हण किंवा निसर्गानं म्हण, जी काही शक्ती, बुद्धी, कुवत मला दिली आहे ती याच लोकांसाठी मी वापरणार. त्यांचे प्रश्न सोडवण्यात, त्यांना सुखी करण्यात मला यश येऊ दे. माझ्या तालुक्यातल्या माणसांना सुखी करण्यासाठी मी धडपडणार आहे. मग तो कारखाना असो की विधानसभा...''

राजलक्ष्मी माने यांच्या या निर्णयामागे त्यांचा ठाम विचार दिसतो. आपल्याच आत्मशक्तीचा आधार घेत, स्वीकृत लढाईत आत्मबळानं झुंजायचा त्यांचा निर्धार आहे. आपला विजय हा विरक्तीचा असेल, आसक्तीचा नसेल असा त्यांचा विश्वास आहे.

कारखान्याची घडी बसवता बसवता बाई आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रगल्भ, प्रौढ, विकासाचीही शिखरे काबीज करीत होत्या याची या निर्णयातून प्रचीती येते. कादंबरी लेखनाचा पहिलाच प्रयत्न असूनही कथानकाची रचना गतिमान ठेवून विविध पात्रांचे चित्रण ठसठशीतपणे केले आहे.

...त्यामुळे ही कादंबरी वाचकाच्या मनाचा ठाव घेण्यात यशस्वी होते.

**किंमत : २००रु. सभासदांना : १४०रु. पोस्टेज : २५रु.**

## मुलाखत



# व्ही. के. कार्तिका

## हार्पर कॉलिन्स-प्रकाशक आणि मुख्य संपादक

*व्ही. के. कार्तिका यांनी १९९५ साली प्रकाशन क्षेत्रात प्रवेश केला तो पेंग्विन इंडिया या मातबर संस्थेद्वारे. डेव्हिड देवीदार यांच्या तालमीत त्यांचे प्रशिक्षण झाले. शोभा डे आणि दलाई लामा यांच्याबरोबर संपादनाचे काम करताना या कामाचे महत्त्व जाणवले. कार्यकारी संपादक आणि कॉपीराइट विभागाच्या संचालिका वगैरे पदावर पेंग्विनमध्ये एक दशक काढल्यावर हार्पर कॉलिन्समध्ये १ डिसेंबर २००६ पासून कार्यरत. प्रकाशक आणि मुख्य संपादिका या नात्याने भारतातील नवीन लेखकांचा शोध घेण्याबद्दल जागरुक.*

**प्रश्न - मॅडम, प्रकाशनक्षेत्रात प्रवेश करायला काय निमित्त घडले?**

उत्तर - जवाहरलाल नेहरू विद्यापीठात पीएच.डी.साठी प्रबंधाची जुळवाजुळव करीत असताना पेंग्विन इंडियात संपादक नेमण्यात येणार आहेत अशी जाहिरात आली. मी लेखी परीक्षेत उत्तीर्ण झाले. डेव्हिड देवीदार यांनी माझी मुलाखत घेतली. तीनचार दिवसांनी तुमची निवड झालीय असा निरोप आला. संपादकीय सहायक म्हणून मी पेंग्विनमध्ये प्रवेश केला. अकरा वर्षे पेंग्विनमध्ये विविध पदांवर काम केले.

**प्रश्न - डेव्हिड देवीदार यांच्याबरोबर काम करण्याची संधी तुम्हाला दीर्घकाळ लाभली. त्याच्याबरोबर काम करण्याचा अनुभव कसा होता?**

उत्तर - अनबीटेबल. असामान्य. त्यांच्याबरोबर मी आठ वर्षे काम केले. त्यांनी मला नेहमी उत्तेजन दिले आणि मला भक्कम पाठिंबा दिला. बॉस म्हणून ते महान होते. त्यामुळे त्यांच्यावर आणि संस्थेवर सर्व कर्मचारी पूर्ण निष्ठा ठेवत.



व्ही. के. कार्तिका

**प्रश्न - प्रकाशनक्षेत्रातील वाटचाल कशी वाटते?**

उत्तर - वंडरफुल! आश्चर्यकारक! पेंग्विनमध्ये मी प्रवेश केला तेव्हा वर्षाला ४०-५० पुस्तके निघत. आता इंग्लिशमध्ये वर्षाला दोनशे पुस्तके निघतात. शिवाय प्रादेशिक भाषांमध्ये ७०-८० पुस्तके निघतात.

**प्रश्न - तुम्ही पार पाडलेल्या प्रकल्पांपैकी एखादा विशेष प्रकल्प सांगू शकाल का?**

उत्तर - एक का, अनेक प्रकल्प सांगू शकेन. एके दिवशी डेव्हिड देवीदार यांनी मला फ्रँकफर्टला जायला सांगितले. एखाद्याला समुद्रात लोटून द्यायचे हा त्यांचा स्वभावविशेष आहे. ज्याला समुद्रात लोटले आहे त्या व्यक्तीने स्वत:च पोहायला शिकावे ही त्यांची अपेक्षा असते. मी फ्रँकफर्टला गेले. आपण येथे काय करायचे आहे याची काहीच कल्पना मला नव्हती. फ्रँकफर्ट बुक फेअरमध्ये पुस्तकांच्या हक्काचे व्यवहार होतात एवढेच मला ठाऊक होते... परंतु त्या ग्रंथजत्रेत मी अनेक प्रकाशकांना भेटले आणि हक्कांच्या देण्याघेण्याविषयी यशस्वी वाटाघाटी कशा कराव्या हे लक्षात आले... त्यानंतर मला कधीच मागे वळून बघावे लागले नाही.

**प्रश्न - एखाद्या लेखकाचा काही संस्मरणीय सांगण्यासारखा - एक्सायटिंग अनुभव?**

उत्तर - बहुतेक लेखकांचे अनुभव एक्सायटिंग असेच म्हणावे लागतील. परंतु एखादेच नाव घ्यायचे झाले तर मी शोभा डे यांचे नाव घेईन. त्यांची सतत भ्रमंती चालू असते आणि त्यांच्याजवळ चर्चा करण्यासारख्या नवनवीन कल्पनांचे भांडार असते... आणखी एका व्यक्तीबरोबर काम करताना मला अमाप आनंद मिळाला. ती व्यक्ती म्हणजे दलाई लामा. त्यांच्या आत्मचरित्राच्या संपादकांच्या आणि अनुवादकांच्या माध्यमातून... मी काही तशी धार्मिक नाही, परंतु दलाई लामा हे एक महात्मा म्हणून, महामानव म्हणून मला आदरणीय वाटतात आणि त्यांच्या प्रत्येक शब्दात,

प्रत्येक कटाक्षात अपार करुणेचा प्रत्यय येतो.

**प्रश्न - प्रकाशन व्यवसायातील एखादी विशेष लाभदायक बाब -**

उत्तर - दलाई लामा यांच्यासारख्या थोर आणि प्रेरक विभूतींना भेटण्याची, त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळणे - हा प्रकाशन व्यवसायातला मला मिळालेला सर्वांत मोठा बोनस - असे मी मानते.

**प्रश्न - प्रकाशन व्यवसाय हा एक चित्तथरारक, नवनवोन्मेषशाली व्यवसाय आहे, असे तुम्हाला वाटते का?**

उत्तर - निश्चितच! प्रत्येक पुस्तक म्हणजे एक नवे बाळ असते आणि प्रत्येक दिवशी हा नवे काहीतरी अचाट, अलौकिक घेऊन येतो. त्यामुळे हा व्यवसाय चित्तथरारक आणि आव्हानात्मक आहेच.

**प्रश्न - काही अडीअडचणी? समस्या.**

उत्तर - अडीअडचणी, समस्या या सतत आपल्याला दंड थोपटून आव्हान देतच असतात. वेळेशी सारखीच शर्यत चालू असते. परंतु आपल्या मदतीला विश्वासू आणि भरवशाचे सहकारी असतील आणि आपली संस्था प्रगल्भ असेल तर त्या अडीअडचणीतून मार्ग निघू शकतो.

**प्रश्न - प्रकाशनामध्ये वैयक्तिक लक्ष देणे फार आवश्यक असते. त्यामुळे आपल्या खाजगी, वैयक्तिक जीवनावर त्याचे बरेच आक्रमण होणे आपण अटळ असते. या दोघोंचा मेळ कसा साधता?**

उत्तर - प्रकाशन व्यवसाय हा अनेक दृष्टींनी दिवसाचे २४ तास व्यापणारा व्यवसाय आहे. सहा वर्षापूर्वी मला मातृत्व लाभले. मुलाकडे लक्ष देण्यासाठी वेळ काढणे भाग पडले. आता रविवार हा मी मुलासाठी आणि कुटुंबासाठी पूर्णपणे देते. आपल्या जोडीदाराला आपल्या व्यवसायातील ताणतणावांची जाण असेल आणि आपल्या व्यावसायिक आव्हानांमध्ये सहभाग असेल तर व्यावसायिक आणि कौटुंबिक जीवनाचा मेळ घालणे हा केवळ वेळेच्या व्यवस्थापनाचा - टाइम मॅनेजमेंटचा प्रश्न ठरतो.

(**एस. के. घई यांनी घेतलेली मुलाखत.**
**पब्लिशिंग टुडे, डिसेंबर २००६.**)

(सौजन्य : वन टू वन : एस.के.घई इन्स्टिट्युट ऑफ बुक पब्लिशिंग,नवी दिल्ली.)




# अंधार इथला संपत नाही

मागच्या दहा वर्षात राज्यातील काही हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. मानवी समाज निर्मिती नंतरच्या काळातील ही एक अत्यंत भयाण घटना आहे. जगाच्या इतिहासात इतरत्र असे घडलेले नाही. अनादी काळापासून समाजाचा पोशिंदा राहिलेल्या या वर्गावर अशी वेळ का आली ? शेतकऱ्यांना आत्महत्येच्या कड्यापर्यंत कुणी आणले ? 'अंधार इथला संपत नाही ' या कादंबरीत अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मिळणार आहेत. सव्यसाची पत्रकार व साहित्यिक भालचंद्र देशपांडे यांची ही कादंबरी उद्याच्या इतिहासासाठी महत्वाचा दस्तऐवज ठरणार आहे.

र. प्र.

रजत प्रकाशन,
११८, मैथिली टॉवर्स, टिळकनगर, औरंगाबाद
मो.९८५०१४००२५, ९९२१६६१८८९

**पृष्ठसंख्या २०८ मूल्य २२५ रू.**

**सवलतीत १२५ रू.+ टपाल खर्च २५ रू.**




# आठवणी : पाण्याच्या

**प्रमोदिनी वडके-कवळे**

त्या दिवशी सहज गप्पा मारताना सकाळी उठण्याचा विषय निघाला आणि इतके दिवस न जाणवलेली माझ्याच आयुष्यातली एक विलक्षण गोष्ट माझ्या लक्षात आली.

आयुष्यातली कित्येक वर्षे, मला पाण्याच्याच आवाजाची सकाळी उठताना ओलसर सोबत लाभली होती.

सकाळी उठताना प्रत्येकाला वेगवेगळ्या आवाजांची सवय असते. कोंबड्याने बांग दिल्यावर दिवस सुरू होतो हे दृश्य आता फक्त जुन्या चित्रपटातच दिसतं. भूपाळी आणि जात्याची घरघर हे शब्द नव्या पिढीला अर्थासहित समजावून द्यावे लागतील. कुणाची सकाळ दूधवाल्या किंवा पेपरवाल्याने बेल वाजवल्याशिवाय सुरू होत नाही तर घड्याळाचा गजर झाल्याशिवाय एखाद्याचा दिवस उजाडत नाही. काहीजणांच्या बाबतीत वर्षानुवर्षे हे 'वेकअप कॉल्स' तेच आणि तसेच राहतात. माझ्या बाबतीत मात्र वयपरत्वे त्यात बदल होत गेला. शाळेच्या वयात मला सकाळी लौकर उठायला अजिबात आवडायचं नाही. पण लौकर जागं व्हायला मात्र आवडायचं. पहाटेच्या वेळी एकीकडे रेडिओ लावून आईची पाणी भरण्याची लगबग चाललेली असायची. पाणी भरण्याच्या नादात ती मला उठवण्यासाठी फारसा त्रास द्यायची नाही. मग पांघरुणात गुरफटून मंगल प्रभात ऐकत पडून रहायचं पहाटेची थंडी आणि पांघरुणाची ऊब यांच्याशी गुणाकार केला की भक्तिरसातल्या त्या स्वरांचं सुख चौपटदसपट व्हायचं.

होस्टेलवर आल्यानंतर हे सुख कुठचं मिळायला? पण आमच्या

होस्टेलच्या मागे आंब्याची चारपाच मोठाली झाडं होती. त्यावर भारद्वाजसाहेबांचं वास्तव्य असायचं. सकाळचं कॉलेज नसलं, रात्री गप्पा मारत कितीही जागरण झालेलं असलं तरी भारद्वाजाच्या घुमारदार 'हूऽक घूऽक' ने भल्या पहाटेच जाग यायची. त्याच्या जोडीला अर्थातच दुसरा आवाज असायचा बादल्या सरकवण्याचा आणि पाण्याच्या जोरदार धारेचा. सकाळच्या कॉलेजच्या मुली गीझरपाशी आंघोळीचे नंबर लावून उभ्या असायच्या.

मुलं लहान असताना त्यांच्या मूडनुसार किंवा दुखण्यानुसार नेहमीच रात्री जागरण घडायचं आणि सकाळी उठण्याची खात्री नसायची. म्हणून मी रात्री न चुकता बेसिनचा नळ सोडून ठेवायची. सकाळी उशालगताच्या घड्याळाच्या गजराने नाही पण नळाच्या 'फर्रर्रऽऽ फुस्स' आवाजाने हमखास जाग यायची. अर्थात एखाद्या दिवशी कॉर्पोरेशनच्या कृपेने जलधारा बरसायच्याच नाहीत आणि आमच्या घरातला सूर्य उशिरा उगवायचा.

एकूण काय माझ्या सकाळी उठण्याला पाण्याची दृश्यअदृश्य सोबत असायचीच. आणि त्यामुळेच की काय सकाळी उठल्यावर प्रसन्नतेचा ओलावा जाणवायचा.

तेव्हा कामाच्या घाईत ही प्रसन्नता जाणवली नाही. पण आज मात्र प्रकर्षाने आठवते. कारण आता घरात चोवीस तास पाणी असल्यामुळे सकाळी 'पाणी येतच नाही' आणि ते 'जाईल' या धाकाने लौकर उठायचा प्रश्न उद्भवत नाही.

काही काही गोष्टींचं अस्तिमूल्य आपल्याला जाणवत नाही. फार साध्या वाटतात त्या गोष्टी. पण आयुष्यातून हरवल्या की कळतं त्यांचं असणं किती महत्त्वाचं होतं ते

'नळाला पाणी येणं' ही अशीच एक अगदी साधीसामान्य गोष्ट. पण रोजच्या जगण्याला इंधन पुरवणारी. चैतन्य देणारी.. जिवंतपणा जागवणारी. रस्त्यावरच्या चौकातले नळ, चाळीतला पाणवठा किंवा खेड्यातल्या नद्याविहिरी इथलं दृश्य डोळ्यासमोर आणून बघा, म्हणजे माझं म्हणणं पटेल.

पाणी आपल्यासाठी जीवन आहेच पण त्याचं नुसतं अस्तित्वही आयुष्याला किती आर्द्रता देऊन जातं हे वेगळा विचार केल्याशिवाय आपल्या लक्षातच येत नाही कधी.

रोह्याला आम्ही वाड्यात रहायचो. पाण्याची व्यवस्था समाईक. पुष्कळदा नळाला वेळेवर पाणी येणं आणि ते ठराविक काळ टिकणं

ही घटना तशी अनिश्चितच. त्यामुळे चौकातल्या नळावर वेगवेगळ्या घरातल्या हंडाकळशांचं संमेलन भरलेलं असायचं. प्रत्येकीने आळीपाळीने दोनदोन हंडे भरून घ्यायचे असा अलिखित तह वाड्यातल्या बायकांच्यात झालेला होता. त्यात सहसा कुणी अप्रामाणिकपणा करायचं नाही. मात्र पाणी येण्याच्या वेळेत प्रत्येक मध्यमवर्गीय घरातलं दृश्य एकसारखंच असायचं. सैपाकघरातली तांबे-पातेली-वाडगे इत्यादी मंडळी शेल्फवरून जमिनीवर उतरून पावसाळ्यातल्या नदीसारखी दुथडी भरून वहात असायची.

त्यामुळे सकाळच्या म्हणजे पाण्याच्या वेळात सैंपाकघरातला आमचा वावर आईला त्रासदायकच ठरायचा. पाण्याने भरलेली ती भांडी नीट उचलून ठेवेपर्यंत किंवा मोठ्या पिंपात रिकामी करेपर्यंत ती आमच्यावर लक्ष ठेवून असायची. आमच्या दंगामस्तीत एखादं पातेलं कलून पाण्याचे चारदोन थेंब सांडले तरी तिचा जीव वरखाली व्हायचा.

गोरेगावला आजोळी गेल्यानंतरचं दृश्य जरा वेगळं असायचं. तिकडे सकाळी आठसाडेआठच्या सुमारास पाणी यायचं. तोपर्यंत आम्ही मुलं आंघोळीच्या मूडमधे आलेलो असायचो. कारण तिथे आंघोळ करणं हा फार मोठा आनंदसोहळा होता. आजीच्या घराच्या बाहेरच्या बाजूला अडीच फूट उंचीची आणि सहासात फूट लांबीरुंदीची पाण्याची टाकी बांधलेली होती. आजीकडे गाईम्हशी असल्याने असा पाण्याचा साठा नेहमीच ठेवावा लागे. या टाकीला लागूनच टाकीच्या पाण्यात वाकून पाहत उभी असलेली जास्वंदीची दोन मोठाली झाडं. त्यांची लालबुंद फुलं आणि सूर्याचे कोवळे किरण यांचं प्रसन्न प्रतिबिंब टाकीच्या पाण्यावर तरंगत असायचं आणि त्यामुळे टाकीतल्या वाऱ्याने हलणाऱ्या चिमुकल्या लाटांना सोन्यामाणकांची झळाळी लाभायची. नळाला पाणी आलं की आधी या टाकीतलं पाणी गोठ्याकडच्या पन्हाळीत सोडून टाकी रिकामी केली जायची. मग आम्ही सगळी मावसमामेभावंडं अंगावर कमीतकमी कपडे ठेवून किंवा अगदी लहान मुलं दिगंबरावस्थेतही त्या रिकाम्या टाकीत उतरून दाटीवाटीने उभी रहायचो. आजी टाकीला जोडलेला नळ सुरू करायची. हळूहळू पाणी वरवर चढत जायचं आणि त्याची हुळहुळ आमच्या पावलाकमरेला जाणवायची. मग एकमेकांना ढकलणं. खिदळणं,भांडणं,चापट्या ओरबाडणं,बोचकारणं वगैरे प्रेमाचे सगळे अविष्कार पार पडेपर्यंत टाकी भरायची आणि खांद्यापर्यंत पाणी पोचलं की भीती वाटायला लागायची. मनातल्या मनात. तरीही मनातली भीती दाबत शूरपणाचा आव आणून अर्धं आडवं होऊन पोहल्यासारखे हातपाय हलवत आमची मस्ती चालूच असायची.

गोरेगावला संध्याकाळीही पाणी यायचं. संध्याकाळचा पाणी सोहळापण तितकाच आनंददायी असायचा. यावेळी रबरी नळीने सगळ्या फुलझाडांना पाणी घालण्याचं काम आम्ही आवडीने अंगावर घेतलेलं असायचं. अर्थात यात मामेभावंडांची लुडबूड नसायची कारण संध्याकाळच्या पाण्याचं त्यांना फारसं अप्रुप नव्हतं ना ! मग नळीच्या फवाऱ्याने झाडांना आणि स्वत:लाही भिजवत आम्ही संध्याकाळचा ओला सोहळा साजरा करायचो. दिवसभर तापलेल्या मातीचा सुरेख गंध या सोहळ्याला एक वेगळं परिमाण देऊन जायचा. शिवाय पाणी घालण्याची कामगिरी बजावल्याबद्दल आजीने दिलेलं खास बक्षीस असायचंच. घरच्या खव्याची बर्फी.

खूप वर्षांनंतर आजोळी गेले होते तेव्हा घरात खूपच 'काँक्रीट' बदल झालेले जाणवले. टाकीच्या आठवणीने मी अंगणात गेले. टाकी तरी असेल की नाही कोण जाणे ही धाकधूक मनात घेऊन. कारण आजीआजोबांच्यानंतर आता गाईगुरं राहिली नव्हती आणि गोठाही अंतर्धान पावला होता.

मात्र कशी कोण जाणे,पण पाण्याची ती टाकी, आमचा चिमुकला स्विमिंग टँक अजून हयात होता. त्यात पाणीही भरलेलं होतं. पण त्यातलं ते वैभवाचं प्रतिबिंब मात्र अदृश्य झालं होतं. त्याऐवजी तिथे तरंगत होता पालापाचोळा आणि शेवाळं. पाणी तेच. पण त्याचं रूप किती बदललं होतं! माणसाच्या आयुष्यासारखंच! वहातं आहे तोवर चैतन्यदायी प्रवाह. पण एका जागी थबकून साचून राहिलं की मात्र घाणेरडं डबकं□

त्याच्याकडे बघताबघता पाण्याची कितीतरी रूपं डोळ्यासमोरून सरकत गेली. घराच्या अंगणात साचलेलं पाणी. त्यातून एकमेकींना ढकलत जाणाऱ्या कागदी होड्या. त्यात नाचणारे पागोळ्यांचे थेंब.

शाळेच्या मैदानावर साचलेलं पाणी. त्यामुळे कवायतीच्या तासाला वर्गातच बसून खेळलेल्या गाण्याच्या भेंड्या.

पावसाळ्यात घरात कौलातून पाणी गळायचं. मग त्याखाली भांडी ठेवून जमीन कोरडी राखायचा केलेला प्रयत्न. त्यावेळी भांड्यात पडणाऱ्या थेंबांची सुरेल लय.

रोह्याची कुंडलिका. एरवी संध्याकाळी तिच्या कातळावर बसून पाण्यात पाय सोडून मैत्रिणीशी गप्पा मारताना तीही जिवाभावाची मैत्रीणच वाटायची. पण पावसाळ्यात रोंरावत घोंघावत धावायची तेव्हा किती परकी भासायची.

अशाच पावसाळी हवेत मनाच्या रिकाम्या अवस्थेत केलेलं आशा

बर्गे यांच्या 'त्रिदल'चं वाचन. त्यातली शारदाची नर्मदा वाचताना माझ्या डोळ्यासमोर माझी कुंडलिकाच उभी राहिली होती.

नंतर काही वर्षांनी मी नर्मदा प्रत्यक्ष बघितली. कुंडलिकेतला आणि तिच्यातला भौगोलिक सामाजिक आणि आकाराचाही फरक मला कळला. तरीही अजून कोणत्याही नदीचं वर्णन वाचताना माझ्या डोळ्यासमोर कुंडलिकाच येते.

माझ्या मनात असणाऱ्या पाण्याच्या सगळ्या आठवणी आईवडिलांच्या सावलीत घालवलेल्या निर्भर दिवसांच्या आहेत. त्यांना सुरक्षिततेचं कवच आहे. आश्वासकतेचं अस्तर आहे.

म्हणूनच की काय कोण जाणे,पण पुराच्या प्रलयाच्या कितीही बातम्या वाचल्या, छायाचित्रं बघितली तरी माझ्या मनात पाण्याची भीती उमटतच नाही. कारण आजोळच्या टाकीतला अंगाला बिलगून राहिलेला पाण्याचा तो कोमट वत्सल स्पर्श. तो स्पर्श आठवला की वाटतं,हे प्रलय म्हणजे बेसावध माणसांच्या चुका असतात. त्यासाठी पाण्याला कशाला दोष द्यायचा? आपल्या आयुष्याला ओलाव्याचा स्पर्श देणारं ते पाणी मुळात क्षमाशीलच असणार. त्याशिवाय का आपल्या पूर्वजांनी नदीला माय म्हटलंय?

वर्तमानपत्रात धरणाखाली गावं बुडाल्याच्या बातम्या वाचल्या की माझ्या बावळट मनाला वाटतं, पाण्याखाली गेली तरी तिथे ती गावं जशीच्या तशी अस्तित्वात असतील. कृष्णाची द्वारका नाही का पाण्याखाली सुरक्षित राहिली होती, तशीच.

शारदेच्या मनातली नर्मदा, कृष्णाच्या मनातली यमुना,□ प्रत्येकाच्या मनात कोणती न कोणती नदी झुळझुळत असतेच. मांगल्याच्या बाळकृष्णाला पैलतीरी पोचवणारी आणि द्वारकेसारखं सुवर्णस्वप्न पोटात जपून ठेवणारी.. या यमुनेलाही पूर येतच असतो अधूनमधून. पण त्यावरही उपाय आहेच की ! मनाचे दरवाजे उघडून आतला लोंढा बाहेर जाऊ द्यायचा आणि मन मोकळं करायचं. बस्स !

तिचा शांतशीतल प्रवाह पुन्हा तशाच चैतन्याने झुळझुळायला लागतो.

***प्रमोदिनी वडके-कवळे***
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११ ०४८.

# पुरस्कार

## * 'बा' - 'बापू' पुरस्कार

''हिंसा' हे सर्वांत मोठे आव्हान झाले असून, सर्वच क्षेत्रात असहनशीलता वाढत आहे. अहिंसा हे शूर वीरांचे हत्यार आहे. अशा शूरवीरांची संख्या वाढण्याची गरज आहे,'' असे प्रतिपादन अलाहाबादच्या डॉ. संतोष गोइंदी यांनी केले.

येरवडा येथील महात्मा गांधी राष्ट्रीय स्मारकाच्या वतीने ज्येष्ठ गांधीवादी मोहन धारिया याच्या हस्ते डॉ. संतोष गोइंदी यांना 'बा' पुरस्कार, तर शाकाहार व व्यसनमुक्तीचे पुरस्कर्ते डॉ. कल्याण गंगवाल यांना 'बापू' पुरस्कार देण्यात आला. महिला विधायक कार्यकर्ता पुरस्कार वर्ध्याच्या मगन संग्रहालयाच्या प्रमुख डॉ. विभा गुप्ता यांना तर पुरुष विधायक कार्यकर्ता प्रा. शमसुद्दीन तांबोळी यांना देण्यात आला.

या प्रसंगी संस्थेच्या विश्वस्त सचिव व बा-बापू समितीच्या अध्यक्षा शोभना रानडे, कार्याध्यक्ष शांतिलाल सुरतवाला, खजिनदार ताजुद्दीन सोमजी उपस्थित होते.

गोइंदी म्हणाल्या, ''काही समजावून न घेताच गांधी विचार एका बाजूला ठेवले जात आहेत. समाजाला हिंसामुक्त करण्यासाठी आईची भूमिका महत्त्वाची आहे.''

तांबोळी म्हणाले, ''दहशतवादात अडकलेल्या उच्च शिक्षितांमध्ये सर्जनशील, सकारात्मक विचार, सहानुभूती, श्रमप्रतिष्ठा या मूल्यांचा अभाव आहे. अशा देशात गांधी विचाराशिवाय पर्याय नाही.''

## * डॉ. शशिधर यांना 'भटनागर' पुरस्कार

पुण्याच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च'मधील (आयसर) जीवशास्त्राचे प्राध्यापक डॉ. एल.

एस. शशिधर यांना विज्ञान क्षेत्रातील प्रतिष्ठेचा डॉ. शांतिस्वरूप भटनागर पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. 'जिनेटिक्स' आणि 'डेव्हलपमेंटल बायोलॉजी' या क्षेत्रातील त्यांच्या संशोधनाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला आहे.

'आयुका'चे प्रा. रघुनाथन श्रीआनंद यांचीही या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. वैज्ञानिक आणि औद्योगिक विकास परिषदे'तर्फे (सीएसआयआर) ४५ वर्षांपेक्षा कमी वय असणाऱ्या शास्त्रज्ञांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. पाच लाख रुपये आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असून, पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

डॉ. शशिधर यांनी केंब्रिज येथून पीएच.डी. केली असून, गेल्या वर्षापासून ते 'आयसर'मध्ये जीवशास्त्राचे प्राध्यापक आणि समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. डॉ. शशिधर यांनी माश्यांमध्ये जनुकीय बदल घडवून केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण संशोधनाबद्दल त्यांची भटनागर पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

डॉ. शशिधर यांची निवड अभिमानास्पद आहे अशी प्रतिक्रिया 'आयसर'चे संचालक डॉ. के. एन. गणेश यांनी दिली. डॉ. गणेश यांनाही १९९८ मध्ये भटनागर पुरस्कार मिळाला होता.

*** उल्हास पवार यांना महर्षी पुरस्कार**

''राजकारणात मतभिन्नता, मतभेद असू शकतात; परंतु आमदार उल्हास पवार हे अजातशत्रू आहेत,'' असे गौरवोद्‌गार केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी २ ऑक्टोबर रोजी काढले.

पुणे नवरात्र महोत्सवाच्या वतीने यंदाचा 'महर्षी' पुरस्कार कृषिमंत्री पवार यांच्या हस्ते आमदार उल्हास पवार यांना प्रदान करण्यात आला. खासदार सुरेश कलमाडी, श्रीनिवास पाटील, महापौर राजलक्ष्मी भोसले, सौ. अनुराधा पवार, महोत्सवाचे अध्यक्ष नगरसेवक आबा बागूल आणि सौ. जयश्री बागूल आदी या वेळी उपस्थित होते. पुणेरी पगडी, शाल, पुष्पगुच्छ, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. संयुक्त महाराष्ट्रासाठी केलेले आंदोलन, चीनच्या आक्रमणाच्या वेळी कम्युनिस्टांच्या कार्यालयावर केलेला हल्ला, युवक काँग्रेसच्या माध्यमातून महाविद्यालयांमध्ये उभी केलेली युवाशक्ती यांसारख्या पुणे शहरातील आपल्या वास्तव्यातील आठवणींना या वेळी शरद पवार यांनी उजाळा दिला.

ते म्हणाले, ''उल्हास पवार यांच्यासारखे निष्ठावान, सुसंस्कृत आणि सुविद्य सहकारी पाठीशी ताकदीने उभे राहिले. उल्हास पवार यांनी आयुष्यभर महात्मा गांधी, इंदिरा गांधी आणि यशवंतराव चव्हाण यांच्या विचारसरणीनुसार चालण्याचा प्रयत्न केला. पदाची अपेक्षा बाळगली नाही. सहकाऱ्याला पद मिळाले तरी त्यांनी त्यातच आनंद मानला. कायम मित्रत्वाची भावना त्यांनी जपली. राजकारणात अशी भावना

जपणारे आज दुर्मीळ आहेत.''

उल्हास पवार म्हणाले, ''शालेय जीवनापासूनच मोठ्या नेत्यांचा सहवास लाभला. आई-वडील, आजी यांनी दिलेली साथ आणि केलेले संस्कार यातून वाटचाल केली. जीवनात खूप मित्र भेटले.''

या वेळी कलमाडी, पाटील, महापौर भोसले यांचीही भाषणे झाली.

''काम करताना अनेकदा अडचणी येतात, तेव्हा मी शरद पवार यांच्याकडे जातो. त्यांच्याकडे गेले की अडचण लगेच दूर होते. आम्ही एकत्रच काम करीत असतो. थोडे मतभेद आहेत; परंतु हे मतभेद मोठे असल्याचे चित्र पत्रकारच निर्माण करीत असतात, पवार हे आमचे नेते आहेत आणि यापुढही तेच आमचे नेते राहतील,'' असे सुरेश कलमाडी यांनी सांगितले.

### * किरण मेश्राम यांच्या अनुवादित काव्यसंग्रहाला पुरस्कार

किरण मेश्राम यांच्या 'ऐलान' या अनुवादित काव्यसंग्रहाला हिंदी साहित्य अकादमी पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाद्वारे, हिंदी अनुवादासाठी मामा वरेरकर यांच्या नावाने हा पुरस्कार दिला जातो. ३५ हजार रुपये रोख असे त्याचे स्वरूप आहे. प्रसिद्ध कवी लोकनाथ यशवंत यांच्या 'आता होऊन जाऊ द्या' या कवितासंग्रहाचा मेश्राम यांनी 'ऐलान' नावाने अनुवाद केला आहे.

दलित साहित्याला पहिल्यांदाच पुरस्कार मिळाल्याने दलित साहित्याच्या अनुवादाचे प्रमाण वाढेल. एकाच भाषेत बंदिस्त असलेले साहित्य या निमित्ताने देशापुढे येईल, अशी प्रतिक्रिया मेश्राम यांनी व्यक्त केली.

### * ज्योत्स्ना मोहिले यांना राम मराठे पुरस्कार

पुणे भारत गायन समाजातर्फे देण्यात येणारा 'पं. राम मराठे स्मृती पुरस्कार' यंदा प्रसिद्ध गायिका-अभिनेत्री ज्योत्स्ना मोहिले (राव) यांना ज्येष्ठ अभिनेते प्रभाकर पणशीकर यांच्या हस्ते देण्यात आला. या प्रसंगी ज्येष्ठ गायकनट प्रसाद सावरकर तसेच अभिनेत्री वंदना गुप्ते उपस्थित होत्या. शिल्पा पुणतांबेकर आणि स्वरांगी मराठे यांचे गायन, मोहिले यांची प्रकट मुलाखत, मा. कृष्णराव यांचे जुने ध्वनिमुद्रण यांचाही लाभ रसिकांना झाला.

भारत गायन समाजाचे संस्थापक आणि श्रेष्ठ गायक पं. भास्करबुवा बखले यांच्या 'देवगंधर्व' या ललित चरित्राच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन 'टिमवि'चे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते झाले. भास्करबुवांच्या नातसून आणि प्रसिद्ध गायिका शैला दातार यांनी ते लिहिले आहे. 'राजहंस' प्रकाशित या नव्या आवृत्तीत काही नवीन मजकूर, तसेच छायाचित्रांचा समावेश आहे. इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता दहावीच्या पाठ्यपुस्तकात या पुस्तकातील पाठाचा समावेश करण्यात आला आहे.

## * 'नवक्षितिज' संस्था पारितोषिक वितरण समारंभ

''स्पर्धांच्या माध्यमातून ताण येण्याची शक्यता असते. त्यामुळे मनसोक्त व सर्वांगाने आनंद देणारे महोत्सव मुलांसाठी खूप फायदेशील ठरतील,'' असे मत ज्येष्ठ अभिनेत्री दीपा लागू यांनी व्यक्त केले.

मतिमंद मुलांसाठी कार्य करणाऱ्या 'नवक्षितिज' संस्थेतर्फे आयोजित नाट्य महोत्सव स्पर्धेचे पारितोषिक वितरण त्यांच्या हस्ते झाले.

'सकाळ'चे संपादक (साहित्य, कला व संस्कृती) सुरेशचंद्र पाध्ये, अभिनेत्री लालन सारंग, संस्थेच्या प्रमुख नीलिमा देसाई, संस्थेच्या विश्वस्त वसुधा देवेकर आदी या वेळी उपस्थित होत्या. शहरातील दहा शाळा स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या.

पाध्ये म्हणाले, ''वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक पातळीवर स्पर्धा अपरिहार्य असून, त्या टाळता यायला हव्यात. मात्र, त्यामुळे यश मिळविणे शक्य होते. मतिमंद मुलांची एकूण क्षमता जाणून त्यानुसार स्पर्धा घेता येतील. तसा प्रयत्न होणे गरजेचे आहे. या मुलांना जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पालकांची भूमिका कौतुकास्पद आहे.''

प्रकाश पारशी व अमृता सातभाई यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. डॉ. चंद्रशेखर देसाई यांनी संयोजन केले.

## * 'दोन शूर' पुरुषोत्तम करंडकमध्ये सर्वोत्कृष्ट

सर्वोत्कृष्ट एकांकिका, दिग्दर्शन आणि अभिनयाची पारितोषिके पटकावून बीएमसीसीच्या संघाने सादर केलेल्या 'दोन शूर' या एकांकिकेने 'पुरुषोत्तम करंडका'वर आपले नाव कोरले. एम. आय. टी. महाविद्यालयाच्या 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' या एकांकिकेने द्वितीय क्रमांकाचा हरिविनायक करंडक, तर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'अब तो आदत सी है' या एकांकिकेने तृतीय क्रमांकाचा संजीव करंडक मिळवला.

'महाराष्ट्र कलोपासक' आयोजित पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या अंतिम फेरीत नऊ महाविद्यालयांच्या संघांचा सहभाग होता.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिकेचा जयराम हर्डीकर करंडक आयएलएस विधी महाविद्यालयाच्या 'आम्ही तुझी लेकरे' या एकांकिकेने मिळवला. पीआयसीटीच्या 'चिल्ड्रेन ऑफ हेवन'ला सर्वोत्कृष्ट आयोजित संघ म्हणून भालचंद्र पुरस्कार तसेच भगीरथ करंडक जाहीर झाला. सर्वोत्कृष्ट विद्यार्थी लेखक म्हणून शासकीय अभियांत्रिकीच्या गायत्री मुळेला गौरवण्यात आले. बीएमसीसीच्या आलोक राजवाडेला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे, तर ओम भूतकरला सर्वोत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक मिळाले.

अन्य पारितोषिक विजेते पुढीलप्रमाणे - (विद्यार्थी, एकांकिका विभाग, महाविद्यालय या क्रमाने) **वैभव तत्त्ववादी** - अब तो आदत सी है - वाचिक अभिनय - शासकीय

आभियांत्रिकी, **विघ्नेश जोशी** - साक्ष - अभिनय - मॉडर्न महाविद्यालय, **स्नेहल घायाळ** - मृगनक्षत्र - अभिनय - मराठवाडा मित्रमंडळ वाणिज्य महाविद्यालय, **नियाज इक्बाल** - आम्ही तुझी लेकरे - दिग्दर्शन उत्तेजनार्थ - आयएलएस विधी महाविद्यालय, **विराट मडके** - आर्टिफिशियल इन्टेलिजन्स - दिग्दर्शन उत्तेजनार्थ - एमआयटी महाविद्यालय, **संहिता सहस्त्रबुद्धे** - आमची कुठेही शाखा नाही - प्रायोगिक लेखक - कमिन्स अभियांत्रिकी, **अल्पना जोशी** - एक फूल दोन कटिंग - उत्तेजनार्थ दिग्दर्शन - धोंडूमामा साठे होमिओपॅथी महाविद्यालय.

याशिवाय अत्रेयी मैती, गायत्री मुळे, अश्विनी शहा, स्वानंदी टिकेकर, अक्षय टंकसाळे, सौरभ कडेकोडी, अभय महाजन, अभिजित बाचकर, माधव जोगळेकर, पंकज साठे यांना अभिनयासाठी उत्तेजनार्थ पुरस्कार.

परीक्षक म्हणून प्रदीप कबरे, शंभू पाटील आणि गौरी लागू यांनी काम पाहिले.

पुरुषोत्तम करंडक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ त्या वर्षीच्या नाट्यसंमेलनाध्यक्षांच्या हस्ते व्हावा. असा प्रघात आहे. गेल्या ४४ वर्षांत अभिनेते नाना पाटेकर यांचा अपवाद वगळता नाट्यसंमेलनाचे सर्व अध्यक्ष या स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यास आवर्जून उपस्थित राहिले होते. या वर्षीही विद्यमान नाट्यसंमेलनाध्यक्ष रमेश देव यांना स्पर्धेचे आयोजक हेमंत वैद्य यांनी वारंवार स्मरणपत्रे पाठवली होती; परंतु देव यांनी प्रतिसाद दिला नाही असे वैद्य यांनी सांगितले.

रमेश देव म्हणाले, ''मी २८ सप्टेंबरला नागपूरजवळच्या परिसरात 'लगीन करायचंय औंदा' या चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी जाणार आहे. तेथून थेट विमान वा रेल्वे मला उपलब्ध होणार नाही. माझे वय ८३ वर्षांचे आहे. केवळ एका समारंभासाठी या वयात उलटसुलट प्रवास मला झेपणेही अवघड आहे. 'पुरुषोत्तम'ची परंपरा तोडण्याची माझीही इच्छा नव्हती; पण केवळ नाईलाज असल्याने रसिक मला समजून घेतील.''

### * जोशी, बलवल्ली यांना चव्हाण प्रतिष्ठानचे पुरस्कार

''संगीत रंगभूमी मराठी भाषेचा अलंकार असून, ती दीर्घायुषी असायला हवी. त्यातून अनेक मोठे कलाकार निर्माण झाली पाहिजेत,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांनी २८ सप्टेंबर रोजी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या (मुंबई) पुणे विभागातर्फे देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण कोल्हटकर यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ गायक यशवंत जोशी, विभागाचे सचिव अंकुश काकडे या वेळी उपस्थित होते.

स्वरराज छोटा गंधर्व यांच्या स्मृतीनिमित्त प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा 'स्वरराज छोटा गंधर्व पुरस्कार' यंदा ज्येष्ठ नाट्य अभिनेत्री रजनी जोशी यांना प्रदान करण्यात आला. 'नरुभाऊ लिमये पुरस्कार' युवा गायक भरत बलवल्ली यांना, तर 'वसंतराव

देशपांडे पुरस्कार' गोव्यातील 'गोवा कला अकादमी'ला देण्यात आला. अकादमीचा पुरस्कार पांडुरंग फळदेसाई यांनी स्वीकारला.

रतन जोशी म्हणाल्या, ''स्वरराज छोटा गंधर्व यांनी नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्याचे मोठे काम केले आहे. त्यांच्यातील बारकावे जाणून त्यांना वेळोवेळी मार्गदर्शनही केले. त्यांचे ते मार्गदर्शन अनेकांना उपयुक्त ठरले आहे. गंधर्व यांच्या वाट्याला आलेले अनेक अनुभव केवळ त्यांच्यापुरते मर्यादित न ठेवता, ते इतरांपर्यंत पोचविण्याचे कामही त्यांनी केले. या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीमुळे गंधर्व यांचे व्यक्तिमत्त्व सर्वार्थाने प्रेरणादायी ठरले आहे.''

*** उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार**

सृजनशील संपादकाप्रमाणेच प्रकाशकही सृजनशील असेल, तर पुस्तकाची 'निर्मिती' खऱ्या अर्थाने घडते, असे मत ज्येष्ठ प्रकाशक रामदास भटकळ यांनी व्यक्त केले. अलीकडे तांत्रिक प्रगती झाली असली, तरी पुस्तकनिर्मितीत 'स्वत्व' दिसत नाही आणि प्रकाशकाची वेगळी ओळखही पटत नाही अशी टीकाही त्यांनी केली.

'अखिल भारतीय मराठी प्रकाशक' संघातर्फे देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार वितरण समारंभाच्या ते अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध चित्रकार सुभाष अवचट उपस्थित होते. संघाचे अध्यक्ष विश्वास दास्ताने, तसेच संयोजक प्रदीप चंपानेरकर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

भटकळ म्हणाले, ''तंत्र प्रगत झाल्याने सर्व पुस्तकांच्या निर्मितीत सारखेपणा दिसतो. प्रकाशकाचे स्वतंत्र अस्तित्व पुसले गेले आहे. पुस्तकनिर्मिती हे 'टीमवर्क' असले, तरी तंत्रापेक्षा निर्मिती निराळी असते, हे लक्षात ठेवले पाहिजे. पुस्तकाचे मुखपृष्ठ, डिझाईन, मुद्रण, सजावट यांच्याप्रमाणेच मुद्रितशोधनही महत्त्वाचे असते. तंत्र आणि निर्मितीच्या संदर्भात प्रकाशक संघाने आवश्यक ती पावले उचलण्यात पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सुचविले.

अवचट म्हणाले, ''पुस्तकनिर्मितीत किंवा मुखपृष्ठाच्या निर्मितीत संगणकाचा वापर 'साधन' म्हणूनच केला पाहिजे, अन्यथा निर्मितीतला प्राण हरवतो आणि फक्त गिमिक्स उरतात. पुस्तकाचे मुखपृष्ठ तयार करण्याचा, त्या संपूर्ण प्रक्रियेचा जुना काळ मंतरलेला होता. तेव्हा नवे पुस्तक येणे, त्याचे आपण केलेले कव्हर छापून येणे, ही इव्हेंट वाटायची. ऑफसेट पद्धतीने छपाई सुरू झाली आणि प्रथमच वापरलेले रंग छापून आले, तेव्हा झालेला आनंद अवर्णनीय होता. या निमित्ताने अनेक मान्यवर लेखकांशी प्रथम चित्रकार म्हणून आणि नंतर मित्र म्हणून संबंध आले.'' दास्ताने यांनी आभार मानले. चंपानेरकर यांनी प्रास्ताविक केले. नीलिमा बोरवणकर यांनी सूत्रसंचालन केले.

''मी स्वत:ला लेखिका मानत नाही. अनादी शक्तीने लेखनासाठी माध्यम म्हणून माझा वापर केला,'' अशी भावना ज्येष्ठ लेखिका लीला गोळे यांनी व्यक्त केली.

स्नेहल प्रकाशनतर्फे रामकृष्ण मठाचे प्रमुख स्वामी भौमानंद यांच्या हस्ते गोळे यांना अंजली घाटपांडे स्मृती स्नेहांजली पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या वेळी त्यांच्या हस्ते डॉ. वि. रा. करंदीकर लिखित 'ख्रिस्त, बुद्ध आणि श्रीकृष्ण' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

लीला गोळे म्हणाल्या, ''आरशात बाह्यरूप दिसते. मात्र लेखनामुळे मी अंतर्मुख झाले. माझे लेखन वैचारिक नसले तरी समाजप्रिय आहे याची जाणीव मला वाचकांच्या प्रतिसादाने झाली.''

करंदीकर म्हणाले, ''महापुरुषांचा थांग घ्यावा या ओढीतून नव्या पुस्तकाचे लेखन झाले आहे.''

स्वामी माधवानंद म्हणाले, ''तीन धर्मांचा तौलनिक अभ्यास असे करंदीकर यांच्या पुस्तकाचे स्वरूप नाही, तर तीन व्यक्तिमत्त्वांचा आनंददायी परिचय असे आहे. ख्रिस्त, बुद्ध आणि कृष्ण यांचे जीवन कादंबरीसारखे आपल्यासमोर येते.''

### * सलोखा पुरस्कार वितरण

''समाजात फूट पाडणे हा दहशतवादी कारवायांमागील डाव आहे. या कारवायांमुळे अल्पसंख्याकांच्या मनात अपराध भावना, न्यूनगंड, असुरक्षितता आणि बहुसंख्याकांमध्ये संशय व असहिष्णुता वाढत आहे. त्यामुळेच अल्पसंख्य व बहुसंख्य समाजातील सुसंवाद वाढण्याची गरज आहे,'' असे मत 'हिंदी है हम हिंदोस्ता' परिषदेचे निमंत्रण नितीन पवार यांनी व्यक्त केले.

'शाहीन फ्रेंड सर्कल' तर्फे 'ईद ए मिलन' तसेच सामाजिक सलोखा पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी शिक्षणतज्ज्ञ प्रा. एच. एम. शेख होते. राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष नसीम सिद्दिकी, आमदार बाळासाहेब शिवरकर, आमदार एम. एम. शेख, शाहीनचे संस्थापक हाजी नदाफ, अध्यक्ष यासीन शेख, नगरसेवक चाँदबी नदाफ, लक्ष्मण आरडे उपस्थित होते.

भारतीय दलित पँथरचे अध्यक्ष बापू भोसले, तसेच कष्टकरी चळवळीतील कार्यकर्ते बाबा कांबळे यांनी 'सामाजिक सलोखा पुरस्कार', तसेच बाळू जोशी, हसन याकूब नदाफ, मुस्तफा अल्लाउद्दीन जमादार यांना 'मीर ए-नूर' हा पुरस्कार देण्यात आला. या प्रसंगी बोलताना सिद्दिकी म्हणाले, ''आपल्या बहुसांस्कृतिक देशात कोणत्याही एकाच धर्माचा आग्रह सामाजिक असामंजस्य निर्माण करतो, यावर मात करण्यासाठी 'ईद ए मिलन'सारखे परस्परसंपर्काचे कार्यक्रम होणे गरजेचे आहे.''

*** डॉ. श्रीकांत नरुले यांना अगरवाल पुस्तक पुरस्कार**

लोकगीतकार दादा कोंडके हा समीक्षात्मक प्रबंध डॉ. नरुले यांनी लिहिला असून रा. वा. प्रकाशन, कोल्हापूर तर्फे प्रकाशित झाला आहे. या ग्रंथास राधानगरी साहित्य संस्कृती मंच यांच्यातर्फे उल्लेखनीय ग्रंथ पुरस्कार लाभलेला आहे. ज्ञानमाऊली सार्वजनिक वाचनालयातर्फे दिला जाणारा - प्रयाग साहित्य पुरस्कार, अंकुर वाङ्मय पुरस्कार २००७, जेष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे सार्वजनिक ग्रंथालय ग्रंथ पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत.



दादा कोंडके यांनी डॉ. नरुले यांना प्रबंध लिहिण्यास प्रवृत्त केले होते. गदिमांच्या चित्रपटगीतांवर त्यांनी डॉक्टरेट मिळवली होती.

*** कोकजे यांना पुंडलिक पुरस्कार**

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे विद्याधर पुंडलिक स्मृती पुरस्कारासाठी प्रा. वसंत कोकजे यांच्या 'माणूस नावाची झाडे' या व्यक्तिचित्रणसंग्रहाची निवड झाली.

एक हजार रुपये आणि सन्मानपत्रे, असे पुरस्काराचे स्वरूप आहे.


**www.mehtapublishinghouse.com**

**प्रत्येक पुस्तकाची सविस्तर माहिती असलेली संपूर्णपणे मराठी असलेली वैशिष्ट्यपूर्ण वेबसाईट.**

कॅलिफोर्निया, व्हर्जिनिया, न्यू जर्सी, वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, व्हिस्कोसिन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंग्डम, हाँगकाँग, सिंगापूर, तैवान, युनायटेड अरब अमिराती, जर्मनी , चीन, कोरिया, स्वीडन, फ्रान्स, कुवेत, नेदरलॅण्डस, जपान, इस्त्रायल, आयरलॅण्ड इत्यादी जगातील विविध भागांबरोबरच भारतात व महाराष्ट्रात ही साईट लोकप्रिय ठरली आहे.

**आजच भेट द्या. व आपली मागणी नोंदवा.**

# वाचकांचा प्रतिसाद

श्री. मेहता,

अर्चना वर्टीकर यांची 'जळात सोडलेले दिवे' ही कादंबरी वाचली. त्यांच्या याआधीच्या कथासंग्रह व कादंबऱ्यांसारखीच छान वाटली. नाव खूपच समर्पक आहे. मुखपृष्ठ सुंदर आहे. त्यासाठी पण दाद द्यायलाच पाहिजे. शांत दिवे पाण्यात सोडल्यानंतर पाण्याच्या प्रवाहाबरोबर जातात. वृद्धांचेही आयुष्य तसेच वाटते. कादंबरी लिहिताना खूप परिश्रम घेतल्याचे जाणवते. वृद्धांच्या मनाच्या कोपऱ्यात डोकावून लिहिल्याचे समजून येते. भाषा पण ओघवती आहे. एकदा पुस्तक हातात घेतले की, खाली ठेवावेसे वाटत नाही.

अर्चना वर्टीकर यांनी अशाच उत्कृष्ट कादंबऱ्या द्याव्यात अशी सदिच्छा

स्मिता नाईक

टिळकवाडी, बेळगाव मो.०९२४१०८२१८८

**स.न.वि.वि.**

आपण प्रकाशित केलेली 'द टेस्टामेंट' ही कादंबरी वाचली. आपण खूप चांगल्या प्रकारे ही कादंबरी लिहून वाचकांना जणू मेजवानीच दिली आहे. या जगात पेंटॅनलसारखा भाग असू शकतो आणि या भागाचे शब्दचित्र इतक्या प्रभावीपणे आपण मांडू शकता यावर विश्वासच बसत नाही. मी जॉन ग्रिशॅम यांच्या 'दि पेलिकन ब्रीफ', 'द क्लायंट' या कादंबऱ्या वाचल्या आहेत. त्यादेखील मला आवडल्या होत्या.

द टेस्टामेंट ही कादंबरी आपण वाचकांना जगाची एक अद्भूत सफर घडवून आणते. स्वप्नवत वाटणारा निसर्ग, बोटीवरचा प्रवास, नि:शब्द वातावरण, वादळ, मुसळधार

पाऊस, विमान प्रवास, अपघात हे सर्वकाही वाचक घरबसल्या अनुभवतो. इतक्या उत्कृष्टपणे अनुवाद केला आहे की, रॅचेल लेन हिचे निधन वाचकाला धक्का देऊन जाते. मला हे पुस्तक खूपच आवडले. आपणास शुभेच्छा!

विनोद भालेराव
ठाणगे कॉलनी,कल्याण रोड,
अहमदनगर ४१४ ००१.

## आकाशवाणी वरील कार्यक्रम

पुणे आकाशवाणी केंद्रावरून आपल्या प्रकाशन संस्थेच्या पुस्तकांचा घेतला जाणारा परामर्श वाचकांना आकर्षित करणारा आहे. नव्या पुस्तकांविषयी वाचकांच्या मनामध्ये अपार कुतूहल असते. पण पुष्कळांना पुस्तकांपर्यंत पोहोचणे अवघड ठरते. स्थळ-काळ-वेळ अशा अनेक समस्या आजच्या वाचकांसमोर उभ्या राहतात. त्यामुळे मनात असूनही नव्या पुस्तकांच्या आस्वादापासून ते वंचित राहतात. पुस्तकांबद्दलचे हे कुतूहल शमविण्यासाठी आपला आकाशवाणीवरचा उपक्रम उपयुक्त आहे.

दर सोमवारी सादर होणारा हा कार्यक्रम मी लक्ष देऊन ऐकतो. चिकन सूप या अनुवादित पुस्तकाबद्दल ऐकताना हे पुस्तक अनेक भागात प्रकाशित होऊनही इतके लोकप्रिय का ते कोडे उकलले.

सुधा गोखले लिखित 'मोहतरम्मा ते अम्मा' हे पुस्तक काश्मिरी जनतेच्या व्यथा-वेदनांचे आणि परिवर्तनाचे चित्रण करणारे आहे.

'सम्राज्ञी' आणि 'संतसूर्य तुकाराम' या पुस्तकांनी लक्ष वेधून घेतले. तेजस्विनी जाधव यांच्या नव्या 'सम्राज्ञी' या कादंबरीत साखर कारखानदारीच्या व्यवसायातले राजकारण, निवडणूका, मतदार यांचा तिढा पुढे येतो. राजलक्ष्मी माने ही साखर कारखान्याची स्त्री संचालिका वाचकांना गुंतवून ठेवणार असा विश्वास वाटतो.

परंपरा नी गतानुगतिकता यांच्या पलीकडे जाणारी संतश्रेष्ठ 'संतसूर्य तुकाराम' ही यादव यांची कलाकृती दृष्टांत, साक्षात्कारापेक्षा मानसशास्त्रीय नी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून स्वत:चे वेगळेपण सिद्ध करणारी आहे एवढे वाचकांना कळले हे या कार्यक्रमाचे फलित !


आपल्या आवडीनिवडी नुसार विविध विषयांवरची पुस्तके विकत घेऊन वाचायला उद्युक्त करणारा हा उपक्रम आहे. प्रत्येक पुस्तकातला निवडक मजकूर ऐकताना वाचकांची उत्सुकता नी कुतूहल जागे होते.

सदानंद गोखले

**नवे कोरे**

# आसूड

## अशोक कोळी




९०रु. पोस्टेज २५रु.

एकविसाव्या शतकातील पहिल्या दशकाच्या मराठी ग्रामीण कथेतील 'शेती' आणि 'बळीराजा' यांच्या प्रश्नांकडे पाहण्याची वेगळी दृष्टी असलेल्या अशोक कोळी यांचा हा कथासंग्रह.

यातील कथा शेतीच्या प्रश्नांची उकल करताना संघर्षाला आंदोलनाचे नवे परिमाण देतात. शोषणव्यवस्थेवर 'आसूड' फटकारतात.

आजच्या खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या छायेतून आलेल्या शोषणाच्या नवनव्या रूपांना छेद देत कथाकाराची लेखणी सामाजिक वास्तवाचा जळजळीत आविष्कार करते आणि व्यवस्थेचा बळी ठरलेल्या कष्टकरी माणसाला अंतर्बाह्य हलवून सोडते. शेतकऱ्याच्या दुबळ्या मनोवृत्तीला आत्मशोधातून संघर्षाचे आत्मभान देण्याचे सामर्थ्य या लेखणीत आहे. शेतकऱ्याला स्वत:चे प्रश्न स्वत: सोडविता आले पाहिजेत, याची ओढ या कथाकाराला आहे.

या कथांची शीर्षके, व्यक्तिरेखा, त्यांचा नैसर्गिक रांगडेपणा,

अंतरंगाची प्रांजळता हे सर्व विविध वृत्ती-प्रवृत्तींनी प्रकट होणारे आहे.

जीवनानुभूतीतून ते मुद्दाम जसेच्या तसे ठसकेबाजपणे टिपलेले आहे. कथेला वास्तव रूप देण्याची हातोटी, बोलीतील रांगडे संवाद, शब्द व त्याचे अर्थवैभव, मातीशी नातं सांगणारी भाषाशैली!

हा सारा आविष्कार लेखकाच्या स्वतंत्र प्रतिभेची साक्ष देणारा आहे.

-डॉ. किसन पाटील

# श्रद्धांजली

## * गाडगीळ : नवसाहित्याचे झुंजार प्रवर्तक

मराठी नवकथेचे प्रवर्तक म्हणून गंगाधर गाडगीळ यांची ख्याती महाविद्यालयीन अध्ययन करताना मनावर उमटली आणि फडके-खांडेकर-सानेगुरुजी यांचा जमाना मागे पडला आहे; मर्ढेकरांच्या काही कविता आणि पाणी, रात्रीचा दिवस वगैरे कादंबऱ्या आणि वाङ्मयीन महात्मता वगैरे पुस्तकांनी वाङ्मयाच्या तसेच समीक्षेच्या नव्या जाणिवांचे आणि त्यांना साजेशा नव्या अभिव्यक्तीचे युग सुरू केले आहे हे जाणवले. त्या नव्या युगाचे आघाडीवरचे शिलेदार म्हणून गंगाधर गाडगीळ यांचा पहिला मान, त्यांच्या जोडीने कवी शरच्चंद्र मुक्तिबोध, य. द. भावे आणि कथाकार अरविंद गोखले, पु. भा. भावे आणि व्यंकटेश माडगूळकर यांची फौज असे त्यावेळी लक्षात आले. कथेतून गाठ, निरगाठ, उकल शैलीतील कथानकाचे आणि आकृतिबंधाचे स्थान ढळले; यमकवृत्तांचा धाक सरला, लय-प्रतिमा-प्रतीके-संज्ञाप्रवाह-मनोविश्लेषण, नवी भाषा, नवे शब्दप्रयोग, नवी क्रियापदे हे सर्व वाङ्मयीन चाकोरीबाहेर नेणारे, आकृतिबंधाचे नवनवे घाट शोधणारे वातावरण नव्या पिढीतल्या तरुणांना आकृष्ट करू लागले.

गंगाधर गाडगीळ हे अर्थशास्त्राचे प्राध्यापक. ते चाणाक्ष, चतुर, व्यवहारी. १९४१ साली प्रिया आणि मांजर ही त्यांची पहिली कथा प्रसिद्ध झाली. १९४६ साली मानसचित्रे हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. १९४८ साली कडू आणि गोड या कथेला अभिरुचीच्या कथास्पर्धेत प्रथम पुरस्कार लाभला. लगेच त्याच नावाचा कथासंग्रह प्रसिद्ध करण्याचा झपाटा त्यांनी दाखवला. त्यानंतर नव्या वाटा, भिरभिरे, संसार, उद्ध्वस्त विश्व, खरं सांगायचं म्हणजे,

तलावातले चांदणे हे संग्रह तीनचार वर्षात भराभर येत गेले. त्याचवेळी नवकथेला स्वतंत्र आयडेंटिटी व स्थान प्राप्त व्हावे म्हणून काहीतरी करायला हवे अशी निकड जाणवू लागली. नवसाहित्याकडे पाहण्याची प्रतिष्ठित वृत्तपत्रांची, समीक्षकांची आणि विद्यापीठांची दृष्टी ही प्रतिकूल, नकारात्मक होती. त्यावेळचे मान्यवर समीक्षक व प्राध्यापक नवकथा-नवकाव्य हे दुर्बोध, बिंदुस्रावी, क्षणवादी, मनोविश्लेषण, संज्ञाप्रवाह, पावित्र्य, विडंबन, क्लिष्टता, यंत्रयुगीन प्रतिमा, रूढ आकृतिबंध आणि यमक-वृत्त-छंद यांचा अव्हेर म्हणून अ-वाङ्मयीन असे कडाडून हल्ले चढवून, त्यांना तुच्छ, हीन लेखत होते. त्यांची टवाळी करत होते. महायुद्धाने एकूणच समाजाच्या मानसिकतेत, संवेदनपद्धतीत बदल घडवून आणला होता. सुशिक्षित स्त्रियांना नोकऱ्या मिळू लागल्या, त्या घराबाहेर जास्त वेळ राहू लागल्या, त्यामुळे रूढ गृहव्यवस्थेत बदल घडू लागला, त्याबद्दल जुन्या पिढीतल्या लोकांना नाराजी वाटत होती. नीतिमत्तेची होणारी पायमल्ली, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे मोकळेढाकळे वर्तन चितारणाऱ्या कथा-कवितांवरही त्यामुळे जुन्या पिढीचा राग होता...

आपल्या कथांचे वेगळेपण सर्वसामान्य वाचकांच्या मनावर बिंबवण्यासाठी काहीतरी करायला हवे, काही मासिके आपल्या हाती हवी, आपल्या साहित्याचे नव्या दृष्टिकोनातून, नव्या समीक्षेच्या निकषांद्वारे आकलन, आस्वादन आणि मूल्यमापन व्हायला हवे याची गरज त्या वेळच्या नव्या जाणिवांच्या कथाकारांना, कवींना वाटू लागली.

गंगाधर गाडगीळ यांनी सत्यकथेच्या भागवतांशी यादृष्टीने मैत्र जुळवले. सत्यकथा हे नव्या जाणिवांचे, नव्या अभिव्यक्तीचे स्वागत करू लागले. नव्या कथा-कवितांना उत्तेजन देऊ लागले. या नव्या कथांचे, कवितांचे समीक्षेतील नव्या संकल्पनांच्या आधारे विश्लेषण, मूल्यमापन करू लागले. तसे लेख प्रसिद्ध करू लागले. नवसाहित्याला एका चळवळीचे रूप देण्याचा हा प्रयत्न होता.

त्याचबरोबर गाडगीळांनी आणखी एक व्यूहरचना केली. समकालीन लेखकांपैकी त्यांना विशेष महत्त्वपूर्ण वाटलेल्या पण भिन्नभिन्न प्रकृतीच्या आणि जीवनदृष्टीत वेगळेपण असणाऱ्या तीन लेखकांचा आपल्या बरोबरीने 'नवकथाकार' म्हणून उल्लेख सुरू केला. फाळणीच्या पार्श्वभूमीवरच्या जळजळीत वास्तवाच्या कथा लिहिणारे, हिंदुत्ववादी पु.भा. भावे, माणदेशच्या माणसांविषयी ग्रामीण शैलीत परंतु अलिप्त वृत्तीने, कळवळ्याचा गहिवर फार न माजवता नेटकेपणाने लिहिणारे व्यंकटेश माडगूळकर आणि मध्यमवर्गीय स्त्री-पुरुषांच्या बदलत्या मानसिकतेवर आणि समस्यांवर प्रभावी व्यक्तिरेखांच्याद्वारे प्रकाश टाकणारे पुण्याचे अरविंद गोखले या तिघांबरोबर मुंबई महानगरीच्या, महायुद्धोत्तर बदलत्या कॉस्मॉपॉलिटन जीवनातील मूल्यहीनतेचे विविध अनुभव रंगवणारे स्वत: गाडगीळ अशा चौकुटाचा उल्लेख नवकथाकार म्हणून सातत्याने करण्यास त्यांनी आरंभ केला. आपल्या नागपाड्यातील

निवासस्थानी या तिघांबरोबर श्री. पु. भागवत, ग. रा. कामत, वसंत बापट, विंदा करंदीकर, पाडगावकर वगैरे मित्रांच्या मैफली ते आयोजित करू लागले. त्याबरोबर सभासंमेलनात भाषणे देऊ लागले. समीक्षात्मक लेखनही करू लागले. 'खडक आणि पाणी' या संग्रहात (१९६२) या काळातील गाडगीळांचे समीक्षालेखन एकत्रित आलेले आहे. नवकथाकार म्हणून खरे तर त्यावेळी इतरही काही कथाकारांचा निर्देश करता आला असता. उदा. दि. बा. मोकाशी, अं. शं. अग्निहोत्री (माणूस), सदानंद रेगे. परंतु गाडगीळांनी बहुत धोरणीपणाने विदर्भातील भावे, माणदेशातील माडगूळकर, पुण्याचे अरविंद गोखले आणि मुंबई महानगरीचे गाडगीळ अशा आटोपशीर चौकूटावरच नवकथाकारांचे नेतृत्व निर्भर ठेवले. या समूह-आयडेंटिटीचा फायदा निश्चित झाला, त्याचाच आदर्श पुढे ठेवून नवकवींच्या पुढच्या पिढीने म्हणजे वसंत बापट, विंदा करंदीकर आणि मंगेश पाडगावकर या तिघांनी काव्यदर्शनाचे एकत्र कार्यक्रम सुरू केले. शंकर पाटील, द. मा. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर यांनी संयुक्तपणे कथाकथनाचे कार्यक्रम सुरू केले. व. पु. काळे हे मात्र एकट्यानेच कथाकथन करणे पसंत करीत. भावे-गाडगीळ-गोखले कथाकथनाच्या वाटेला फारसे गेले नाहीत. परंतु नवसाहित्याच्या समर्थनासाठी ते वेळोवेळी वाद लढवायला तयार होते.

गंगाधर गाडगीळ यांनी आपल्या कथांमध्ये खूप प्रयोग केले. बंडू-स्नेहलता याच्या जोडगोळीवर आधारलेल्या विनोदी कथांचे दालन उघडले. लिलीचे फूल ही कादंबरी (१९५५) गुंतागुंतीच्या कामभावनेचे फ्राइडप्रणीत एक आकलन पेश करणारी होती. परंतु त्यावेळी तिचे वाचकांकडून तेवढेसे स्वागत झाले नाही. गोपुरांच्या प्रदेशात (१९५२) हे प्रवासवर्णनही वेगळ्या शैलीत त्यावेळी लिहिले.

पुढे कथा विषयांचे तेचतेचपण जाणवू लागल्याने की काय, गाडगीळांनी चरित्रात्मक कादंबरी हाताळण्याचे ठरवले. लोकमान्य टिळकांच्या जीवनावर खूप तपशील गोळा करून 'दुर्दम्य'चे लेखन सुरू केले. तपशील भरपूर मिळाल्याने ही कादंबरी दोन खंडात प्रसिद्ध झाली. (१९७०-७१). टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे आधुनिक दृष्टिकोनातून व मानसशास्त्रीय भूमिकेतून आकलन करण्याचा हा प्रयत्न नेतृत्वातील अनेक संघर्ष टिपणारा होता. टिळक हे धर्मनिष्ठ आणि परंपरानिष्ठ, परंतु त्यांनी राजकीय दूरदर्शीपणा दाखवून लोकशाही आणि राष्ट्रवाद यांचा आग्रह धरला. सामाजिक-राजकीय चळवळींचा त्यांनी आरंभ केला. सर्वसामान्य लोकांमध्ये राजकीय जागृतीसाठी केसरी-मराठा वृत्तपत्रे सुरू केली. तेल्यातांबोळ्यांचे पुढारी म्हणून त्यांची प्रतिमा जनमानसात प्रतिष्ठित झाली... टिळकांचे द्रष्टेपण, आगरकर प्रभृतींशी मतभेद, काँग्रेसवर प्रभुत्व, लाल-बाल-पालच्या रूपात भारतभर मान्य झालेले नेतृत्व- या सर्वांचे प्रतिबिंब 'दुर्दम्य'मध्ये उमटले आहे. कादंबरीपेक्षा हा प्रकार 'चरित्र' म्हणूनच अधिक प्रभाव टाकणारा ठरला. पुढे जगन्नाथ शंकरशेट, बालगंधर्व, यांच्या जीवनावर आधारित 'प्रारंभ' आणि 'गंधर्वयुग' याही कादंबऱ्या अशाच कालचित्रासारख्या

उतरल्या आहेत. तत्कालीन महत्त्वाच्या घडामोडींचा आणि सामाजिक परिस्थितीचा त्यात आडवा छेद घेतलेला आहे.

आपले प्राध्यापक - प्राचार्य म्हणून स्थिर कमाईचे साधन व्यवस्थित ठेवून गाडगीळांनी लेखन आणि आर्थिक सल्लागार म्हणूनही काम चालू ठेवले. कम्युनिझमला विरोध, भांडवलशाहीचा पुरस्कार हा त्यांचा आर्थिक भूमिकेचा कणा होता.

एक लेखक म्हणून वाङ्मयीन क्षेत्रात त्यांनी व्यावसायिकता सांभाळली. मासिकांतून दहाबारा कथा आल्या की त्यांचा संग्रह प्रसिद्ध व्हावा असा कटाक्ष बाळगला. आपल्या कथांची भाषांतरे व्हावीत म्हणून जागरुकता दाखवली. स्वत:च इंग्रजीमध्ये काही कथा अनुवादित केल्या. स्तंभलेखनही विपुल केले. कार्यक्रमाला जाताना मानधन आणि निवासव्यवस्था उत्तम हवी असा आग्रह धरला. साहित्य अकादमीशी संपर्क ठेवून भारतीय पातळीवरच्या समित्यांवर काम केले. दौरे केले. परभाषक लेखकांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. ज्ञानपीठ मिळावे ही त्यांची खूप इच्छा होती. मराठी भाषक समितीने पाचसहा वर्षे त्यांचे नाव पाठवलेही. परंतु त्यांना ज्ञानपीठ मिळाले नाही. साहित्य अकादमीचा पुरस्कारही त्यांना १९९६ मध्ये म्हणजे खूप उशिरा मिळाला. तोही आत्मचरित्रासाठी! साहित्य अकादमीचे उपाध्यक्षपद त्यांना मिळाले पण अध्यक्षपदाच्या निवडणुकीत अपयश आले. तरीही त्यांचे लेखन शेवटपर्यंत चालू राहिले. ऑगस्टमध्ये त्यांच्या परीकथांचे चार संग्रह पॉप्युलरने काढले. त्यांच्या साहित्यावरचा ५०० पृष्ठांचा ग्रंथ पॉप्युलरनेच काढला. त्यांच्या बहुतेक पुस्तकांच्या नवनव्या आवृत्त्या निघत राहिल्या. प्रकाशकाला नवे पुस्तक देताना जुन्या एखाद्या पुस्तकाची नवी आवृत्ती काढावी असा आग्रह ते धरीत.

जनस्थान पुरस्कार त्यांना मिळाला. इतरही खूप मानसन्मान मिळाले.

गाडगीळ हे लेखनातील व्यावसायिकतेचे एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. शेवटच्या क्षणापर्यंत त्यांची लेखणी चालू होती. वय वाढले तरी त्यांची प्रतिभा नवनवे उन्मेष प्रकट करीत होती.

**शंकर सारडा**

### * दामू केंकरे : प्रायोगिक रंगभूमीचे अध्वर्यू

सहा दशके रंगभूमीची सेवा करणारे ज्येष्ठ नाट्य दिग्दर्शक आणि अभिनेते दामू केंकरे (वय ८०) यांचे दि. २८ सप्टेंबर रोजी विलेपार्ले येथील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले. गेले वर्षभर ते अर्धांगवायूने आजारी होते. त्यांच्या पश्चात पत्नी ज्येष्ठ अभिनेत्री ललिता केंकरे, चिरंजीव ज्येष्ठ दिग्दर्शक विजय केंकरे व सून मंगल केंकरे असा परिवार आहे.

दामू केंकरे यांची रंगभूमीवरील कारकीर्द १९५७ च्या आसपास भारतीय विद्याभवनच्या एकांकिका स्पर्धांपासून सुरू झाली. माधव वाटवे, विजया मेहता,

आत्माराम भेंडे, अरविंद देशपांडे आदींच्या सान्निध्यात त्यांची कारकीर्द बहरली आणि गाजली. त्यानंतर व्यावसायिक रंगभूमीवरील नाटकांचे दिग्दर्शन करता करता चाकोरीबाहेरील नाटकांचे दिग्दर्शन करून त्यांनी आपला वेगळा ठसा उमटविला. 'दि गोवा हिंदू असोसिएशन' या संस्थेशी त्यांचा सहा दशके ऋणानुबंध होता. संस्थेच्या अनेक नाटकांचे दिग्दर्शन त्यांनी केले. 'रंगायन' या संस्थेशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता.

दामू केंकरे यांनी एकूण २७ नाटकांचे दिग्दर्शन केले. त्यातील बहुतांशी नाटके गाजली. 'हॅम्लेट','वाजे पाऊल आपले', 'सूर्याची पिल्ले', 'अखेरचा सवाल', 'स्पर्श', 'दुर्गा', 'चंद्र जिथं उगवत नाही', 'तू तर चाफेकळी', 'कार्टी प्रेमात पडली' आदी व्यावसायिक नाटकांबरोबरच 'वांदा' हे राजीव नाईक यांचे नाटकहा त्यांनी केले. अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. त्यांचे 'माझे गुरू' हे पुस्तक रंगकर्मींना मार्गदर्शक ठरणारे आहे.

विजया मेहता म्हणाल्या, दामू माझा अतिशय जवळचा मित्र. त्रिभुवन रोड या लेनमध्ये आम्ही राहायचो. लहानपणापासून आमची मैत्री. एक जवळचा मित्र गेला.

दिलीप प्रभावळकर म्हणाले, दामूजींना आम्ही 'सर' म्हणायचो; कारण ते म्हणजे चालंत-बोलं विद्यापीठ होतं. मराठी नाट्यसृष्टीला नवीन दिशा देणाऱ्या मंडळींमध्ये त्यांचे नाव अग्रस्थानी ठेवावे लागेल.

*** डॉ. स. रा. गाडगीळ**

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदाशिव रामचंद्र उर्फ स. रा. गाडगीळ (वय ९४) यांचे मुंबई येथे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे मुलगा डॉ. उल्हास गाडगीळ, दोन मुली आणि नातवंडे असा परिवार आहे.

वैकुंठ स्मशानभूमीत गाडगीळ यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ज्येष्ठ साहित्यिक के. रं. शिरवाडकर, डॉ. द. दि. पुंडे, आमदार उल्हास पवार आणि 'पद्मगंधा प्रकाशन'चे अरुण जाखडे या वेळी उपस्थित होते.

गाडगीळ यांचा जन्म ८ ऑगस्ट १९१४ रोजी कुरुंदवाड येथे झाला. मराठी आणि इंग्रजी हे विषय घेऊन त्यांनी मुंबई विद्यापीठातून एम. ए. पूर्ण केले. 'वैदिक यज्ञ : मध्ययुगीन तंत्रसाधना आणि ज्ञानेश्वरांचा भक्तियोग' या विषयावर प्रबंध सादर करून त्यांनी पीएच. डी. संपादन केली. नांदेड येथील पीपल्स कॉलेजमध्ये त्यांनी १९५० ते १९७७ या कालावधीत प्राध्यापक आणि विभागप्रमुख या नात्याने अध्यापनाचे कार्य केले.

१९७३ ते १९७७ या काळात ते प्राचार्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्यविद्या विभागाचे ते अधिष्ठाता होते. गाडगीळ यांची 'काव्यशास्त्रप्रदीप', 'वैदिक यंत्र मध्ययुगीन तंत्रसाधना आणि ज्ञानेश्वरप्रणित भक्तियोग',

'प्राचीन भारतीय धर्मविचार आणि मराठी संत' यांसह १४ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

प्राचीन धर्मशास्त्रावर आधारित देवीप्रसाद चटोपाध्याय यांच्या ग्रंथावरील 'लोकायत' हे त्यांचे पुस्तक गाजले. 'आधुनिक भारताचे शिल्पकार :पंडित जवाहरलाल नेहरू', 'हॅम्लेट (विकारविलसित) : एक चिकित्सक अभ्यास', 'सवाई माधवरावाचा मृत्यू', 'साहित्यमीमांसा आणि समाजदर्शन', ज्येष्ठ कवयित्री इंदिरा संत यांच्यावरील 'मराठी काव्यांगणातील इंद्रधनू' ही त्यांची प्रसिद्ध पुस्तके आहेत. गाडगीळ यांना राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे जीवनगौरव पुरस्कार सांस्कृतिक मंत्री अशोक चव्हाण यांनी रुग्णालयात जाऊन त्यांना पुरस्कार प्रदान केला होता.

## * रवींद्र पिंगे

प्रख्यात शैलीदार ललित लेखक रवींद्र पिंगे (वय ८२) यांचे १७ ऑक्टोबर रोजी मुंबई येथे निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.

पिंगे यांचा जन्म १३ मार्च १९२६ रोजी मुंबई येथे झाला. शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी महसूल, नेव्हल, अकाउंट्स आणि रेशनिंग विभागात नोकरी केली. मंत्रालयात शिक्षण खात्यामध्ये सांस्कृतिक विभागाचे ते कक्षाधिकारी होते. मुंबई आकाशवाणी केंद्रावर साहित्य शाखेचे निर्माते म्हणून त्यांनी २० वर्षे काम केले होते.

कथा, कादंबरी, ललित, प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रणात्मक आणि पाश्चात्त्य साहित्याचा परिचय असे विविध साहित्य प्रकार पिंगे यांनी लीलया हाताळले. ३२ पुस्तकांचे लेखन केले. त्यांची 'परशुरामाची सावली' ही कादंबरी प्रसिद्ध आहे.

'प्राजक्ताची फांदी', 'सुखाचं फूल' हे कथासंग्रह; 'मोकळं आकाश', 'मुंबईचं फुलपाखरू', 'आनंदाची फुलं', 'केशरी कमळ', 'आनंदपर्व' हे ललित लेखसंग्रह; 'आनंदाच्या दाही दिशा', 'आनंदव्रत' ही प्रवासवर्णने, 'शतपावली', 'देवाघरचा पाऊस', 'अंगणातलं चांदणं' हे व्यक्तिचित्रणात्मक संग्रह, 'पश्चिमेचे पुत्र', 'पिंपळपान', 'हिरवीगीर पानं' ही पाश्चात्त्य साहित्याचा परिचय करून देणारी त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत.

## * पं. रोहिणी भाटे

ज्येष्ठ कथक नृत्यांगना आणि गुरू पंडिता रोहिणी भाटे (वय ८३) यांचे १० ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे मुलगा कॅप्टन सनतकुमार, स्नुषा आणि प्रसिद्ध कथक नृत्यांगना शमा भाटे, नातू अंगद तसेच मोठा शिष्यपरिवार आहे. रोहिणीताईंच्या अंतिम इच्छेनुसार नेत्रदान करण्यात आले.

कथकचे मूळ महाराष्ट्रात आणि विशेषत: पुण्यात रुजविण्याचे कार्य करणाऱ्या रोहिणीताईंचा जन्म १४ नोव्हेंबर १९२४ रोजी बिहारमधील पाटणा येथे झाला. त्यांचे

शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पुण्यात झाले. फर्ग्युसन महाविद्यालयातून त्यांनी मराठी, संस्कृत विषयांत पदवी मिळवली.

या शिक्षणासोबत त्यांचे कथकचे शिक्षक गुरू पं. लच्छूमहाराज; तसेच पं. मोहनराव कल्याणपूर यांच्याकडे सुरू होते. या दोन्ही गुरूंकडे त्यांनी अनुक्रमे कथकच्या लखनौ आणि जयपूर शैली आत्मसात केल्या. कथकप्रमाणेच त्यांनी गुरू पार्वतीकुमार यांच्याकडून भरनाट्यम्चेही शिक्षण घेतले. अभिजात संगीताचे संस्कार त्यांनी केशवराव भोळे आणि पं. वसंतराव देशपांडे यांच्याकडून घेतले. १९४७ मध्ये त्यांनी पुण्यात 'नृत्यभारती कथक डान्स ॲकॅडमी'ची स्थापना केली आणि सहा दशकांहून अधिक काळ विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्या घडविल्या. शरदिनी गोळे, रोशन दात्ये, अमला शेखर, अरुणा केळकर, सुनीता पुरोहित, प्राजक्त राज, शर्वरी जमेनीस, ऋतुजा सोमण, मनीषा अभय, आसावरी पाटणकर, राजश्री जावडेकर अशा अनेक ज्येष्ठ शिष्या त्यांनी घडविल्या. महापौर राजलक्ष्मी भोसले, कथक नृत्यांगना सुजाता नातू, मनीषा साठे, भरतनाट्यम नृत्यांगना डॉ. सुचेता भिडे-चापेकर, वसुंधरा श्रीधरन, स्वाती दैठणकर, योगिनी गांधी, ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे, पं. उल्हास कशाळकर, प्रा. लीला अर्जुनवाडकर, डॉ. सरोजा भाटे आदींनी श्रद्धांजली अर्पण केली.

❐

# बालनगरी



## देव तर बघतोच!

रामजी एक साधा शेतकरी सारखा शेतात राबायचा.

जे काही पिकेल त्यात गुजराण करायचा.

त्याला एकच मुलगा होता. त्याचे नाव सोमू.

सोमू लहान होता तेव्हा रामजी त्याला खूप गोष्टी सांगायचा.

सोमू थोडा मोठा झाला. रामजी त्याला म्हणाला, ''सोमू, एक गोष्ट नेहमी लक्षात ठेव.नेहमी आपण चांगले काम करावे. त्यामुळे देव प्रसन्न होतो. देव सगळीकडे आहे.''

सोमू इकडे-तिकडे बघायला लागला. ''बापू, कुठेय देव ? मला तर कुठेच दिसत नाहीये.''

हसत हसत रामजी म्हणाला, ''अरे वेड्या, देव आपल्याला दिसत नाही. पण सगळीकडे असतो. आपण जे जे करतो, ते सगळं त्याला दिसत असतं.''

सोमूला ते पटलं नाही. पण तो काही बोलला नाही.

काही दिवसांनी गावात दुष्काळ पडला. रामजीच्या शेतातल्या पिकांचं नुकसान झालं. खायला काहीच राहिलं नाही.

शेजारच्या गावच्या इनामदारांच्या शेतात चार विहिरी होत्या. त्यांच्या शेताला भरपूर पाणी मिळालं. भरपूर पीक आलं.

एकदा रात्री रामजी सोमूला म्हणाला, ''चल माझ्या बरोबर.''



त्या इनामदारांच्या शेताशी पोचल्यावर रामजी म्हणाला, ''पोरा, जरा लक्ष ठेव. कोणी या बाजूला येताना दिसलं तर लगेच मला सांग.''

सोमू म्हणाला, ''बापू, तुम्ही काय करणार आहात?''

रामजी म्हणाला, ''इथे पुष्कळ पीक आलंय. थोडं कापून आपल्या घरी घेऊन जाऊ. अंधारात कोण बघतंय?''

कोयता घेऊन रामजी कणसं कापायला सुरुवात करणार...तोच सोमू म्हणाला, '' बापू, थांबा. कणसं तोडू नका. तो बघतोय ना!''

रामजी घाबरून म्हणाला, “ कोण बघतोय?”

सोमू म्हणाला, “देव बघतोय ना ! तुम्हीच सांगता ना, की देव सगळीकडे आहे. तो आपल्याकडे बघत असतो. मग तो इथे असणारच ना! तो नाही का तुम्हाला कणसं कापताना बघणार?”

रामजीच्या हातून कोयता गळून पडला.

सोमूला जवळ घेत तो म्हणाला,“पोरा, आज तुझ्यामुळे वाचलो. नाहीतर चोरीचं पाप घडलं असतं. देवाचा कोप झाला असता.”


एवढी गरिबी असूनही रामजीच्या मनात कधी असला विचार नंतर कधी आला नाही.

**माया वळामे**

## नद्यांची जास्तीत जास्त नावे शोधा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| बि | ब्र | स | स | त | ल | ज |
| ग | या | ह्म | र | रा | क्षि | प्रा |
| शो | गो | स | पु | स्व | वी | |
| न | र्म | दा | ना | त्रा | ती | कृ |
| | | य | व | ण्णा | | ष्णा |
| | को | का | वे | री | | |

# चित्र रंगवा



## सुविचार

सुख आणि दुःख हे माणसाचे महान शिक्षक आहेत.

बोधकथा

# एकाग्र मन



एक विद्यार्थी आपल्या खोलीमध्ये अभ्यास करीत होता. तो अभ्यास करण्यामध्ये अतिशय मग्न झाला होता.

त्याचे शिक्षक त्याच्या खोलीमध्ये गेले. त्यांनी त्याला हाक मारली. परंतु त्या विद्यार्थ्याने हाकेला ओ दिली नाही.

शिक्षक बाहेर गेले. त्यांनी दोन विटा आणल्या आणि खोलीमध्ये जाऊन ते त्या एकमेकांवर घासू लागले.

त्या आवाजाने त्या विद्यार्थ्याचे लक्ष शिक्षकांच्याकडे गेले. त्याने विचारले, ''गुरुजी, तुम्ही काय करता आहात?''

गुरुजी म्हणाले, ''तू अभ्यास करण्यामध्ये किती मग्न झाला होतास ते पाहात होतो.''

तात्पर्य :- कोणतीही गोष्ट करीत असताना मन एकाग्र करायला हवे. मन एकाग्र केले तर माणूस कोणतेही इच्छित ध्येय साध्य करू शकतो.

# नोव्हेंबर दिनविशेष



## दिनविशेष

**नोव्हेंबर २००८**

०४ नोव्हेंबर - वासुदेव बळवंत फडके जयंती (१८२५)

०७ नोव्हेंबर - सी. व्ही. रामन जन्मदिन (१८८८)

०९ नोव्हेंबर - महर्षि कर्वे पुण्यतिथी

१० नोव्हेंबर - अफजलखानाचा वध (१६५९)

११ नोव्हेंबर - पहिले महायुद्ध संपले (१९१८)

१३ नोव्हेंबर - रवींद्रनाथांना नोबेल पुरस्कार (१९१३)

१४ नोव्हेंबर - पंडित जवाहरलाल नेहरू जयंती (१८८९)

१५ नोव्हेंबर - आचार्य विनोबा भावे पुण्यतिथी (१९८२)

१९ नोव्हेंबर - इंदिरा गांधी जयंती

२० नोव्हेंबर - ग्रामोफोनचा शोध, एडिसन (१८७७)

२१ नोव्हेंबर - सी. व्ही. रामन पुण्यस्मरण (१९७०)

२३ नोव्हेंबर - जगदीशचंद्र बोस पुण्यतिथी (१९३७)

२८ नोव्हेंबर - म. फुले स्मृतिदिन (१८९०)

३० नोव्हेंबर - जगदीशचंद्र बोस जयंती (१८५८)

# ओळखा पाहू



मराठीतील अष्टपैलू साहित्यिक, नाटककार, संपादक, शिक्षणतज्ज्ञ, चित्रपट निर्माते

विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

ऑगस्ट अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

---

प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय टेनिसपटू व भारताच्या डेव्हिस करंडक संघाचे प्रशिक्षक - **नंदन बाळ**

---

स्पर्धेचे विजेते

श्री. भीमराव गुंडे, सोलापूर.

**प्रायोजक**

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,
टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**
**(साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी.)**

**सूचना -** प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

**उत्तर पाठविण्याचा पत्ता :**

मेहता पब्लिशिंग हाऊस,माडीवाले कॉलनी, १९४१ सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

# मेहता मराठी ग्रंथजगत

## वर्गणीचे नूतनीकरण करा.

एक वर्षाची वर्गणी १५० रु.

तीन वर्षांची वर्गणी ३५० रु.


पाच वर्षांची वर्गणी ५०० रु.

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**




३ वर्षांची वर्गणी
पाठविल्यास
'वपु ८५'
वपु काळे
हे ६०रु.चे
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी
पाठविल्यास
'सुवर्णमुद्रा'
शान्ता ज. शेळके
हे ८०रु.चे
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.




**भेट पुस्तके - प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L-2/RNP/PNW/M/38/2006-2008 / L.NO.LWP-50/
Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 November 2008.




तीन वेगवेगळ्या कालखंडातल्या घटना
आणि त्यांच्या परस्पर संबंधाचा
अद्भूत शोध घेत, उलगडत जाणारं
विलक्षण गूढ ...!

# द सिमीऑन चेंबर

स्टीव्ह मार्टिनी

अनुवाद : जयवंत चुनेकर

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोनभवन समोर, पुणे - ३०. फोन - (०२०) २४४७६९२४.

प्रति,

______________________________

______________________________

______________________________

______________________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३४६ गणेश पेठ, पुणे २.